23-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGB/ 12:00

23-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)A.1

SGB/ KTG/ KGS/ 12:00

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

शिक्षक प्रतिनिधी (वि.प.स.) व शिक्षक महामंडळाचे प्रतिनिधी सोबत बैठकीचे आयोजन करणे

(१) * २४४४८ श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. जी. एल. अैनापूरे : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण मंत्र्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे प्रतिनिधी व विधान परिषद सदस्य (शिक्षक आमदार) यांचे सोबत बैठकीचे आयोजन करुन राज्याचे शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला असंतोष, शिक्षक-विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत विचार विनिमय करावा असे एक निवेदन मा. मुख्यमंत्री यांना सरकार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी दिनांक ४ नोव्हेंबर, २००६ व ६ जानेवारी, २००६ रोजी किंवा त्या दरम्यान पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (१) दिनांक ४ नोव्हेंबर, २००६ व ६ जानेवारी, २००७ ची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) मा. मंत्री, शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण यांच्याकडे सन्माननीय शिक्षक आमदार तसेच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनांचे पदाधिकाऱ्यांसमवेत दिनांक २३ डिसेंबर, २००६ रोजी बैठक घेण्यात आली होती. निवेदनातील मागण्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शिक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांचे कौतुक करावेसे वाटते. याठिकाणी उत्तरामध्ये म्हटले आहे की, पदाधिकाऱ्यांसमवेत दिनांक 23 डिसेंबर, 2006 रोजी बैठक झाली. परंतु ही बैठक दिनांक 23 डिसेंबर, 2006 रोजी झालेली नसून 23 नोव्हेबर, 2006 रोजी झाली होती. त्यामुळे मंत्रीमहोदयांनी आवश्यक ती दुरुस्ती करावी. सभापती महोदय, ही बैठक शिक्षणमंत्री म्हणून प्रा.वसंत पुरके यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच झाली. यापूर्वी अशी बैठक कधीच झाली नाही. तत्कालीन शिक्षणमंत्री श्री.सुधीर जोशी, कै.रामकृष्ण मोरे यांच्या कार्यकाळात पदाधिकाऱ्यांसमवेत वर्षातून किमान दोन बैठका झाल्या होत्या. शिक्षक महामंडळाच्या प्रतिनिधींचे प्रश्न सोडविले गेले त्याबद्दल कौतुक वाटते. परंतु मागील अडीच वर्षात ही एकच बैठक झाली. या बैठकीचे आम्हाला लेखी पत्र पाठविले नव्हते. शिक्षणाधिकाऱ्यांनी फोन करुन आम्हाला बैठकीची माहिती दिली. कदाचित पत्र मागाहून पाठविण्यात आले असावे. ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)A.2

SGB/ KTG/ KGS/ 12:00

ता.प्र.क्र.24448..... श्री.वसंतराव खोटरे....

बैठक 23 नोव्हेंबर, 2006 रोजी झाली, परंतु त्या बैठकीचे इतिवृत्त आम्हाला अद्याप मिळालेले नाही. अधिकारी या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात हे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. जी बैठक झाली ती अल्पवेळात पार पडली. त्यामुळे अधिवेशन संपण्यापूर्वी पुन्हा शिक्षक प्रतिनिधी व शिक्षक महामंडळाचे प्रतिनिधी यांच्यासमवेत बैठक घेऊन आमच्या प्रलंबित प्रश्नांसंबंधी चर्चा करण्यात येईल का?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही बैठक शिक्षक महामंडळाच्या प्रतिनिधींच्या गैरसोयीमुळे तर कधी शासनाच्या गैरसोयीमुळे विलंबाने घेण्यात आली हे खरे आहे. माध्यमिक शिक्षक संघटनांचे महामंडळ करावे आणि दर सहा महिन्यांनी बैठक घेऊन त्यांचे प्रलंबित प्रश्न जे आहेत, बहुतांशी आर्थिक प्रश्न आहेत, त्याबाबत विचार करण्यासाठी हे अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेण्याची सन्माननीय सदस्यांनी मागणी केली असली तरी अधिवेशन संपल्यानंतर लगेच पहिल्या आठवडयात बैठक घेऊन ज्या मागण्या आहेत त्यांचा विचार करण्यात येईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24448 पुढे सुरु.....

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी निर्णय करण्यात येईल असे सांगितलेले आहेत. परंतु या संदर्भात शासनाने दिनांक 28.11.2000 रोजी आदेश निर्गमित केलेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात एकूण 22 वेळा या सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. याप्रश्नाच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांच्या दालनात एक बैठकही झाली होती. त्यावेळेस सांगण्यात आले होते की, या प्रश्नाच्या संदर्भात हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे. यासंदर्भात शासनाने जो शासन निर्णय काढलेला आहे तो माझ्या हातात आहे. आपले अधिकारी शाळा मॅनेजमेंटवर निरनिराळया माध्यमातून दबाव आणून लाभ उचलण्याचा प्रयत्न करीत असतात. या जी.आर. मध्ये अशी एक तरतुदीचा समावेश करण्यात आलेला आहे की, शाळा किंवा व्यवस्थापकाने काही त्रुटी असल्यास आणि अधिका-यांनी इन्स्पेक्शन केले त्यावेळी ही बाब अधिका-यांनी लक्षात आणून दिल्यास शाळा आणि व्यवस्थापनाने तशी दुरुस्ती करावयाची. ज्यास संबंधित माध्यमिक शाळा किंवा व्यवस्थान जबाबदार आहे अशा त्रुटी सक्षम प्राधिका-याने शाळेच्या निरिक्षणाच्या वेळी संबंधितांच्या निदर्शनास आणून दिल्यास, अशा त्रुटी दर्शविल्याचा वा कळविल्याच्या दिनांकापासून ते अशा त्रुटी प्रत्यक्षात दूर केल्याचा दिनांकाचा कालावधी विचारात घेऊ नये. त्रुटी दूर करणा-या सक्षम अधिका-याकडून खातरजमा करुन त्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. अशी विक्षिप्त तरतूद या जी.आर. मध्ये करण्यात आलेली आहे. त्यामुळे ही विक्षिप्त तरतूद काढून टाकण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही बाब तपासून घेतली जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील शासन निर्णय माझ्या जवळ आहे. या प्रश्नाच्या संदर्भात एकूण 22 वेळा या सभागृहात चर्चा झाल्यानंतर उजेड पडलेला आहे. सभागृहात प्रश्न विचारावयाचा असेल तर सन्माननीय सदस्यांना एक महिन्याच्या अगोदर प्रश्न द्यावा लागतो आणि या ठिकाणी प्रश्न लागल्यानंतर मंत्रीमहोदय म्हणतात की, तपासणीचे काम सुरु होते. हा जो काही प्रकार चालू आहे तो बरोबर नाही.. या जी.आर.मधील 28 व्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, संबंधित माध्यमिक शाळा किंवा व्यवस्थापन यांच्या निदर्शनास

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24448 पुढे सुरु.....

प्रा. बी.टी.देशमुख.....

सक्षम अधिका-यांनी त्रुटी लक्षात आणून दिल्यास किंवा अशा त्रुटी दर्शविल्याच्या किंवा कळविल्याच्या दिनांकापासून अशा त्रुटी दूर केल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी विचारात घेऊ नये. सक्षम अधिका-याने खातरजमा करुन प्रमाणपत्र आणल्यानंतर करावा. सभापती महोदय, या जी.आर.च्या माध्यमातून अधिकारी व्यवस्थापनावर दबाव आणण्याचे काम करीत आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, खरे म्हणजे शासन निर्णयामध्ये काही त्रुटी असतील तर त्या दूर केल्या जातील. अधिकारी आणि संचालक यांच्यामध्ये काही अडचणी असतील तर त्या दूर केल्या जातील. यासंदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे. खरे म्हणजे बारीक बारीक टेक्नीकल अडचणी असतील तर त्याची या सभागृहात चर्चा होणे उपयोगाचे नाही असे मला वाटते.

सभापती : या प्रश्नाच्या संदर्भात जी.आर. काढण्यात आलेला आहे. यासंदर्भात जो आदेश काढलेला आहे तो क्लिष्ट आहे असे सन्माननीय सदस्य श्री. देशमुखसाहेबांना म्हणावयाचे आहे. शिक्षकांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने आदेश सुटसुटीत असावा असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, दोष व्यवस्थापनाचे आणि त्रुटी दूर केल्याचे प्रमाणपत्र शिक्षकांनी आणावयाचे हा कोणता न्याय आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ॲथॉरीटी संस्था आहे. ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हे बरोबर नाही.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जी बैठक घेतलेली होती त्यामध्ये विधान परिषदेचे जे शिक्षक आमदार आहेत त्यांनाच आपण पाचारण केले होते. शिक्षक आमदारांना बालावण्यामुळे मला काही अडचण नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24448.....

डॉ.वसंत पवार.....

या सभागृहात शिक्षणाशी संबंधित अनेक आमदार आहेत त्यांना सुध्दा या बैठकीस बोलाविल्यास शिक्षकांच्या मागण्यांच्या बाबतीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, त्यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल. तेव्हा शिक्षणाशी संबंधित आमदारांना सुध्दा बैठकीस बोलाविण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, या सभागृहात शिक्षक प्रतिनिधींव्यतिरिक्त शिक्षणाशी संबंधित अनेक आमदार आहेत. सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे त्याही आमदारांना बैठकीस बोलाविण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती :या सभागृहात शिक्षक प्रतिनिधी आहेत तसेच शिक्षण संघटनांशी संबंधित प्रतिनिधी आहेत. त्यांचा शिक्षण संस्थांशी संबंध असल्याने त्यांना सुध्दा बैठकीस बोलाविल्यास शिक्षकांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल. तेव्हा शिक्षणाशी संबंधित असणाऱ्या आमदारांना बैठकीस बोलाविण्यात यावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, होय.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जी.आर.चा उल्लेख केला. या जी.आर.मध्ये फक्त शिक्षकांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात मागील दोन महिन्यात मी निवेदने दिलेली आहेत त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या शासन निर्णयात सुस्पष्टता आणण्यासाठी तातडीने कार्यवाही केली जाईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, शिक्षकांच्या मागण्यांबाबत विचार करण्यासाठी सरकार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी दिनांक 4 नोव्हेंबर, 2006 व 6 जानेवारी 2007 रोजी निवेदन दिले होते. या निवेदनात शिक्षकांचे प्रश्न, त्यांना येणाऱ्या अडचणी तसेच भ्रष्टाचारासंबंधी अनेक मुद्दे कोट केलेले आहेत. भ्रष्टाचाराच्या संदर्भात जी प्रकरणे या निवेदनात दिलेली आहेत, त्या संदर्भात पंधरा दिवसांच्या आत राज्य स्तरीय बैठक घेऊन किंवा डायरेक्टर लेव्हलवर या प्रकरणांची चौकशी करण्यात येणार येईल काय ? तसेच यासंदर्भातील निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहासमोर ठेवण्यात येईल काय ? ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24448.....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, निवेदनात शिक्षकांच्या अनेक मागण्या कोट केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी भ्रष्टाचारासंबंधी चौकशी करण्याची मागणी केलेली आहे. या संदर्भात निश्चितपणे लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे शिक्षकांच्या प्रश्नांच्या संदर्भात शिक्षकांचे एक महामंडळ नेमून सहा महिन्यांनी त्यामध्ये चर्चा करण्यात येईल. हे अधिवेशन संपल्यानंतर शिक्षकांचे महामंडळ नेमण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शाळेच्या व्याख्येमध्ये प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा यांचा समावेश होतो. माझा मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, आता शासनाने काढलेला जी.आर. हा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना लागू होतो काय ? नसल्यास, त्याप्रमाणे जी.आर.मध्ये सुधारणा करणार काय ? माझा मंत्रिमहोदयांना दुसरा प्रश्न आहे की, शिक्षकांच्या बाबतीत जो काही निर्णय होतो तो संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे पुढील कार्यवाही होत नाही.

यानंतर श्री.पुरी.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24448.....

श्री.रामनाथ मोते....

तेव्हा शासन या संदर्भातील चर्चेमध्ये झालेले निर्णय संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यासाठी काही ठोस उपाययोजना करणार आहे का ? असल्यास, कोणती ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत जो शासन निर्णय काढण्यात आला, त्यामध्ये आणखी सुस्पष्टता आणण्यात येईल. तसेच, बैठकीतील निर्णय अधिकाऱ्यांना कळविण्यासंबंधीही निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य वारंवार अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेण्यासंबंधीची मागणी करीत आहेत, त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देत नाहीत. त्या बैठकीस इतर आमदारांनाही सोबत घेतले तर त्यास आमची हरकत नाही. सभापती महोदय, गेल्या तीन वर्षामध्ये सदरची बैठक झाली नसल्यामुळे अनेक प्रश्न प्रलंबित राहिलेले आहेत. त्यामुळे सदरची बैठक आपण अधिवेशन संपण्याच्या आत घेणार का ? सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी याबाबतीतील सुस्पष्ट जी.आर. काढण्यासंबंधीची जी मागणी केली आहे, ती आपण मान्य करावी. तसेच, अनुदानित व विना अनुदानित शाळांतील जे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत, त्यांना समान न्याय देण्याची भूमिका आपण घेणार का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षक आमदारांच्या अन्य कारणांमुळे व आमच्याही काही अडचणीस्तव बैठक झालेली नाही. परंतु शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी वेळोवेळी आम्ही शिक्षक आमदारांसोबत चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जे निवेदन दिले आहे, ते 18 मागण्यांचे आहे. सन्माननीय सदस्यांनी अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक बोलाविण्याची जी मागणी केली आहे, त्याप्रमाणे निश्चितपणे बैठक बोलविली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईन्टेड व नैसर्गिक न्यायाचा प्रश्न आहे. फार मोठा बुचकळयात टाकणारा माझा प्रश्न नाही. आपण या जी.आर. च्या माध्यमातून शिक्षकांना दोषी धरु नये. यामध्ये व्यवस्थापनाच्या काही त्रुटी आहेत. अधिकाऱ्याने इन्स्पेक्शन घेतले व त्यामध्ये त्याची सोय किंवा टॅक्सीचे बिल वगैरे दिले नसल्यामुळे त्या अधिकाऱ्याने त्रुटी काढलेली आहे. ती त्रुटी दूर केल्यानंतर व तसे सर्टीफिकेट आणले तरच सेवा ग्राहय धरली जाईल, अशी

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24448.....

प्रा.बी.टी.देशमुख.....

यामध्ये तरतूद आहे. या जी.आर. मध्ये काय आहे, हेही आपल्याला माहीत नव्हते, ते मी आपल्याला सांगितले. मग, आपण आणखी काय तपासून पाहणार आहात ? ही कॉमनसेन्सची गोष्ट आहे. माझा पॉइन्टेड प्रश्न आहे. ही व्यवस्थापनाची त्रुटी आहे. त्याबाबतीत शासन म्हणून आपण आपली न्यायाने व कायद्याने ताकद लावावी. या जी.आर.मध्ये जी चुकीची तरतूद आहे, ती चूक आपण दुरुस्त करावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, यासंबंधी ज्या कोणत्या अधिकाऱ्याने बदमाशपणा केला असेल त्याला कोणीही सोडणार नाही. तसेच, या जी.आर.मध्ये सुस्पष्टता आणली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या जी.आर.मध्ये कोणती तरतूद आहे, हेही माहीत नसेल तर या गोष्टीचा निषेध करुन मी सभात्याग केल्याला बरा. ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आपण जेव्हा एखादा जी.आर. काढतो, तेव्हा तो अतिशय काळजीपूर्वक काढणे आवश्यक असते. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी बारीक-सारीक गोष्टींचा किस काढणे योग्य नाही, असे मला वाटते.

सभापती : माननीय मंत्रिमहोदयांना मी निदेश देतो की, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या पध्दतीचे प्रश्न उपस्थित केले, ते तपासून घ्यावेत व त्यादृष्टीने जी.आर.मध्ये काही उणिवा व चुका राहिल्या असतील तर त्याही भरुन काढाव्यात.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, याठिकाणी आम्ही अतिशय जबाबदारीने काम करीत असतो. याबाबतीतील बैठक झाल्यानंतर आम्ही वेतनेत्तर अनुदानही मंजूर केलेले आहे. याठिकाणी आम्ही सन्माननीय सदस्यांचा एक ज्येष्ठ सदस्य म्हणून आदर करतो. परंतु त्यांनी अशाप्रकारे आक्रमक होऊन बोलणे योग्य नाही, असे मला वाटते. कुठल्याही शिक्षक आमदारांवर अन्याय होणार नाही, याची आम्ही सतत काळजी घेतो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय जर आपला अपमान करणार असतील तर....

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी माननीय मंत्रिमहोदयांना निदेश दिले आहेत की, शासन निर्णयामध्ये काही उणिवा असतील तर त्या भरुन काढाव्यात व ज्या चुका असतील त्याही दुरुस्त कराव्यात, अशा प्रकारची ऑर्डर मी त्यांना दिलेली आहे. मी त्यांना पॉईन्ट आऊट केले आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय. जी.आर.मध्ये सुस्पष्टता आणली जाईल. परंतु सन्माननीय सदस्य म्हणतील त्याप्रमाणे सरसकट जी.आर. काढला जाणार नाही. जी.आर. कोणावरही अन्याय करणारा असणार नाही, हे मी याठिकाणी मुद्दाम सांगू इच्छितो.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय शिक्षक आमदार जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : आता आपण पुढील प्रश्न चर्चेसाठी घेऊ.

प्रा.बी.टी.देशमुख : आम्ही याचा निषेध करुन सभात्याग करतो.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय शिक्षक आमदार निषेध करुन सभात्याग करतात.)

नंतर श्री.रोझेकर....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाची अंमलबजावणी होणेबाबत

(२) * २७४९६ श्री. मधुकर सरपोतदार , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री.भास्कर जाधव , श्री. राजेंद्र जैन , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. गोपीकिसन बाजोरिया तारांकित प्रश्न क्रमांक २२०८२ ला दिनांक ७ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या बैठकीमध्ये यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाच्या अंमलबजावणी करण्यासाठी तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गणेश नाईक : (१) महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या बैठकीमध्ये यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात समिती गठीत करण्याची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही.

(२),(३) व (४) महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या बैठकीमध्ये यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाच्या अंमलबजावणी संदर्भात या उद्योगातील निष्णात व तांत्रिक माहिती असणाऱ्या तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात सन्माननीय मंत्रीमहोदयांना काही सुधारणा करावयाची आहे काय ? नसल्यास, मी माझा प्रश्न विचारतो.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मला उत्तरात सुधारणा करावयाची नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज जो प्रश्न या ठिकाणी विचारण्यात येत आहे तो जुलै 2006 पासून विचारण्यात येतो आहे. पाठीमागच्या दोन अधिवेशनांमध्ये हा प्रश्न या सभागृहामध्ये विचारण्यात आला, पण शेवटी आमचा प्रश्न अतारांकित झाला. या अतारांकित प्रश्नाला शासनाने जे उत्तर दिले, त्या अनुषंगाने आम्ही पुन्हा प्रश्न टाकला आहे. अतारांकित प्रश्नाला दिलेले उत्तर आणि आज सभागृहात विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे उत्तर तपासून पाहिले तर त्यात काहीही सुधारणा झालेली नाही. मागील प्रश्नाला जे उत्तर देण्यात आले होते तेच पुन्हा रिपिट करण्यात आले आहे. तेव्हा, याबाबतीत हीच वस्तुस्थिती आहे का, तसेच शासनाचे हेच

.2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.27496 पुढे सुरु.....</u>

श्री.मधुकर सरपोतदार.....

धोरण आहे का ? मागील अधिवेशनांमध्ये याच विषयासंबंधी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना शासनाने जे उत्तर दिले आहे ते मी या ठिकाणी वाचून दाखवितो. डिसेंबर, 2006 च्या अधिवेशनामध्ये विचारण्यात आलेल्या लेखी प्रश्न भाग 1 ला असे उत्तर देण्यात आले होते की, "महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या अध्यक्षांची आणि सदस्यांची नियुक्ती अनुक्रमे 13 सप्टेंबर 2006 आणि 3 नोव्हेंबर 2006 च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली होती." प्रश्न भाग 2 व 3 ला असे उत्तर देण्यात आले होते की, "महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या बैठकीमध्ये यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाच्या अंमलबजावणी संदर्भात या उद्योगातील निष्णात व तांत्रिक माहिती असणा-या तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात येईल." आणि आज उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नालाही हेच उत्तर देण्यात आले आहे. त्यामध्ये प्रश्न भाग 1 ला असे उत्तर देण्यात आले आहे की, "महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या बैठकीमध्ये यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात समिती गठीत करण्याची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही." प्रश्न भाग 2, 3 व 4 ला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या बैठकीमध्ये यंत्रमाग कामगारांसाठी किमान वेतनाच्या अंमलबजावणी संदर्भात या उद्योगातील निष्णात व तांत्रिक माहिती असणा-या तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात येईल." जुलै, 2006 पासून दोन वेळा प्रश्न विचारुन सुध्दा या प्रश्नाला तेच उत्तर देण्यात येत असेल तर शासन काही काम करीत नाही, असा अर्थ आम्ही लावायचा का ? तसेच ही समिती कधी गठीत करणार आहात व कामगारांचे नेतृत्व करणारी व्यक्ती किमान वेतनासंबंधी एवढा हलगर्जीपणा का दाखवित आहे ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने किमान वेतन ठरविण्याकरिता जी समिती गठीत केलेली आहे त्या समितीचे अध्यक्ष म्हणून ॲडव्होकेट महाबळ शेट्टी यांची नियुक्ती केलेली आहे. मालकांचे प्रतिनिधी, कामगारांचे प्रतिनिधी आणि काही पत्रकार अशा घटकांचाही समावेश या समितीमध्ये करण्यात आला आहे. या समितीला यंत्रमाग आणि हातमाग यावर काम करणा-या कामगारांना द्यावयाच्या किमान वेतनासंबंधी या क्षेत्रातील तज्ञ आणि

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.27496 पुढे सुरु</u>.....

श्री.गणेश नाईक.....

ज्यांना या क्षेत्रातील अनुभव आहे अशा सदस्यांची समिती गठीत करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. कामगारांचे हित लक्षात घेऊन नावाजलेल्या लोकांची नियुक्ती करुन सदर समिती गठीत केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाला गेल्या दोन अधिवेशनांमध्ये शासनाकडून सारखेच उत्तर मिळत आहे, हे आमचे दुर्देव आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, नेमकी पहिल्यांदा समिती कोणत्या तारखेला गठीत करण्यात आली ? दुसरा प्रश्न असा आहे की, निष्णात व तांत्रिक माहिती असणा-या तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे उत्तरात म्हटले आहे, यामागची शासनाची नेमकी भूमिका काय आहे ? या निष्णांत आणि तांत्रिक माहिती असणा-या तज्ञ समितीची बैठक होणार आहे की केवळ टाईमपास होणार आहे ?

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.27496.....

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगावयाचे झाले तर यंत्रमाग आणि हातमागावर काम करणा-यांची संख्या मला सांगता येणार नाही परंतु त्यांचे ऑथॉरिटी म्हणून उल्लेख करावा अशा प्रकारचे 15 ते 20 लोक निश्चितपणे आहेत. काही सेवानिवृत्त झालेले लोक तसेच इतर क्षेत्रातील तज्ञदेखील त्यांच्या कामाचा व्याप सांभाळून सदर समितीच्या कामाकरिता ऑनररी वेळ देणार आहेत. सदर तज्ञ लोकांशी शासनाची चर्चा चालू आहे. चुकीच्या पध्दतीचे लोक येऊन यंत्रमाग व हातमाग कामगारांवर अन्याय होऊ नये, असा विचार ही समिती गठित करतांना केलेला आहे.

डॉ.दिपक सावंत : समिती गठित कधी झाली ? तारीख सांगण्यात यावी.

श्री.गणेश नाईक :. "महाबल शेट्टी "समितीच्या निर्णयानुसार शासनाच्या अधिका-यांमार्फतही यंत्रमाग आणि हातमाग कामगारांना किमान वेतनाच्या अनुषंगाने किती वेतन द्यावे ? यासाठी समिती गठित करण्याची प्रक्रिया सुरु झाली. महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाची समिती 3 नोव्हेंबर,2006 रोजी गठित झाली

श्री.जितेंद्र आव्हाड : महोदय, माननीय कामगार मंत्री हे ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री देखील आहेत. भिवंडी,मालेगाव,इचलकरंजी या ठिकाणी पॉवरलुम्सवर काम करणा-या कामगारांना किमान वेतन किती मिळावे ? याकरिता सन 2006 साली एक कमिटी स्थापन झाली, सदर समितीत तज्ञ लोकांची नेमणूकही करण्यात आली आहे. पॉवरलुम्स व हातमागावर काम करणारे कामगार हे विशिष्ट समाजातून आलेले असतात व ते दारिद्रयरेषेखाली खितपत आयुष्य कंठत असतात, हे कामगार विशेषत: मुस्लिम व एस.टी.,एस.सी. या समाजातून आलेले असतात. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्याच्या आत या सर्व समितीची कार्यवाही आटोपून किमान वेतन जाहीर करणार का ?

श्री.गणेश नाईक : अधिवेशनाच्या कालखंडामध्ये सदर समितीची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

F -2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेतनेतर अनुदान रोखून ठेवल्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन

(३) * २४४९४ श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे तारांकित प्रश्न क्रमांक २१०५६ ला दिनांक १४ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ३१ मार्च, २००४ पर्यंत देय असलेले थकित वेतनेत्तर अनुदान रुपये ९०.२८ कोटी उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, केव्हा व ३१ मार्च, २००५ तसेच ३१ मार्च, २००६ पर्यंतच्या वेतनेत्तर अनुदान मंजुर करण्यासंबंधी शासनाने काय कारवाई केली आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ,प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता: (१) होय,

(२) वेतनेतर अनुदानाबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर मांडण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जी.एल.अैनापूरे : महोदय, वेतनेतर अनुदान पूर्वी शासनाकडून जबाबदारीने सुरु होते परंतु अलिकडच्या काळामध्ये वेतनेतर अनुदान शासन मेहेरबानी म्हणून लहरीपणाने वितरीत करते, त्यामुळे शाळांमध्ये भरपूर असंतोष आहे. पूर्वी प्रत्येक वर्षी वेळापत्रकाप्रमाणे अनुदानाचा पहिला हप्ता जुलै व दुसरा हप्ता डिसेंबर / जानेवारीमध्ये शाळांमध्ये वितरीत होत होता, त्यावेळी शिक्षण संस्थांना अनुदानाचे नियोजन करणे सोपे जात होते, परंतु आता चार - चार वर्षे शाळांना वेतनेतर अनुदान मिळत नाही. माझा पहिला प्रश्न असा आहे की, किरकोळ कामांसाठी वेतनेतर अनुदान थांबविण्याचे हे सत्र शासन बंद करणार का ? दुसरा प्रश्न असा की, पूर्वीच्या वार्षिक वेळापत्रकाप्रमाणे वेतनेतर अनुदानाचा पहिला हप्ता जुलै व दुसरा हप्ता डिसेंबर / जानेवारी मध्ये शिक्षण संस्थांना वेळेवर प्राप्त होणार का ? तिसरा प्रश्न असा की, वेतनेतर अनुदानामध्ये कपात करुन शाळांना धोक्यात आणण्याचे सत्र शासन बंद करणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, पूर्वी वेतनेतर अनुदानाबद्दल शासनाची काही मते होती, मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार दिनांक ३१ मार्च,२००४ पर्यंतच खाजगी शिक्षणसंस्था चालविणा-या लोकांना शाळेची इमारत बांधण्याकरिता कर्ज उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी होती. मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या निर्णयानुसार २९० कोटी रुपये वेतनेतर अनुदानासाठी

F -३.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राप्त झालेले होते, सदर रकमेमध्ये वेतनेतर अनुदान दिलेले आहे. यानंतर वेतनेतर अनुदानासंदर्भात शिक्षण विभाग तसेच, मंत्रीमंडळाकडून यासंदर्भात अभ्यास करुन योग्य तो निर्णय लवकरातच घेण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, माननीय गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखालील शिष्ट मंडळाला दिलेल्या निर्णयानुसार वेतनेतर अनुदानाचा खर्च हा कमिटेड एक्स्पेंडिचर आहे आणि तो केला गेलाच पाहिजे, आम्ही त्याकरिता बांधील आहोत, ही गोष्ट शासनाने सभागृहामध्ये देखील कबूल केली होती, ते काही वाचून दाखविण्याची गरज आहे, असे मला वाटत नाही.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24494 .....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, गोविंदभाई श्रॉफ यांनी माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांची भेट घेऊन वेतनेतर अनुदानाची मागणी केली होती. दिनांक 31.3.2004 पर्यंतचे अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. आम्ही हा विषय मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी ठेवणार आहोत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे त्यावेळी शासनाचे असे उत्तर होते की, वेतनेतर अनुदान दिले जाईल. आता माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्याप्रमाणे दिनांक 31.3.2004 पर्यंतचे वेतनेतर अनुदान दिले जाईल. परंतु 2004 नंतरचे वेतनेतर अनुदान द्यावयाचे नाही, असा शासनाने निर्णय घेतलेला आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दिनांक 31.03.2004 पर्यंतचे वेतनेतर अनुदान द्यावे, असा शासनाने निर्णय घेतला होता. दिनांक 31.03.2004 नंतरच्या अनुदानाचे काय करावयाचे यासंदर्भातील निर्णय घेण्यासाठी आम्ही मंत्रिमंडळासमोर जाणार आहोत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, दिनांक 31.03.2004 पर्यंतचे वेतनेतर अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. ग्रामीण भागामध्ये अशा किती तरी शाळा आहेत की, त्या शाळांना इमारतीचा मेंटेनन्स व इतर खर्च करणे अशक्य आहे. पटसंख्या टिकावी म्हणून त्या शाळांना विद्यार्थ्यांसाठी सोईसुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागतात. त्या शाळांनी इमारतीचा मेंटेनन्स व इतर खर्च कशा प्रकारे करावा, याबाबत शासन मार्गदर्शन करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, इमारतीच्या मेंटेनन्सची जबाबदारी खाजगी शिक्षण संस्था चालकांची आहे, असे त्यावेळी शासनाचे मत होते. दिनांक 31.3.2004 पर्यंतचे वेतनेतर अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. आम्ही मंत्रिमंडळासमोर जाऊन लवकरच याबाबतचा निर्णय घेणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24494 .....

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, दिनांक 31.03.2004 पर्यंतचे वेतनेतर अनुदान देण्याचा शासनाने निणर्य घेतला होता. आता सन 2007 सुरु आहे. म्हणजे या गोष्टीला 3 वर्षे झालेली आहेत. शासनाने मागच्या 3 वर्षामध्ये यासंदर्भात निर्णय का घेतला नाही ? माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, आम्ही मंत्रिमंडळासमोर हा विषय चर्चेसाठी ठेवणार आहोत. शाळा चालविण्याची जबाबदारी शासनाची नाही काय ? 6 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. माझा प्रश्न असा आहे की, वेतनेतर अनुदान देण्याचा निर्णय शासन तात्काळ घेणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा विषय आम्ही मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी ठेवणार आहोत. 90 कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्यानंतर पुढील निर्णय घ्यावा असा शासनाचा उद्देश होता.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, दिनांक 31.03.2004 पर्यंतचे अनुदान दिले जाईल. परंतु अजून 3 वर्षाचे अनुदान द्यावयाचे बाकी आहे. दोन वर्षाचे थकित वेतनेतर अनुदान आणि चालू वर्षाचे अनुदान, असे एकूण किती अनुदान द्यावयाचे बाकी आहे ? शासनाने प्रायव्हेट मॅनेजमेंटकडून शाळा आपल्या ताब्यात घ्यावी. वेतनेतर अनुदान देण्यासंदर्भात एक-दोन महिन्यांमध्ये निर्णय घेतला जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अधिवेशन काळामध्ये हा विषय आम्ही मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी ठेवणार आहोत आणि निर्णय घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24494

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाबाबत कै.गोविंदभाई श्रॉफ यांची माननीय मुख्यमंत्री यांच्याबरोबर बैठक झाली होती, या बैठकीतील कार्यवृत्त लेखी स्वरुपात उपलब्ध आहे. मंत्री महोदयांच्या उत्तरावरुन असे दिसते की, वरील कार्यवृत्तात घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी न करण्याचे शासनाने ठरविले आहे. सभापती महोदय, वेतनेत्तर अनुदानाच्या रकमेचे वितरण केले जात होते. राजकोषीय सुधारणा व त्यावरील उपाययोजना त्यावेळी मंत्रिमंडळाने मान्य केल्या आहेत. कै.गोविंदभाई श्रॉफ यांनी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर वेतनेतर अनुदानाबाबत चर्चा केल्यानुसार व त्या बैठकीत ठरल्यानुसार या विषयाला चालना दिली पाहिजे. सभापती महोदय, ग्रामीण भागात देखील शाळा व मुले आहेत, त्यांच्या आर्थिक परिस्थितीची शासनाने जाणीव ठेवली पाहिजे. शाळांना जर वेतनेतर अनुदान मिळाले नाही तर, तेथे झाडपोस करायला आपण जाणार आहोत काय ? त्यामुळे माझी विनंती आहे की, हा प्रश्न राखून ठेवावा व शासनाकडून याबाबतची सर्व माहिती घेण्यात यावी.

सभापती : वेतनेतर अनुदानाच्या प्रश्नाच्या संदर्भात दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या भावना विचारात घेऊन मी या संदर्भात असे सांगू इच्छितो की, वेतनेत्तर अनुदानाबाबत कै.गोविंदभाई श्रॉफ यांच्याबरोबर तत्कालीन व विद्यमान मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांची चर्चा झाली होती. कै.गोविंदभाई श्रॉफ यांनी माननीय मुख्यमंत्र्यांशी केलेल्या चर्चेचे महत्व व पावित्र्य राखणे आवश्यक आहे. त्यामुळे वेतनेतर अनुदानाबाबतचा तारांकित प्रश्न क्रमांक 24494 मी राखून ठेवीत आहे. याबाबत माझ्या दालनात येत्या आठ दिवसात बैठक बोलावण्यात येईल. माननीय शिक्षण मंत्री, शिक्षण राज्यमंत्री यांनी याबाबतची संपूर्ण माहिती माननीय मुख्यमंत्री व मंत्रिमंडळास अवगत करावी व वेतनेतर अनुदानाच्या प्रश्नावर न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

ता.प्र.क्र. 28466

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी प्रश्न क्र.28466 मांडावा.

श्री.अरविंद सावंत : श्री.सुरेश जेथलिया यांच्या जवळच्या कोणाचे तरी निधन झाल्याने ते सभागृहात उपस्थित नाहीत.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भिवंडी (जि.ठाणे) शहराच्या पूर्वेकडील हनुमान टेकडी मान सरोवर लगतच्या कणेरी भागातील दगडाच्या खाणीमुळे तेथील नागरीकांचे जीवन धोक्यात आल्याबाबत

(५) * २४५३४ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री.सय्यद जामा , श्री. गोविंदराव आदिक : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहराच्या पूर्वेकडील हनुमान टेकडी मान सरोवर लगतच्या कणेरी भागातील दगडाच्या खाणीमुळे तेथील नागरीकांचे जीवन धोक्यात आल्याचे दिनांक १५ जानेवारी २००७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत नागरीकांनी तक्रार करुनही संबंधित विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मान सरोवरालगत सर्वे क्रमांक १९२ मधील वन विभागाच्या ताब्यातील डोंगरात अनधिकृतपणे दगड खाणी सुरु आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने उक्त प्रकरणाबाबत कोणती कारवाई केली,

(५) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) याबाबत पोलिसांकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी करण्यात आली असल्याने दुर्लक्ष करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, भिवंडी शहराच्या पूर्वेकडील हनुमान टेकडी मान सरोवर लगतच्या कणेरी भागातील दगडाच्या खाणीमुळे तेथील नागरिकांचे जीवन धोक्यात आल्याबाबत त्या परिसरातील लोकांनी वन विभाग व जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केलेली आहे. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात असे म्हटले आहे की, हे खरे नाही. उत्तरात पुढे असे म्हटले आहे की, "पोलिसांकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी करण्यात आली आहे, परंतु चौकशीत असे काही आढळून आले नाही म्हणजे तेथील लोकांनी दिलेली दिलेली तक्रार चुकीची आहे असे शासनाचे मत आहे. सभागृहात प्रश्न चर्चेला आल्यानंतर पोलिसांनी चौकशी केली आहे असे वाटते. चौकशीमध्ये खाणीतील दगड तोडणाऱ्या अल्पवयीन बाल कामगारावर कारवाई करण्यात आली व खाण बंद करण्यात आली आहे.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

श्री. मुझफ्फर हुसेन (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 24534 ....

माझा प्रश्न असा आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी, मग ते वन विभागाचे असोत वा महसूल विभागाचे असोत, त्यांनी एवढे दिवस, एवढे महिने, एवढी वर्षे विनापरवाना तेथे खाणी चालू ठेवण्यास मुभा दिली त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नागरिकांचे जीवन धोक्यात आल्यासंबंधीच्या कोणत्याही तक्रारी तेथे नाहीत. हनुमान टेकडी तथा मान सरोवर या परिसरामध्ये फेणे, कणेरी व कामतघर ही गावे येतात. मान सरोवर ड्रीम होम प्रायवेट लिमिटेड ही निवासी इमारत तेथे आहे आणि त्या संस्थेने पोलीस उपायुक्त,भिवंडी यांच्याकडे 6 जानेवारी 2006 ला एक तक्रार दिलेली होती की, तेथे अनधिकृतरित्या उत्खनन होत आहे. त्यामुळे संबंधित वन आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी जी काही कारवाई केली त्या संदर्भात जो प्रश्न येथे विचारला आहे, त्याबद्दल मी आपल्याला सांगू इच्छितो की, हनुमान टेकडी, मान सरोवर लगत कणेरी ही गावे त्या परिसरात येतात आणि त्या ठिकाणी अशा प्रकारच्या कोणत्याही अधिकृत वा अनधिकृत खाणी नाहीत. परंतु पोलीसांकडे तक्रार आल्यानंतर निश्चितपणे पोलिसांनी त्याबाबत चौकशी केली आणि ही चौकशी करीत असताना मंडल अधिकाऱ्यांनीदेखील पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिली होती. सदर भाग हा वन विभागाचा होता म्हणून त्यासंबंधात डीएफओ यांचेकडून माहिती घेतली त्यानुसार वन खात्याकडे असलेल्या माहितीनुसार तेथे अशा प्रकारे कोणत्याही अनधिकृत खाणी त्या भागात नाहीत.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, गेली अनेक वर्षे भिवंडीच्या बाबतीतील हा प्रश्न येथे चर्चिला जातो आहे. ठाण्यातील त्या मागावरून प्रवास करणाऱ्या माझ्यासह सर्वच आमदारांना भिवंडीतील या अनधिकृत खाणींचा हा प्रश्न माहिती आहे. हनुमान टेकडी, मान सरोवर परिसरामध्ये अशा प्रकारे अनधिकृत खाणी चालविल्या जात असल्याबद्दलचा प्रश्न या पूर्वी विधान परिषदेमध्ये देखील आला होता. तेथील हायवेला लागून असलेल्या या खाणींबद्दल माहिती घेण्याच्या दृष्टीने आपण आमदारांची एक समिती गठित केली आणि तिला त्या भागामध्ये दौरा करण्यास सांगितले तरी त्यातून बरीच माहिती आपल्याला समजून येईल. असे असताना येथे जी उत्तरे मंत्री महोदयांकडून दिली जात आहेत, त्यातून विभागाचे सर्वच अधिकारी दिशाभूल करीत आहेत. सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करीन की, आपण स्वत: किंवा मंत्री महोदयांनी आमच्या

..... आय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरोबर त्या भागात दौरा केल्यास तेथील खाणी आम्ही आपल्याला दाखवू, त्या पाहून आपण निर्णय घ्यावा. तसे करण्यास आपली तयारी आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आलेली आहे त्यानुसार हनुमान टेकडी व मान सरोवर या परिसरामध्ये खाणी नाहीत. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती ही आपण खरी समजतो. त्यानुसार सन्माननीय सदस्यांनी जी माहिती येथे् दिली आहे ती खरी आहे असे गृहीत धरून, त्यांनी विनंती केल्यानुसार मी त्यांच्याबरोबर तेथे येऊन पाहणी करण्यास तयार आहे. तेथे ज्या काही अनधिकृत तसेच अधिकृत खाणी असतील आणि तेथील इमारतींना त्यांच्यापासून धोका असेल तर अशा सगळ्या खाणींची पाहणी करण्यासाठी मी तेथे जाण्यास तयार आहे. सभापती महोदय, आपणही निश्चितपणे अशा प्रकारे आमदारांची समिती गठित करून तिच्यामार्फत किंवा मी स्वत: देखील सन्माननीय सदस्यांबरोबर तेथे जाऊन या खाणींची पाहणी करण्यास तयार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय महसूल राज्यमंत्र्यांकडून चुकीचे उत्तर दिले जात आहे त्याबद्दल माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा प्रश्न येथे आम्ही महसूल मंत्र्यांना, महसूल विभागाला, विचारलेला आहे. यामध्ये क्र. 3 चा प्रश्न असा आहे की, मान सरोवरालगत सर्व्हे क्र. 192 मधील वन विभागाच्या ताब्यातील डोंगरात अनधिकृतपणे दगड खाणी सुरू आहेत हे खरे आहे काय ? सभापती महोदय, त्या भागातील सर्वच ठिकाणच्या खाणींचा विषय हा महसूल विभागाच्या अखत्यारित येतो. पण असे असतानाही पोलीस तक्रार केली त्याची माहिती त्यांनी घेतली, वन विभागाकडून माहिती घेतली असे उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले आहे. पण मग त्यांचे महसूल खाते केवळ टाळ्या वाजवित बसले होते का ? तुमच्या महसूल विभागाने याबाबत काय केले ? तुमच्या विभागाने या संबंधात काय अहवाल दिला?

सभापती महोदय, तेथे आज देखील खाणी सुरू आहेत आणि हे वर्तुळ इतके साधे नाही. महसूल विभागाच्या संगनमताने तेथे या खाणी सुरू आहेत. परंतु तरीही याबाबत वन विभागाने असे केले, पोलीस विभागाने असे केले असे सांगून उत्तर टाळले जात आहे. तेव्हा हा प्रश्न आपण रोखून धरावा आणि महसूल अधिकारी पाठवून याबाबत माहिती आपण घ्यावी. सभापती महोदय, आपण स्वत: जरी हे उत्तर वाचून पाहिल्यास आपल्यालाही त्यात पूर्णपणे टाळाटाळ केली असल्याचे लक्षात येईल.

(यानंतर श्री. सरफरे ..... जे 1 ..

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्दयावर बोलू इच्छितो. या सदनामध्ये मला या विषयावर प्रश्न विचारावयाचा होता. त्या भागामध्ये मोठया प्रमाणावर वन विभागाच्या जमिनी संपादित करुन त्याठिकाणी बेकायदेशीर खाणी चालू आहेत. भिवंडीचा रस्त्याच्या प्रश्नाच्या संदर्भात मी काल त्या भागामध्ये जाऊन पहाणी करुन आलो आहे. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सूचना केल्याप्रमाणे आपण या सदनातील चार माननीय सदस्यांची एक समिती नेमावी व त्या समितीने त्या भागामध्ये जाऊन प्रत्यक्ष पहाणी करुन या सदनाला अहवाल सादर करावा. तोपर्यंत आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदय चुकीच्या पध्दतीने उत्तर देत आहेत. त्यांच्या विभागानें काय कारवाई केली हे न सांगता पोलीस विभागाने काय कारवाई केली ते सांगत आहेत...

सभापती : सन्माननीय राज्यमंत्री महोदय, हा संपूर्ण प्रश्न महसूल विभागाशी संबंधित आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने करावयाच्या कारवाई संदर्भात आपल्या विभागाने कोणत्या यंत्रणेची मदत घेऊन कारवाई केली आहे त्यासंबंधी आपण सभागृहामध्ये सांगावे. आपण एक कार्यक्षम मंत्री असल्यामुळे आपणाकडून दिल्या जाणाऱ्या उत्तराने सदनातील माननीय सदस्यांचे समाधान होईल असेच आपण उत्तर द्यावे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, खरे म्हणजे भिवंडी शहरालगत हा सर्व्हे नंबर 192 अस्तित्वात नाही. सर्व्हे नंबर 192 हा मान सरोवर या भागापासून दीड किलोमीटर अंतरावर आहे. त्याठिकाणी कोणतेही खाणीचे काम सुरु नाही. तहसिलदारांनी तेथील वन विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन व प्रत्यक्ष त्याठिकाणी जाऊन पहाणी केली आहे व त्या अनुषंगाने हे उत्तर दिले आहे.

सभापती : सन्माननीय राज्यमंत्री महोदय, या सदनातील दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन या अधिवेशनकाळात त्या विभागातील माननीय सदस्यांना बरोबर घेऊन आपण प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन माननीय सदस्यांची खात्री करुन द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपणामार्फत माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, मी स्वत: आणि माझे सहकारी सदस्य माननीय श्री.मुझफ्फर हुसेन भिवंडी येथे गेलो होतो व तेथील रहिवाश्यांना जाऊन भेटलो. त्यांनी या संदर्भात आम्हाला निवेदन दिले आहे. सभापती महोदय, या संदर्भात आपण कारवाई करण्याचे आदेश शासनाला दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु त्याठिक्राणी मंत्रिमहोदयांची माननीय सदस्यांबरोबरची भेट ही सरप्राईज झाली पाहिजे. याचे कारण जर आपण त्यांना पूर्वसूचना देऊन गेलातर ते काम दोन दिवसात बंद होईल, आणि भेट दिल्यानंतर पुन्हा सुरु होईल. हे फक्त एक उदाहरण आहे. अशाप्रकारे कल्याणच्या भागामध्ये कितीतरी अनधिकृत खाणी सुरु आहेत. व त्याची रॉयल्टी घेतली जात आहे. यामागे फार मोठे स्कँडल आहे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण चांगला न्याय दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, मुझफ्फर हुसेन, जितेंद्र आव्हाड हे त्या भागातील लोकप्रतिनिधी आहेत. माझ्या माहितीप्रमाणे त्या ठिकाणी सर्रास खाणी सुरु आहेत. वन विभागाच्या क्षेत्रामध्ये दगडाच्या खाणीचे काम सुरु आहे. त्याठिकाणी वन विभागाला डिफॉरेस्ट्रेशन करावयाचे असेल तर महसूल विभागाकडून परवानगी घेतल्यानंतर ते करता येते. माझी आपणास विनंती आहे की, या सदनातील दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांची पूर्ण खात्री पटली आहे की, त्याठिकाणी महसूल विभागाच्या संगनमताने वन विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये खाणीचे काम सुरु आहे. सभागृहामध्ये माननीय सदस्य माहिती देत असतांना मंत्रिमहोदय याबाबतीत तहसिलदारांनी काय कारवाई केली हे सांगत आहेत हे योग्य नाही. याबाबतीत कोकण विभागाच्या आयुक्तांनी तीन दिवसात त्याठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी करुन त्यांनी आपला अहवाल सभागृहामध्ये सादर करावा अशाप्रकारचे आपण आदेश द्यावेत. त्याठिकाणी फार मोठया प्रमाणावर वन जमिनीची लूट सुरु आहे ती थांबविली जाईल, अन्यथा ती थांबणार नाही. याकरिता आपण आम्हाला संरक्षण द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24534 (पुढे सुरु....

श्री.संजय केळकर : मंत्री महोदयांनी या प्रश्नाकडे एवढे लाईटली पाहू नये. केवळ भिवंडी परिसरातील डोंगर पोखरुन दगड काढले जात नाहीत तर ठाणे परिसरामध्ये डोंगर दिसत होते तेही दगड उत्खननामुळे नाहीसे व्हायला लागलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, अनेक ठिकाणी डोंगर पोखरून अनधिकृतपणे दगड खाणी चालू आहेत. तेव्हा ठाणे परिसरातील अनधिकृत खाणींची पहाणी मंत्री महोदय करणार आहेत काय ? करणार असल्यास, किती दिवसात पहाणी करणार आहेत ? आज बेकायदेशीरपणे दगड खाणींचे काम चालू आहे त्यासंबंधीचा रिपोर्ट आयुक्तांकडून किती दिवसात मागविणार आहात ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अनधिकृत दगड खाणींच्या संदर्भाने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या संदर्भाने सभागृहातील सन्माननीय सदस्यांची समिती गठीत करावयाची, की या संदर्भात आयुक्तांकडून अहवाल मागवायचा ? याबाबत आपण निर्णय द्यावा. दगडाच्या उत्खननामुळे त्या परिसरातील वनाचा नाश होत असेल तर निश्चितपणे त्या संबंधात दोषी अधिकाऱ्यांवर, त्याचबरोबर चुकीची माहिती ज्यांनी दिली असेल त्यांच्यावर सुध्दा निश्चितपणे कठोर कारवाई करण्यात येईल. या संदर्भाने आपण निर्देशाप्रमाणे याबाबतची माहिती सभागृहाला देण्याचा मी प्रयत्न करीन.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, युतीच्या काळामध्ये अशाचप्रकारचा ठाणे परिसरामध्ये प्रश्न निर्माण झालेला असताना, माननीय शिवसेना प्रमुखांनी दगडाच्या खाणी बंद करण्याचे आदेश दिलेले होते. सन्माननीय मंत्री श्री.गणेक नाईक येथे उपस्थित आहेत. त्यांना याबाबतची माहिती आहे. त्याचप्रमाणे पेण आणि उरण परिसरातील डोंगर दगड खाणीमुळे नष्ट करुन टाकलेले आहेत. पेण, उरणच्या परिसरामध्ये 100-125 दगड खाणी आहेत या संदर्भात नेमक्या किती लोकांना अधिकृत परवानगी दिलेली आहे ?

श्री.उल्हास पवार : याच प्रश्नाच्या अनुषंगाने मला सुचवावयाचे आहे की, हा प्रश्न ठाणे जिल्ह्यापुरता असला तरी माझी विनंती आहे की, संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अनधिकृत खाणी आहेत. विमान दल विभागाने अनेक वेळेला सांगितले आहे की, या दगड खाणींमुळे विमान उतरताना आणि टेकऑफ करताना तांत्रिकदृष्ट्या अडचणी निर्माण होतात. त्यामुळे या संदर्भातील दगड खाणी बंद करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. याचा अर्थ असा आहे की, महाराष्ट्रातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24534 (पुढे सुरु....
श्री.उल्हास पवार (पुढे सुरु....

काही जमीनी लीजने दिलेल्या आहेत, त्या ठिकाणी अनधिकृत खाणी सुरू आहेत. तेव्हा आपण सर्व समावेशक अशी शासनाला सूचना केली तर अधिक बरे होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : शासनाने दगड खाणी सुरू करण्यास परवाननगी दिली असेल तर नागरीकरणापासून किती अंतरावर खाणी असाव्यात याबाबतचा निर्णय शासन घेईल काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, शासन आपल्या अखत्यारित असलेल्या सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत चालू असलेल्या कामांवर अनधिकृत खाणींमधून दगड आणले जात असतील तर त्या कामापासून अनधिकृत खाणीपर्यन्तचे लीड न देण्याचा निर्णय शासन घेईल काय ?

सभापती : या ठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अतिशय गंभीर प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्माननीय महसूल राज्यमंत्र्यांना मी सांगेन की, कोकण विभागाच्या महसूल आयुक्तांमार्फत येत्या आठवड्यामध्ये भिवंडीच्या परिसरातील खाणींची पाहणी करावी. त्याचबरोबर ठाणे आणि रायगड जिल्ह्याच्या सदर्भात सुध्दा महसूल आयुक्तांनी खाणींची पाहणी करावी. अशापध्दतीने अनधिकृत दगडांचे उत्खनन होत असेल तर अत्यंत कठोर पध्दतीची अंमलबजावणी महसूल विभागाने करावी.

डॉ.राजेंद्र शिंगणे : ठीक आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे तुळींज (ता. वसई, जि. ठाणे) येथील सर्व्हे नं. १२५ च्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामाविरुध्द करावयाची कारवाई

(६) * २७२८० श्री. जगदीश गुप्ता , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तुळींज (ता. वसई, जि. ठाणे) येथील सर्व्हे नंबर १२५ पै. या जमिनीवरील अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात सदर जमिनीची मोजणी करुन, मोजणी नकाशा तयार करणे तसेच सदर जमिनीच्या सर्व्हे नंबरची हद्द निश्चित करणेबाबत तहसीलदार वसई यांनी दिनांक १ जून, २००६ च्या पत्रान्वये तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, वसई, यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार तालुका निरीक्षक भूमी अभिलेख वसई यांनी अद्यापपर्यंत कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर कार्यवाही किती मुदतीत पूर्ण करण्यात येईल अशी अपेक्षा आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता : (१), (२) व (३)

तहसिलदार, वसई यांनी दि. २१.६.२००६ चे पत्राने अर्जदारांना मोजणी करुन घेणेबाबत कळविले आहे व सदर पत्राची प्रत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, वसई यांना पाठविली आहे. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, वसई यांनी अर्जदार यांना मोजणी फी भरण्याविषयी व जरुर ती कागदपत्रे सादर करणेविषयी दि. ३.३.२००७ चे पत्राने कळविले आहे. परंतू अर्जदारांनी अद्यापपर्यंत मोजणी फी व मोजणीचे अनुषंगाने लागणारी कागदपत्रे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, वसई यांचेकडे सादर न केल्याने मोजणीबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्यासंदर्भात सरकारने काय कारवाई केलेली आहे आणि पुढे काय कारवाई करण्याची सरकारची इच्छा आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मौजे तुळींज येथील सर्व्हे क्रमांक 125 या जमिनीवरील अनधिकृत बांधकामाचा हा प्रश्न आहे. या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात श्री. बाळमुकुंद सोपारवाला यांचे कुल मुखत्यारधारक श्री. सूर्यकांत राऊत यांनी तक्रार केली होती. सर्व्हे क्रमांक 125 चे दोन सात-बारा चे उतारे आहेत. एक श्री. बालमुकुंद सोपारवाला आणि दुसरे श्री. विष्णू गरेल याचे नावे सात-बारा चे उतारे आहेत. श्री. बालमुकुंद सोपारवाला यांचे कुल मुखत्यार श्री. सूर्यकांत राऊत यांनी तक्रार दिली होती की, श्री. प्रकाश चंद्र गहेरीलाल हिंगड यांनी अनधिकृत बांधकाम केले आहे. हे अनधिकृत बांधकाम नेमके कोणत्या सर्व्हे नंबरमध्ये आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यासंदर्भात चौकशी करण्याच्या संदर्भात ही तक्रार आलेली होती. या दोन सर्व्हे नंबरमध्ये कोणाच्या क्षेत्रामध्ये हे अनधिकृत बांधकाम आहे हे अगोदर तपासण्याची गरज आहे. हे अनधिकृत बांधकाम तपासण्यासाठी तहसिलदाराच्या माध्यमातून त्या ठिकाणी टी.आय.एल.आर. यांना पत्र दिलेले होते. टी.आय.एल.आर. यांना पत्र दिल्यानंतर दोन दिवसात चौकशी होणार आहे. 30 तारखेला मोजणी आहे. अनधिकृत बांधकाम कोणाच्या क्षेत्रामध्ये आहे याची माहिती मिळाल्यानंतर ....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला विनंती करावयाची आहे. हा आपला आणि सभागृहाचा अवमान आहे. या ठिकाणी तारांकित प्रश्न उपस्थित केल्यानंतर महसूल खाते मोठ्या हुशारीने काम करावयास लागले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, तक्रारकर्त्याने अजून जमीन मोजणीची फी भरलेली नाही. अशा प्रकारचे तांत्रिक उत्तर दिलेले आहे. आपल्याकडे मोजणीसाठी साधने नाहीत, मोजपट्टी नाही एवढे आपले खाते भुक्कड झाले आहे काय ? या ठिकाणी प्रश्न विचारल्यानंतर हे खाते ती मोजणी करण्यास तयार नाही. त्यांनी जून महिन्यामध्ये अर्ज केलेला आहे परंतु मोजणीचे पैसे भरलेले नाहीत असे उत्तरात सांगितलेले आहे. या ठिकाणी तारांकित प्रश्न झाल्यानंतर खाते मोजणी करु शकत नाही एवढी खात्याची वाईट परिस्थिती झालेली आहे काय ? विभागाने मोजणी का केली नाही ? या ठिकाणी तांत्रिक उत्तर देऊन माननीय मंत्रिमहोदय माननीय सभापतींचा अवमान करीत आहेत. विभागाने मोजणी करुन अनधिकृत बांधकाम झालेले आहे की नाही हे सांगावे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ही सरकारी जमीन नसून खाजगी जमीन आहे. ही खाजगी जमीन असल्यामुळे ज्यांना जमीन मोजावयाची असेल त्यांनी अर्ज करुन पैसे भरण्याची गरज आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये अनधिकृत बांधकामास संरक्षण देण्याचा प्रयत्न आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : मला अनधिकृत बांधकामाला संरक्षण द्यावयाचे नाही. त्या ठिकाणी ज्यांनी तक्रार केली त्यांनी निदान त्या ठिकाणी जमीन मोजण्यासबंधी अर्ज तरी करावयास पाहिजे. त्यांनी कालच अर्ज केला आणि कालच पैसे भरले. कालच त्यांनी पैसे भरल्यामुळे टी.आय.एल.आर.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 27280 ..... डॉ. राजेंद्र शिंगणे ....

यांनी 30 तारीख दिलेली आहे. 30 तारखेला मोजणी पूर्ण होईल आणि कोणाच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकाम झालेले आहे याचा निर्णय त्या ठिकाणी होणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यांनी कालच अर्ज केला असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. त्या ठिकाणी तहसिलदार, वसई यांनी दिनांक 21 जून, 2006 च्या पत्राने अर्जदारांना मोजणी करुन घेणेबाबत कळविले आहे असे उत्तरात म्हटले आहे. त्यांनी 1 जून, 2006 ला तहसिलदारांना पत्र दिले होते. ती मोजणी करण्यामध्ये टाळाटाळ करण्यात आली. त्याबाबत उशीर करण्यात आला. दिनांक 6.2.2007 रोजी तारांकित प्रश्न विचारल्यावर मार्च महिन्याच्या 3 तारखेला त्यांना पैसे भरण्याबाबत नोटीस दिली. 3 मार्चला नोटीस दिली याचा अर्थ भूमी अभिलेख अधिकाऱ्यांनी 9 महिने प्रकरण प्रलंबित ठेवले. हा तारांकित प्रश्न आला नसता तर 3 मार्चला पैसे भरण्याची नोटीस दिली गेली नसती. 1 जूनला तहसिलदार आदेश देतात आणि 3 मार्चला भूमी अभिलेख अधिकारी पैसे भरण्याची नोटीस देतात. हा विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, तहसिलदारांकडे अर्ज दिल्यानंतर टी.आय.एल.आर. यांच्याकडे मोजणी करण्याचे अधिकार असतात.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या पश्नांच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येईल. या प्रकरणी विलंब का झाला याचीही कारणे शोधण्यात येतील आणि तहसिलदारावरही योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना श्रध्दांजली

सभापती : देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव या स्वातंत्र्य नेत्यांनी हौतात्म्य पत्करले. त्या घटनेला आज दिनांक 23.7.2007 रोजी 75 वर्षे पूर्ण होत आहेत. या थोर स्वातंत्र्य हुतात्म्यांना आपण सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहूया.

(सदस्य उभे राहातात)

सदस्यांनी खाली बसावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामकाजपत्रिकेवरील बाब क्रमांक 9 वरील नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील बाब क्रमांक 9 वर दर्शविण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आज ऐवजी दिनांक 26.3.2007 रोजी घ्यावा अशी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी विनंती केली आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : हा प्रस्ताव प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित केला जातो आणि कोणत्या ना कोणत्या कारणाने तो पुढे जातो. आज मला संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, आज माननीय मुख्यमंत्री कामात व्यस्त असल्यामुळे आणि सभागृहापुढे जास्त कामकाज असल्यामुळे हा प्रस्ताव नंतर घ्यावा. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, सभागृहाला हे मान्य असेल तर हा प्रस्ताव नंतर घेण्यास माझीही काही हरकत नाही.

सभापती : सदरहू प्रस्ताव दिनांक 26.3.2007 रोजी घेण्यात येईल.

श्री. भास्कर जाधव : कामकाजपत्रिकेमध्ये ह्या प्रस्तावाचा क्रम मध्येच ठेवावा.

सभापती : चर्चा व्यवस्थित होईल अशा रीतीने हा प्रस्ताव घेण्यात येईल.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या मुद्यावर मी या ठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. परवाच या सभागृहामध्ये उसाच्या प्रश्नावर चर्चा झाली. अतिरिक्त ऊस घेण्यासाठी आम्ही लवकरात लवकर निर्णय करु असे शासनाच्या वतीने सांगण्यात आले होते. परंतु अतिरिक्त ऊस साखर कारखान्यांना घेण्याची परवानगी दिलेली नाही. हा अतिरिक्त ऊस शेतक-यांच्या शेतात उभा आहे. परिणामी लातूर जिल्ह्यामध्ये जवळपास 27 ठिकाणी ऊस उत्पादक शेतक-यांनी रस्त्यावर उतरुन रास्तारोको सुरु केलेला असून त्या भागामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. या बाबतीत सभागृहामध्ये ताबडतोबीने निवेदन झाले नाही तर आज दिवसभरामध्ये काही हिंसक प्रकारच्या घटना त्या ठिकाणी घडू शकतील. म्हणून याबाबतीत शासनाने निवेदन केले तर त्याचा संदेश लातूर जिल्ह्यामध्ये जाऊन शेतक-यांचा असंतोष निश्चितपणे थांबेल, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

....नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी या विषयाचे गांभीर्य सन्माननीय सहकार मंत्र्यांच्या निदर्शनास आणावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा विषय अत्यंत गंभीर आहे. याबाबत शासनास निवेदन करण्यास सांगावे.

सभापती : सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी साखरेच्या प्रश्नाच्या अनुषंगाने, विशेषत: ऊस उत्पादक शेतकरी त्यांच्या शेतातील ऊस तातडीने गाळप व्हावा यादृष्टीने विवंचनेत आहेत. याबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून लातूर जिल्हयात काही ठिकाणी आणि महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी या प्रश्नाबाबत शासन कोणत्या पध्दतीने कारवाई करणार आहे त्यासंबंधी सन्माननीय सहकार मंत्र्यांना निवेदन करण्यास सांगावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सहकारमंत्र्यांना आपल्या आदेशाप्रमाणे सूचना करण्यात येईल आणि निवेदन करण्यास सांगण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. या प्रश्नासंबंधी निवेदन आज केले तर अधिक चांगले होईल. आज निवेदन करण्याचा प्रयत्न करावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : होय.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : काल देखील ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणलेली असून पूरक असलेली कागदपत्रे देखील देण्यात आली आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, तात्काळ निवेदन झाले पाहिजे. आज तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून उद्या आणखी 10 शेतकरी आत्महत्या करतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, आज संध्याकाळपर्यंत निवेदन करावे असे मी शासनाला निदेश दिले आहेत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या पाहता निश्चितपणे ही बाब गंभीर आहे. म्हणून सहकार विभागाच्या वतीने या संदर्भात सत्वर निवेदन करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : सन्माननीय मंत्रीमहोदय, आज सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत या संदर्भातील निवेदन करण्यात यावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज संपण्यापूर्वी या संदर्भातील निवेदन करण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मिरा-भाईंदर महापालिकेच्या ज्या शाळा आहेत, त्या सर्व शाळांमध्ये काम करणाऱ्या सर्व शिक्षकांचे वेतन बंद झाले आहे. त्याठिकाणच्या शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी आणि महापालिका आयुक्त यांच्यामध्ये वाद निर्माण झाला. प्रशासन अधिकारी हे शासननियुक्त अधिकारी आहेत. आयुक्त महोदयांनी त्यांना पदावरुन दूर करणे आणि त्यांच्या कार्यालयाला सील ठोकणे असे प्रकार झाले असून अन्य अधिकाऱ्यांना सह्यांचे अधिकार दिल्यामुळे शिक्षकांचे वेतन रोखून ठेवले आहे. त्यामुळे शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनाचा आणि निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. आपल्या माध्यमातून ही विशेष बाब मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी शिक्षकांना पगार दिलेला नाही. तसेच सूर्यवंशी यांना निलंबित केलेले आहे. निलंबन करण्याचे अधिकार आयुक्तांना नाहीत. याबाबत सूर्यवंशी यांनी स्पष्टीकरणही मागविलेले आहे. मधील काळात त्यांचा जो पगार काढण्यात आला होता तो थांबविण्याचे कामही आयुक्तांनी केलेले आहे. आयुक्तांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केलेला आहे. येथील शिक्षकांना एक महिन्यापासून पगार मिळालेले नाहीत. म्हणून तातडीने शिक्षकांचे पगार देण्यात यावे तसेच तातडीने आयुक्तांवर शिक्षण मंत्र्यांनी कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी "महानगर "या सायंदैनिकाने जी बातमी छापलेली आहे त्या बातमीमुळे या सदनाचा, मंत्रीमंडळामध्ये काम करणा-या माननीय मंत्रीमहोदयांचा तसेच सन्माननीय सदस्यांचा अवमान झालेला आहे. एकूणच ही बातमी वैधानिक पध्दतीला आव्हान देणारी आहे." मंत्र्यांच्या बंगल्यात रंगला ऐका दाजिबाचा फड "या शिर्षकाखाली बातमी छापलेली आहे. सभापती महोदय, अशा प्रकारची बातमी छापून मंत्रीमहोदयांना, सदस्यांना बदनाम करण्याची मोहीम महानगरच्या संपादकाने चालवलेली दिसते. या सदनाचे उपसभापती माननीय श्री. वसंत डावखरे साहेबांचा या बातमीत उल्लेख करण्यात आलेला आहे. माननीय उपसभापतींचा उल्लेख अशा प्रकारे करणे हे बरोबर नाही. महाराष्ट्र शासनाची शासन यंत्रणा चालविणा-या व्यक्तींविरुध्द बातमी छापून, लोकांची दिशाभूल करण्याचे काम महानगर या सायंदैनिकाने केलेले आहे. त्यामुळे संबंधित संपादकांविरुध्द कृती करण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये 20-25 दैनिके व सायंदैनिके आहेत. परंतु महानगर या सांयदैनिकाने जी बातमी दिलेली आहे तशी बातमी इतर कोणत्याही दैनिकाने दिलेली नाही. अशा प्रकारच्या काही तरी बातम्या छापून खप वाढविण्याचे काम केले जात आहे. या सायंदैनिकाचा खप मोठया प्रमाणात आहे अशीही वस्तुस्थिती नाही. परंतु 10 लोकांच्या हातात ही बातमी गेली तर कर्णोपकर्णी ही बातमी फार मोठया प्रमाणात पसरु शकते व त्याचा परिणाम वेगळा होऊ शकतो. माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांनी आपल्या बंगल्यावर काही सन्माननीय मंत्रीमहोदयांना तसेच काही सन्माननीय सदस्यांना जेवणाचे आमंत्रण दिले होते. नागपूर अधिवेशनात सुध्दा माननीय डावखरे साहेब अशाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

प्रकारचे आमंत्रण देत असतात. परंतु या सायंदैनिकाने या बातमीला जे स्वरुप दिलेले आहे ते फार भयानक आहे. या दैनिकात छापण्यात आले आहे की, भारनियमानासारख्या प्रश्नाने जनता भरडली जात असतांना महाराष्ट्रातील मंत्री मात्र बेधुंद झाले आहेत. अनेक मंत्र्यांनी शुक्रवारची रात्र विधान परिषदेचे उपसभापती वसंत डावखरेंच्या "तीन अ, मादाम कामा रोड" या सरकारी निवास्थानी कोठी भरवून जागवली. राज्य विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना "ऐका दाजिबा च्या तालात या मंत्र्यांनी नृत्यांगनावर लाखो रुपयांची उधळण केली. अत्यंत गुप्तपणे आयोजलेल्या या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील यांच्यासह अनेक ज्येष्ठ मंत्र्यांनी हजेरी लावली अशी जोरदार चर्चा सुरु आहे, अशा प्रकारची बातमी छापलेली आहे. सभापती महोदय, या बातमीच्या संदर्भात मला माननीय सभापती महोदयांना विनंती करावयाची आहे की, या प्रकरणाची पूर्ण चौकशी होण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची विपर्यस्त बातमी छापण्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात आवश्यकता वाटल्यास हक्कभंग प्रस्ताव सुध्दा देण्याची आमची तयारी आहे. अशा पध्दतीने कोणावरही बेधडक आरोप करणे, बदनामी करणे, सदनाच्या माननीय पीठासीन अधिका-यांचा अवमान करणे, सदनाच्या सन्माननीय सदस्यांचा अवमान करणे बरोबर नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

काहीही असले तरी "महानगर"मध्ये छापून आलेल्या बातमीमध्ये माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरे यांचा तसेच मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांचा व लोकप्रतिनिधींच्या नावाचा उल्लेख आहे. तेव्हा शासनाने या प्रकरणाची पोलीस विभागामार्फत चौकशी करावी. त्यासंबंधीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर महानगर वृत्तपत्राच्या संपादका विरुध्द हक्कभंगाची सूचना द्यावयाची किंवा कसे याचा विचार करु. आता छापून आलेल्या बातमीवर हक्कभंगाची सूचना देता येणार नाही याची मला जाणीव आहे. या सदनाची प्रतिष्ठा राखावी, मंत्रिमहोदयांची व लोकप्रतिनिधींची प्रतिष्ठा राखावी हा माझा मूळ उद्देश आहे. म्हणून औचित्याच्या माध्यमातून या गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधले आहे.

सभापती : शासनाने या गंभीर बाबीची चौकशी करावी. मी या बाबीची गांभीर्याने नोंद घेतलेली आहे. त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही होईल. या सदनाचे सार्वभौमत्व आणि सन्माननीय सदस्यांची प्रतिष्ठा जतन होईल यादृष्टीने जरुर योग्य ती काळजी घेण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधी निर्णय व्हावा अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मागील नागपूर अधिवेशनात दिनांक 12 डिसेंबर 2006 रोजी एस.ई.झेड संदर्भात एक शिष्टमंडळ माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वासन दिले होते की, भूसंपादनाची प्रक्रिया ताबडतोब थांबविण्यात येईल. परंतु अजूनपर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया थांबलेली नाही. एस.ई.झेड.च्या विरोधात शेतकऱ्यांनी रायगड जिल्ह्यातील वडखळ येथे आंदोलन सुरु केले आहे. त्याठिकाणी एस.ई.झेड च्या विरोधात असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे तेथील वातावरण तंग झालेले आहे, तणावग्रस्त झालेले आहे. भूसंपादनाची प्रक्रिया ताबडतोब थांबावी यासाठी शासनान ताबडतोब निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एस.ई.झेड.चा प्रश्न संपूर्ण देशाला भेडसावत आहे. या एस.ई.झेड मुळे नंदीग्राम येथे दुर्दैवी घटना घडली. मागील अधिवेशनात या विषयाच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. एस.ई.झेड प्रकरणी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फितविण्याचे काम सुरु आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात रिलायन्सचे अधिकारी बसून हे सर्व उद्योग करीत आहेत. प्रा.एन.डी.पाटील यांनी सूचना दिलेली आहे की, महाराष्ट्रात सुध्दा नंदीग्राम घडेल. तेव्हा या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने ताबडतोब निवेदन करणे आवश्यक आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. एस.ई.झेडच्या विरोधात कृती समितीने रायगड जिल्हयात आंदोलन सुरु केले आहे. त्यामुळे तेथे तणावग्रस्त परिस्थिती निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. एसईझेड संदर्भात शासनाने निश्चित भूमिका जाहीर केल्याशिवाय हा तणाव कमी होणार नाही. तेव्हा शासनाने आजच्या आज भूमिका स्पष्ट करावी आणि एसईझेडचा प्रस्ताव पुढे रेटणार नाही अशाप्रकारचे ठोस आश्वासन शासनाने सभागृहाला द्यावे अशी माझी मागणी आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, एसईझेड संदर्भात सर्वांच्या भावना तीव्र आहेत. महाराष्ट्रात नंदीग्राम होऊ द्यायचा नसेल तर शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. आता एसईझेड संदर्भात रायगड जिल्ह्यात आंदोलन सुरु आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर जमिनी बळकावण्याचे प्रकार सुरु आहेत. तेथील लोकांच्या भावना तीव्र झालेल्या आहेत. तेव्हा शासनाने आजच्या आज निवेदन करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, एस.ई.झेड.च्या संदर्भात माननीय पंतप्रधानांनी भू-संपादनाच्या प्रक्रियेमध्ये शासन सहभागी होणार नाही, अशी सूचना केली आहे. त्यानुषंगाने राज्य सरकारनेही तीच भावना समोर ठेऊन त्यांवर कार्यवाही केली पाहिजे, असे मला वाटते.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एस.ई.झेड.चा प्रश्न संपूर्ण देशामध्ये सुरु आहे. या प्रश्नामुळे लोकसभेतील कामकाज एक आठवडा बंद होते. शेवटी, या प्रश्नी माननीय पंतप्रधानांनी असा निर्णय घेतला की, जोपर्यंत शेतकरी आणि खरेदी करणारे भांडवलदार यांच्यामध्ये समझोता व समाधान होत नाही तोपर्यंत खरेदी विक्री थांबवावी, असे आदेश त्यांनी दिले. महाराष्ट्र शासनामध्येही त्याबाबतीत भांडवलदारांना खुश करण्यासाठी किंवा पैसे मिळविण्यासंबंधी अशाप्रकारे काही चालले असेल तर याबाबतीत महाराष्ट्र शासनाने एस.ई.झेड.ची संपूर्ण खरेदी विक्री थांबवावी. याबाबतीतील धोरणात्मक निर्णय झाल्यानंतरच पुढील पाऊल टाकावे, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे. तसेच, याबाबतीत आंदोलने होऊ देऊ नयेत व आपण गरीब लोकांवर गोळया घालू नयेत. महाराष्ट्राचे व देशाचे नेते, माननीय श्री.शरदचंद्रजी पवार यांनीही अशाप्रकारे जमिनी खरेदी करणे योग्य होणार नाही, अशी सूचना केलेली आहे. त्यामुळे ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊनच याबाबतीत महाराष्ट्र शासनाने निर्णय घ्यावा व भांडवलदारांना खुश करण्याचे धोरण स्वीकारु नये, अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एस.ई.झेड.च्या मुद्यासंबंधी महाराष्ट्र राज्यातही आंदोलन पेटण्याची लक्षणे दिसत आहेत. या प्रश्नी रायगड जिल्हयातील शेतकरी आंदोलन करुन रस्त्यावर उतरत आहेत. याबाबतीत माननीय पंतप्रधानांची वेगळी भूमिका, आपल्या राज्य सरकारची वेगळी भूमिका व या प्रश्नी माननीय मुख्यमंत्र्यांनी अनेक ठिकाणी केलेली स्टेटमेंटस्मुळे लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे. त्यामुळे याबाबतीतील महाराष्ट्र शासनाची स्पष्ट भूमिका समोर येणे आवश्यक आहे. जोपर्यंत शेतकरी समाधानी होणार नाहीत, तोपर्यंत कुठल्याही शेतकऱ्याची जमीन जबरदस्तीने बळकाऊ नये वा उद्योगपतींना संरक्षण देऊ नये, अशा प्रकारची भूमिका राज्य सरकारने घेण्याची गरज आहे. त्यामुळे यासंबंधी राज्य सरकारने ताबडतोबीने खुलासा करुन आपले धोरण स्पष्ट करावे व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी माझी विनंती आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी एस.ई.झेड.संबंधी जी भूमिका मांडली, तीच राज्य शासन आणि केंद्र शासनानेही भूमिका वारंवार लोकांसमोर मांडलेली आहे. कुठल्याही प्रकारची सक्ती शेतकऱ्यांवर करावयाची नाही, अशा प्रकारचे राज्य शासनाचे धोरण आहे. विकासक आणि शेतकरी यांच्या एकमेकांच्या समन्वयाने, त्यांच्या जमिनीस किंमत देण्यासंदर्भात किंवा पॅकेज देण्याच्या संदर्भात त्यांचे समाधान होईपर्यंत सरकारच्या वतीने कुठल्याही प्रकारची सक्ती होणार नाही. यासंदर्भात एरिया नोटीफाय कराव्या लागतात आणि त्यानंतर नोटीफिकेशन करण्यासाठी पुढची कार्यवाही करावी लागते. ज्या भागामध्ये एस.ई.झेड. प्रस्तावित आहेत, त्याचे नोटीफिकेशन काढल्याशिवाय त्या पुढील जी कार्यवाही असते, ती सरकार करणार नाही, अशा प्रकारची भूमिका राज्य सरकारने स्वीकारलेली आहे. शेतकऱ्यांचे योग्य पध्दतीने पुनर्वसन आणि त्यांना बाजारभावाने जमिनीची किंमत देण्याच्या संदर्भात त्यांनी आपापसात वाटाघाटी कराव्यात व त्यातून मार्ग काढावा, अशा प्रकारची भूमिका या सरकारची असून सरकार जमिनीचे ॲक्वीझेशन करणार नाही. 80 टक्के एरिया संपादित केला व एखादा पॅच राहिला असेल तर त्याचा निर्णय सरकार नंतर करेल.

श्री.जयंत प्र. पाटील (बसून) : दु-पिकी जमिनीचे काय ?

श्री.विलासराव देशमुख : दु-पिकी जमीन घ्यावयाची नाही, हेही धोरण ठरलेले आहे. माननीय जयंतराव त्याठिकाणी असताना, शेतकरीविरोधी धोरण चालेल, असे मला वाटत नाही. त्यांच्या सल्ल्यानेच पुढील गोष्टी घडतील.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखाची नाही

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, श्री.रतन आसाराम कुंडकर या शेतक-याच्या सर्व्हे क्रमांक 12 या शेतातील एक हेक्टर ऊस कार्यक्रमाची तारीख उलटून गेल्यामुळे घेतला गेला नाही आणि बाजूच्या शेतक-याचा ऊस घेतला गेला. यामुळे सदर शेतक-याने तक्रार केली होती. तसेच, सदर शेतक-यांने जी तक्रार केली आहे त्यामध्ये ऊस घेतला गेला नाही तर आत्मदहन करीन, असे नमूद केले आहे. आता प्रश्न असा निर्माण झाला आहे की, सदर शेतकरी पोलिसांना सापडलेला नाही. तारीख उलटून गेलेली आहे. कालपासून त्या शेतक-याच्या ऊसाच्या फडाला पोलिसांनी वेढा दिलेला आहे. शेतकरी सापडत नाही म्हणून पोलिसांनी त्याच्या शेताला वेढा देणे, हा मार्ग असू शकत नाही. सदर शेतक-याचा ऊस जर सुंदरनगर कारखाना नेत नसेल तर तो दुस-या कारखान्याने घेऊन जावा. अशाप्रकारे ऊसाच्या फडाला वेढा देऊन पोलीस काय करणार आहेत ? यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झालेली आहे. तसेच, माजी आमदार, श्री.केशवराव आंधळे यांनी वृत्तपत्रात बातमी दिली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत, माजी आमदार, श्री.केशवराव आंधळे यांनी दिलेल्या वृत्तपत्रातील निवेदनाची प्रत तसेच इतर संबंधित कागदपत्रे मी आपल्याला सादर करते.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याविषयी परवानगी मागितली आहे. सदर औचित्याच्या मुद्यातील विषय त्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावाच्या चर्चेच्या वेळी देखील उपस्थित केला होता व त्यासंबंधीची कागदपत्रे माझ्याकडे दिली होती आणि सदर कागदपत्रे चौकशीसाठी शासनाकडे सुपूर्द करावीत, अशी विनंती केली होती.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला एवढीच विनंती करतो की, मला निवडणूक आयोगाच्या कुठल्याही बाबीसंदर्भात बोलावयाचे नाही आणि आरोपही करावयाचे नाहीत. नागपूर येथील प्रतापनगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार प्राप्त झालेली आहे, सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार प्राप्त झाली आहे तसेच या तक्रारीची प्रत मलाही प्राप्त झाली आहे. या अनुषंगानेच मी विशेष उल्लेखाव्दारे माझे म्हणणे मांडण्याची अनुमती आपल्याकडे मागितली होती, ती आपण नाकारली आहे. अनुमती देणे किंवा नाकारणे हा आपला अधिकार आहे, त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. परंतु, या प्रकरणी ज्या लोकांची फसवणूक झाली आहे त्यांची न्याय बाजू मांडण्याची संधी मला औचित्याच्या मुद्याव्दारे आपण द्यावी, अशी माझी विनंती आहे. कारण असे आहे की, काही मुद्दे हे विरोधी पक्षाला गैरसोयीचे असू शकतात तर काही मुद्दे हे सत्ताधारी पक्षाला गैरसोयीचे असू शकतात. परंतु, या सभागृहाचा सदस्य म्हणून माझ्या भावना व्यक्त करण्याचा वैधानिक अधिकार मला लोकशाहीने दिलेला आहे, त्या अधिकारावर कळत-नकळत अतिक्रमण होणे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य होणार नाही. आपण यासंदर्भातील माझा विशेष उल्लेख नाकारला, आपल्या निर्णयाचा मी सन्मान करतो, त्या निर्णयावर काही बोलणे हे बरोबर होणार नाही. आता सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, माझ्या व्यथा मी त्यांच्या कानावर घालणार आहे. मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या अभिनंदनाच्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असतांना आपल्याकडे जी कागदपत्रे पाठविली होती ती सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांपर्यन्त पोहोचली नाहीत, असे मला त्यांनी सांगितले आहे. हे बरोबर नाही. पद्धत अशी आहे की, सन्माननीय सदस्यांनी माननीय पीठासीन अधिका-यांकडे कागदपत्रे दिल्याबरोबर पीठासीन अधिकारी सदर कागदपत्रांचे अवलोकन करतात व लगेच सभागृहातच ती कागदपत्रे संबंधित मंत्रीमहोदयांकडे पाठवितात.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे दिलेली कागदपत्रे माझ्या कार्यालयामार्फत संबंधित मंत्र्यांकडे जातात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी गेल्या अकरा वर्षांपासून या सभागृहाचा सदस्य आहे. माझा असा अनुभव आहे की, ...

सभापती : मी गेली 29 वर्षे विधानसभा आणि विधानपरिषद या सभागृहात आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या 29 वर्षाच्या सभागृहातील कर्तृत्वाचा गौरव करुन एकच विनंती करतो की, मंत्रीमहोदयांना आपल्यामार्फत आम्ही काही कागदपत्रे देतो, ती पीठासीन अधिकारी बघतात आणि लगेच ती संबंधित मंत्रीमहोदयांना देतात. ठीक आहे. आपल्या कार्यालयामार्फत कागदपत्रे जाऊ द्यावीत, आमची काही हरकत नाही. परंतु, मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास हरकत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. मी हा औचित्याचा मुद्दा सभागृहात मांडत असतांना माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, याचा मला आनंद आहे.

सभापती महोदय, नागपूर येथील महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये काही राजकीय कार्यकर्त्यांची फसवणूक झाली आहे. सन्माननीय काँग्रेस प्रदेश अध्यक्षांनी असे सांगितले की, 26 उमेदवार होते, त्यांना 'अे' व 'बी' फॉर्म डयुप्लिकेट दिले गेले, खोटी स्वाक्षरी असलेले दिले गेले. जी अधिकृत उमेदवारांची यादी घोषित करण्यात आली होती ती माझ्याकडे आहे, परंतु ती वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. या 26 उमेदवारापैकी 19 उमेदवारांना जे 'अे' व 'बी' फॉर्म दिले गेले ते डयुप्लिकेट होते तसेच लेटरहेडस् खोटी होती व त्यावर जनरल सेक्रेटरी, श्री.नितीन देशपांडे यांची खोटी सही होती.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

मला यातील राजकारणाच्या अधिक खोलात जावयाचे नाही.

श्री.जयंत पाटील : तुम्हाला फायदा झाला.

श्री.नितीन गडकरी : अशा प्रकारचे राजकारण मी करीत नाही व आमच्या माननीय मुख्यमंत्री साहेबांना देखील ते आवडत नाही. या प्रकरणात जे अे व बी फॉर्म दिले गेले होते, ते डुप्लीकेट दिले गेले होते. गुन्हा करणारा प्रधानमंत्री किंवा कितीही मोठा व्यक्ती असला तरीसुध्दा तो कायद्याच्या दृष्टीने गुन्हेगारच असतो. हे आपल्या घटनेने सांगितलेले आहे. या प्रकरणामध्ये हे जे 19 लोक आहेत, त्यांची फसवणूक झालेली आहे, त्यापैकी तालेवार नावाची व्यक्ती ही कॉंग्रेस पक्षाचा पदाधिकारी आहे. या प्रकरणाची तक्रार एरंडोल तालुक्यामधील प्रतापनगर पोलीस स्टेशनमध्ये करावयाला गेले असता तेथील अधिकारी तक्रार नोंदवून घ्यावयाला तयार नाही. तक्रार कर्त्यांनी माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे तक्रार केलेली आहे. या प्रकरणात फसवूणक झालेल्या 18 लोकांचे नाना ठाकरे नावाच्या व्यक्तीने ॲफिडेव्हिट व कागदपत्रे तयार करुन ठेवलेले आहेत. खोटया सहया केलेले, खोटे लेटरहेड पाच पाच लाख रुपयांना विकून सदर 18 व्यक्तींची फसवणूक झालेली आहे. फसवणूक केलेले उमेदवार जरी कॉंग्रेस पक्षातील असले तरी सुध्दा ते प्रथम या देशाचे नागरिक आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आपण पूर्ण ऐकून घ्यावे. जर कॉंग्रेस पक्षाच्या नावावर खोटया सहया करणारे, फसवणूक करणारे कोणी असतील तर ते गुन्हेगार आहेत. यासंदर्भामध्ये माझी अशी विनंती आहे की, गुन्हेगारांना लवकरात लवकर शासन हे झालेच पाहिजे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचा मला अभिमान आहे, त्यांनी मला या प्रकरणाच्या संदर्भात अतिशय बाणेदारपणे सांगितले की, याबाबतीत जर ठोस पुरावे सापडले तर शासन कोणालाही पाठीशी घालणार नाही. माझा माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल देखील विश्वास आहे. मी या संदर्भातील जी कागदपत्रे माननीय सभापतींना दिली त्याचा प्रत्येकी एक - एक संच मी अनुक्रमे माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना सुध्दा देण्याची व्यवस्था लवकरात लवकर करीन. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, यासंदर्भात स्पेशल सी.आय.डी. चौकशी करण्याचे आदेश देण्यात येऊन चौकशीमध्ये जे कोणी गुन्हेगार असतील, ज्यांनी गरीब लोकांची फसवणूक करुन पाच लाख रुपयांना अे व बी फॉर्म विकलेले आहेत, खोटया लेटरहेडवर खोटया सहया करुन गंभीर गुन्हे केलेले आहेत. यासंदर्भात गुन्हेगारांवर नॉन बेलेबल ऑफेन्स रजिस्टर करण्यात

S -2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP/

13:30

श्री.नितीन गडकरी.....

यावेत. वेळप्रसंगी व्यक्ती कितीही मोठी असली तरी तिच्या कडक कारवाई करावयाला मागे पुढे पाहू नये, ही कारवाई जर शासनाने त्वरित केली तर लोकांचा लोकशाहीवरील विश्वास आणखी दृढ होण्यास मदत होईल. न्यायप्रिय आणि लोकशाहीनिष्ठ असलेले आमचे माननीय मुख्यमंत्री यासंदर्भात कुठलीही योग्यप्रकारची कारवाई केल्याशिवाय राहणार नाहीत, याची मला खात्री आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब सभागृहाचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सदस्य आहेत. वेळो वेळी ते सभागृहामध्ये चांगली भूमिका मांडत असतात. त्यातून आमच्यासारख्या नवीन सन्माननीय सदस्यांना मार्गदर्शन, दिशा आणि प्रेरणा मिळते. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो विषय उपस्थित केला, त्यासंदर्भात मला नम्रपणे सांगावयाचे आहे की, ए, बी फॉर्म देणे ही पक्षांतर्गत बाब आहे. ए, बी फॉर्म काँग्रेस पक्षामध्ये दिला जातो आणि भारतीय जनता पक्षामध्ये देखील दिला जातो. मी इतर पक्षांच्यासंदर्भात उल्लेख करीत नाही. सभागृहामध्ये हा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. परंतु आता निवडणुका संपलेल्या आहेत. निवडणूक आयोगासमोर हा विषय आहे. मला नम्रपणे सांगावयाचे आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील .....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय श्रीमती प्रभा राव नागपूरच्या आहेत. त्यांच्याबद्दल मला आदर आणि सन्मान आहे. त्यांच्याबद्दल मला टीका करावयाची नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांबद्दलही मला आदर आणि सन्मान आहे. मी कोणाचाही उल्लेख केलेला नाही. बोगस फॉर्म तुमच्या पक्षाने दिलेले आहेत, असा मी मुळीच उल्लेख केलेला नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्यांनी हा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला होता. त्यावर माननीय गृहमंत्र्यांनी स्टेटमेंट केले होते. हा विषय आता संपलेला आहे. माझी सन्माननीय सदस्यांना अशी विनंती आहे की, पुन्हा पुन्हा हा विषय उपस्थित करु नये.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, उपहासात्मक शैलीमध्ये भाषण करणारे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब यांच्या मला एवढेच लक्षात आणून द्यावयाचे आहे की, त्यांनी असे सांगितले की, संबंधित कागदपत्रे मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे दिलेली आहेत. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी असे सांगितलेले आहे की, या प्रकरणाची डी.आय.जी.मार्फत चौकशी करण्यात येईल. आता हा विषय संपलेला आहे. त्यामुळे This question does not arise again in this House असे माझे मत आहे.

सभापती : औचित्याच्या मुद्याद्वारे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी या विषयासंबंधी आपले म्हणणे मांडले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यांनी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना या विषयासंबंधी विचारणा केली होती. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिलेले आहे. मला असे वाटते की, आपण ही चर्चा येथेच थांबवू या आणि पुढील कामकाज घेऊया.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आज आपणाकडे दिलेली कॉपी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे देण्यात यावी. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मला काल असे सांगितले की, माझ्याकडे अजून ती कॉपी आलेली नाही. शक्य होईल तेव्हा ती कॉपी आपण त्यांच्याकडे पाठवावी.

सभापती : मी आजच ती कॉपी माननीय उपमुख्यमंत्र्यांकडे पाठवितो.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या बीजगणित व भूमिती या विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रश्न क्रमांक 6 च्या काठिण्य पातळीबाबत करण्यात आलेली तक्रार.

मु.शी.: माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या बीजगणित व भूमिती या विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रश्न क्रमांक 6 च्या काठिण्य पातळीबाबत करण्यात आलेल्या तक्रारीसंबंधी माननीय प्रा.वसंत पुरके, शालेय शिक्षण मंत्री यांचे निवेदन.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) :- सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन

" महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या आठही विभागीय मंडळांमार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) सध्या सुरु आहे.

दिनांक 20 मार्च, 2007 रोजी बीजगणित व दिनांक 21 मार्च, 2007 रोजी भूमिती या विषयांच्या परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या.

सदर दोन्ही विषयांच्या प्रश्नपत्रिकांमधील प्रश्न क्र.6 च्या काठिण्य पातळीबाबत विविध संघटना व पालक यांच्याकडून तक्रारीवजा निवेदने प्राप्त झाली.

मंडळाच्या प्रचलित पध्दतीनुसार पेपरच्या दिवशीच सर्व विभागीय मंडळांचे मुख्य नियामक व अभ्यास मंडळ सदस्य यांची संयुक्त बैठक होऊन त्यामध्ये प्रश्नपत्रिकेची सविस्तर छाननी केली जाते.

या पध्दतीप्रमाणे बीजगणित व भूमिती या पेपरच्या प्रत्येकी चारही संचांची छाननी करण्यात आली. प्रश्नपत्रिका विहीत आराखडयानुसार असल्याचे तसेच प्रश्नपत्रिकेतील प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरील नसल्याचे दिसून आले. बीजगणित व भूमिती या दोन्ही पेपर्सच्या प्रत्येकी चारही संचामध्ये काठिण्य पातळीमध्ये फारसा फरक नव्हता, मात्र एकंदरीत समांतरता नसल्याचे दिसून आले.

या परिस्थितीचा विचार करुन गणित विषय अभ्यास मंडळ सदस्य व समन्वयक यांच्या शिफारशीनुसार बीजगणित व भूमिती या दोन्ही पेपर्सच्या चारही संचांमधील प्रश्न क्रमांक सहाचे पूर्ण गुण (प्रत्येकी 15 गुण) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना देण्याबाबत मंडळाने दिनांक 22 मार्च 2007 रोजी निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना मंडळाकडून देण्यात येत आहेत."

.....3

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांनी या बाबत काल सभागृहात निवेदन करावयास पाहिजे होते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने याबाबत निर्णय घेतला आहे, त्याबद्दल आनंद होत आहे. परंतु माननीय शिक्षण मंत्र्यांनी काल सभागृहात निवेदन करण्याऐवजी बाहेर निवेदन केल्यामुळे वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. माझी मुलगी दहावीच्या परीक्षेस बसली आहे, पेपर अवघड असल्याने तिने सन्माननीय सदस्य माझे मित्र श्री.विनोद तावडे यांना फोन केला. माझ्या मुलीला असे वाटले की, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनीच न्याय मिळवून दिला आहे, म्हणून ती मला म्हणाली की, बघा तुम्ही आमच्यासाठी काही केले नाही, माननीय श्री.विनोद तावडे यांनी आम्हाला न्याय मिळवून दिला. यामुळे आमच्या घरात भांडणे होत आहेत. परंतु मी माननीय शिक्षण मंत्र्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो की, त्यांनी याबाबत सर्व माहिती तपासून विद्यार्थ्यांना न्याय दिलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, 10 वी व 12 वी च्या परीक्षार्थींना इंग्रजी विषयाच्या ए, बी, सी, डी. हया चार प्रकारच्या बहुसंची प्रश्नपत्रिका देण्यात येतात. उद्या इंग्रजीचा पेपर आहे. मला प्रश्न असा विचारायचा आहे की, ज्या विद्यार्थ्यांची मराठी ही पहिली भाषा असून इंग्रजी तिसरी भाषा आहे. त्या विद्यार्थ्यांसाठी ए, बी, सी, डी. असे चार प्रश्नपत्रिका संच आहेत. परंतु ज्यांची इंग्रजी पहिली भाषा असून मराठी तिसरी भाषा आहे त्यांना ए, बी, सी, डी. संचाऐवजी एकच पेपरचा संच आहे. हा भेदभाव का करण्यात येत आहे ? इंग्रजी पहिली भाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांनासुध्दा ए, बी, सी, डी. असे चार पेपर संच का दिले जात नाही ? मराठी पहिली भाषा असलेल्या व इंग्रजी तिसरी भाषा असलेल्या विद्यार्थ्यांनी कॉपी करु नये, त्यामुळे त्यांना ए, बी, सी, डी. या चार प्रकारच्या बहुसंची प्रश्नपत्रिका देण्यात येत आहे, असे माझे मत आहे. परंतु यामुळे मराठी भाषेबद्दल दुजा भाव व्यक्त होत असून मराठी भाषिकांवर अविश्वास व्यक्त केला जात आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, प्रश्नपत्रिकांमध्ये व भाषेमध्ये अशा प्रकारचा भेदभाव केला जात नाही. सध्या फक्त इंग्रजी व गणित या दोन विषयाकरिता बहुसंची प्रश्नपत्रिका आहेत.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, काल या विषयाची चर्चा सभागृहात करुन निर्णय घेण्याऐवजी मंत्री महोदयांनी व अधिकाऱ्यांनी सभागृहाबाहेर निवेदन केले आहे. शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी परस्पर वृत्तवाहिन्यांना निर्णय कळविला आहे, ही योग्य बाब नाही.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत निर्णय घेणे ही तांत्रिक बाब आहे. शिक्षण मंडळाला असे कळविण्यात आले होते की, याबाबत विचार करुन निर्णय घेण्यासाठी अभ्यासगट तयार करण्यात यावा. याबाबत शिक्षण मंडळानेच निर्णय घ्यावा असे शासनाने सांगितले होते.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, ज्यांच्यामुळे हे प्रकरण घडून आले आहे, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

.....नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी दूरदर्शनवरील बातम्या दोन वेळा मुद्दाम ऐकल्या आहेत. सभागृहामध्ये जेव्हा हा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण यांनी मांडला की, अभ्यासक्रमा बाहेरील प्रश्न होते, ते शिकविलेल्या विषयांमधील नव्हते. त्याबाबत दूरदर्शनवरील बातम्यामध्ये असे सांगण्यात आले की, प्रश्न कठीण होते आणि ते मुलांना सोडविता आले नाहीत त्यामुळे मुलांच्या पालकांमध्ये असंतोष निर्माण होऊन त्यांनी आंदोलन केले म्हणून मग त्या बाबत निर्णय घेऊन त्याचे गुण मुलांना दिले जाणार. सभापती महोदय, अशा प्रकारे ही बातमी देऊन संपूर्ण महाराष्ट्रात असा मेसेज पसरविला गेला आहे की, परीक्षेत कठीण प्रश्न आले आणि त्यासंबंधात आंदोलन केले तर त्या प्रश्नांचे गुण मुलांना दिले जातात. असा एक चुकीचा अर्थ, मेसेज यातून दिला गेला आहे. तेव्हा यापुढेही अशा प्रकारे कठीण प्रश्न असतील तर त्यांचे गुण मुलांना दिले जाणार काय ? यामध्ये मग प्राध्यापक काय करतात. पेपर सेटर्स काय करतात ? आता या निवेदनामध्ये आपण सांगितले आहे की, ते प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरील नव्हते ...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हे बरोबर आहे की, ते प्रश्न अभ्यासक्रमा बाहेरील बिलकूल नव्हते. यापूर्वीही ते प्रश्न परीक्षांमध्ये आलेले होते, तेच रिपिट झालेले होते. अभ्यासक्रमा मधीलच ते प्रश्न होते.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, असे असेल तर मग ते प्रश्न केवळ कठीण आहेत आणि मुलांना ते सोडविता आले नाहीत म्हणून त्यांच्या पालकांनी आंदोलन केले तर त्याची दखल घेऊन आपण त्या प्रश्नांचे गुण सर्व विद्यार्थ्यांना देणार असाल तर महाराष्ट्रात हीच प्रथा पडेल आणि कोठल्याी विषयामध्ये कठीण प्रश्न आले तर त्यासंबंधत आंदोलन करायचे आणि मुलांना त्या प्रश्नांचे सारे गुण देण्याची मागणी करावयाची. शिवाय ते प्रश्न कठीण आहेत हे कोणी ठरवायचे ? तसेच ही तांत्रिक बाब आहे हे कसे काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, यामध्ये प्रश्न कठीण होते वा अभ्यासक्रमा बाहेरील होते म्हणून हा निर्णय घेतला असे नाही. तर या संबंधात आपण जी नवीन पद्धती स्वीकारली आहे त्यानुसार ए, बी, सी आणि डी अशा चार प्रकारच्या प्रश्नपत्रिका काढल्या जातात. आता त्यापैकी एक प्रश्नपत्रिका अवघड होती आणि त्यामुळे त्या गटातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत होता तो दूर व्हावा म्हणून हा निर्णय घेतला गेला आहे. एकाच प्रकारची प्रश्नपत्रिका असतील आणि ती सर्वच विद्यार्थ्यांना सोडवायची असती तर त्यात काही अडचण नव्हती. पण चार गटांपैकी

..... व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख ....

एका गटाला अवघड प्रश्न पत्रिका आल्याने सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे असते ती मिळाली नव्हती म्हणून याबाबतचा निर्णय घेतला गेला आहे. तेव्हा हा निर्णय आता झालेला आहे. तरी त्याबद्दल अधिक चर्चा करून प्रश्न अधिक चिघळविणे बरोबर होणार नाही.

उपसभापती : यावर अधिक चर्चा करणे गरजेचे नाही. यानंतर पुढील कामकाज घेण्यात येईल.

****

कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अमरावती माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचे सन 1991-92, 1992-93, 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-1997, 1997-98, 1997-99, 1999-2000 व 2000-2001 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धुळे माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचे सन 1992-93, 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-97, 1997-98 व 1998-99 चा अनुक्रमे चौथा, पाचवा, सहावा, सातवा, आठवा, नववा व दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाचे सन 1997-98, 1998-99 व 1999-2000 चा अनुक्रमे अठ्ठाविसावा, एकोणतिसावा व तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

****

..... व्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. सदाशिवराव पोळ (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वज्निक उपक्रम समितीचा नववा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा नववा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

***

(यानंतर श्री. सरफरे ....डब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी "सार्वजनिक बांधकाम मंत्री व नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री नामदार श्री. छगन भुजबळ यांना एका अज्ञात इसमाने दूरध्वनीवरुन जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "नवी मुंबई येथील महामुंबई ए.सी. झेड. प्रकल्पाकरिता रिलायन्स कंपनीने खाजगी शेतकऱ्यांची व शासनाने या प्रकल्पाकरिता मान्य केलेली जागा खरेदी करण्यासाठी दिलेल्या जाहिरातीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "सागवी-जोमदेव, ता. बाळापूर, जि. अकोला येथील दलित वस्तीतील पिण्याच्या पाण्याची विहिर तोडून त्याठिकाणी सर्वशिक्षा अभियानांतर्गत शाळा बांधकाम केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, मधु चव्हाण, वि.प.स. यांनी "सन 2004 ते 2007 या कालावधीत विदर्भातील एकूण 3198 शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्त्येच्या संदर्भात विदर्भातील 6 जिल्हयांकरिता पंतप्रधानांनी घोषित केलेल्या विशेष पॅकेजमधील रक्कम न मिळाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

मा□□□य सदस्या श्रीमती. डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यां□ "दि. 22.3.2007 रोजी व त्यासुमारास ठाणे जिल्हयातील वसईतील वालीव येथील रहिवाशी श्री दीपक शर्मा यांच्या डोळयावर चुकीचे उपचार केल्यामुळे त्यांना अंधत्व आल्याबाबत" या विषयावर □□यम 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□यम 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □ज□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने □□वद□ज□रावे.

मा□□□य सदस्य सर्वश्री. विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यां□ "राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसतानाही अवाजवी शिक्षण शुल्क शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घेणे, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाबद्दल संतापाचे वातावरण निर्माण झाल्याबाबत" या विषयावर □□यम 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□यम 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □ज□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने □□वद□ज□रावे.

मा□□□य सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स. यां□ "वैद्यकीय शिक्षण संचालनालय तसेच वैद्यकीय शिक्षण विभागातील काही अधिकारी संगनमत करुन सेल बॅक्टम कॉम्बिनेशन हे इंजेक्शन प्रति इंजेक्शन रु.302/- या प्रमाणे खरेदी करुन कोटयवधी रुपयांच्या झालेल्या नुकसानीबाबत" या विषयावर □□यम 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□यम 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □ज□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने □□वद□ज□रावे.

मा□□□य सदस्य डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यां□ "मोखाडा ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना, कुपोषित बालकांना खानावळ चालविणाऱ्या खानावळ चालकाचे बील शासनाने थकविल्यामुळे कुपोषित मुलांना जेवण मिळत नसल्याने त्यांचे हाल होत असल्याबाबत" या विषयावर □□यम 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□यम 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□स अ□मती □ज□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने □□वद□ज□रावे.

मा□□□य सदस्य सर्वश्री. डॉ.दीपक सावंत, नितीन गडकरी, विनोद तावडे, पाशा पटेल, गुरुमुख जगवानी, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यां□ "शासकीय रुग्णालये व शासनाच्या वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत येणाऱ्या रुग्णालयासाठी लागणाऱ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

सलाईनच्या खरेदीसंबंधी कंपनीला वाढीव दर दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल, प्रतापराव सोनवणे, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी ,वि.प.स. यांनी "विदर्भातील पाटबंधारे प्रकल्पाची कामे व त्यासाठी उपलब्ध असलेला निधी सर्वेक्षणाचे काम रेंगाळल्यामुळे प्रकल्पाची कामे प्रलंबित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी " नवी मुंबई येथील महामुंबई ए.सी.झेड. प्रकल्पाकरिता रिलायन्स कंपनीने खाजगी शेतकऱ्यांची व शासनाने या प्रकल्पाकरिता मान्य केलेली जागा खरेदी करण्यासाठी दिलेल्या जाहिरातीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे, बी.टी. देशमुख, वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी "पालोरा, ता. कारंजा, जि. वर्धा येथील भाकरेबाबा आश्रमशाळेतील अल्पवयीन मुलींच्या लैंगिक छळ प्रकरणी अधीक्षक व मुख्याध्यापक यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी होणे इत्यादीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री. गोपीनाथ बाजोरीया,वि.प.स. यांनी "राज्यात वाहनांचे रजिस्ट्रेशन करण्याकरिता निवासाचा पुरावा म्हणून रेशनिंग कार्ड, इलेक्ट्रिक बिल, टेलिफोन बिल पुरावा म्हणून आर.टी.ओ. कार्यालयाकडून ग्राहय धरला जात नसल्याने उद्भवलेल्या अडचणीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

मा□□य सदस्य श्री जयंत प्र. पाटील, प्रा.शरद पाटील,वि.प.स. यां□ "पालघर येथील सोनोपंत दांडेकर कॉलेजमधील 12 वी आर्टस्मध्ये शिकणाऱ्या 3 आदिवासी विद्यार्थ्यांना ग्रंथालय ज्ञान या विषयावरील परीक्षेला बसू न दिल्याबाबत" या विषयावर □□म 93 अ□ये सूच□ दिली आहे. तो □□म 93 चा विषय होत □सल्या□, मी सूच□□ अ□मती □ज□रीत आहे. मात्र या विषयावर शासनाने □□द□ज□रावे.

<u>नियम 93 च्या निवेदन क्रमांक 1 बाबत</u>

उपसभापती : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांची नियम 93 च्या पहिल्या सूचनावरील निवेदन नंतर चर्चेला घ्यावे अशी पत्राव्दारे विनंती केली आहे. त्याप्रमाणे नियम 93 चे निवेदन क्रमांक एक नंतर चर्चेला घेण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील व्यापारी, उद्योजक व वहातूकदार यांनी जकात कर रद्द करण्यासंबंधी केलेले आंदोलन

मु.शी. : राज्यातील व्यापारी, उद्योजक व वहातूकदार यांनी जकात कर रद्द करण्यासंबंधी केलेले आंदोलन याबाबत प्रा. शरद पाटील, जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "राज्यातील व्यापारी, उद्योजक व वहातूकदार यांनी जकात कर रद्द करण्यासंबंधी केलेले आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

(यानतंर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : महाराष्ट्रातील महानगरपालिकांमध्ये जकात आकारणी सुरू आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांवर याचा परिणाम होतो. तेव्हा नगरपालिकांप्रमाणे महानगर-पालिका क्षेत्रातील जकात आकारणी रद्द करावी, अशाप्रकारची मागणी व्यापारी संघटनांनी अनेक वर्षापासून महाराष्ट्र शासनाकडे केलेली आहे. शासनाने वेळोवेळी जकात कराला पर्याय शोधून काढून जकात कर रद्द करण्याचे आश्वासन व्यापारी संघटनांना दिलेले आहे. मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"जकातीला कोणता पर्याय असावा व त्या अनुषंगाने प्रचलित कायद्यात बदल करावा किंवा कसे, तसेच अशा पर्यायी कराची वसुली कोणी करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे". माझा प्रश्न असा आहे की, जकातीला कोणता पर्याय असावा, यासंबंधी शासनाचा विचार सुरु आहे, तो केव्हा पूर्ण होईल ? त्याचबरोबर आता नुकत्याच नव्याने महानगरपालिका गठीत झालेल्या आहेत. विशेषत: त्या "क" वर्ग महानगरपालिका आहेत. त्या महानगरपालिकांचा जकात रद्द करण्यासंबंधी शासन विचार करेल काय ? तसेच सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्या ठिकाणचे ठेकेदार निर्दयपणाने, अन्यायाने व्यापाऱ्यांकडून जकात वसूल करतात. त्या ठिकाणच्या ठेकेदारांमुळे व्यापारी अडचणीत सापडलेले आहेत. "क" वर्ग महानगरपालिकेच्या जकातीच्या संदर्भात वेगळा निर्णय शासन घेईल काय ? जकातीला कोणता पर्याय असावा, या अनुषंगाने विचाराधीन असलेली बाब केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, महानगरपालिकांचा जकात रद्द व्हावा, अशी मागणी अनेक वर्षापासूनची शासनाकडे आहे. परंतु त्या ठिकाणच्या कर्मचारी आणि कामगार संघटनांनी याला विरोध केलेला आहे. या दोन्ही गोष्टी सरकारच्या समोर आहेत. या उद्योगातील घटकांना आणि व्यापाऱ्यांना वेळोवेळी शासनाने आश्वासन दिलेले आहे. या संदर्भात निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेऊन लवकरात लवकर पर्याय शोधल्याशिवाय जकात रद्द करण्याचा निर्णय घेता येणार नाही. जकात हे महानगरपालिकेचे उत्पन्नाचे साधन आहे. आपण नगरपालिकांच्याबाबतीत निर्णय केला. त्यांना आपण दरवर्षी भरपाई देतो. राज्य शासनाला प्रत्येक वर्षी साधारणपणे 450 कोटी रुपये जकातीपोटी नगरपालिकांना अनुदान द्यावे लागते. याप्रमाणे महानगरपालिकांच्याबाबतीत विचार केला तर फार मोठे आर्थिक ओझे राज्य शासनाच्या बजेटवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/ SBT/ MAP/

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरू....

येईल. नवी मुंबई महानगरपालिकेला अकौंट बेसवर परवानगी दिली. त्यामध्ये ती महानगरपालिका यशस्वी झाली. त्यानंतर अमरावती महानगरपालिकेच्याबाबतीतही अशीच पध्दती सुरु केली होती. पहिली दोन वर्षे त्यांनी हा प्रयोग केला. त्यानंतर ती यामध्ये यशस्वी होऊ शकली नाही. त्यामुळे जुन्या पध्दतीनेच महानगरपालिकेला जकात आकारावा लागला. आता आपल्याकडे व्हॅट लागू केलेला आहे. जकात कराला पर्याय शोधण्यासाठी वेगवेगळ्या समित्या गठित केलेल्या आहेत. त्यांचे अहवाल राज्य शासनासमोर येतील. त्यानंतर त्यावर लवकरच आम्ही निर्णय करू. सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. आपण महानगरपालिकांचे वेगवेगळे कॅटॅगरायझेशन केलेले आहे. त्यामध्ये अ,ब,क, वर्ग महानगरपालिका ठरविलेल्या आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

ज्या नवीन महानगरपालिका झालेल्या आहेत त्यामध्ये नगरपालिकांचे रुपांतर महानगरपालिकांमध्ये झालेल्या अशा महानगरपालिका आहेत. त्यामध्ये फारसा फरक पडलेला नाही. काही नवीन महानगरपालिकांनी शासनाला पत्र लिहिले की, आमच्या महानगरपालिकेची परत नगरपालिका करा. आम्हाला महानगरपालिका नको अशी पत्रे मधल्या काळात नव्याने निर्माण झालेल्या महानगरपालिकांनी शासनाला लिहिलेले होते. म्हणून याचा विचार करीत असताना प्रामुख्याने मुंबई हीच एक अशी महानगरपालिका की, ज्या ठिकाणी सर्वात मोठे उत्पन्न जकातीचे आहे आणि त्याबाबत आपण निर्णय केला तर महानगरपालिकेला राज्य सरकारला पैसे द्यावे लागतील. आमच्यासमोर वेगवेगळे पर्याय आहेत. परंतु हा विचार करीत असताना "क" वर्ग महानगरपालिकांच्या संदर्भात वेगळे धोरण स्वीकारता येईल काय हाही एक ऑप्शन आमच्यासमोर आहे. सध्या देशातील महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल या दोनच राज्यामध्ये जकात कर सुरु आहे. बाकीच्या राज्यांनी जकात कर पूर्णपणे रद्द केलेला आहे. यासंदर्भामध्ये आम्ही निश्चितपणे लवकर निर्णय करु. "क" वर्ग महानगरपालिकांसाठी वेगळे धोरण स्वीकारता येते काय ? याबाबत जी सूचना मांडण्यात आलेली आहे ती तपासून निश्चितपणे कार्यवाही करु.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 1 बाबत

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 1 मध्ये पहिले नाव सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचे आहे. यासंदर्भात आम्ही सुध्दा स्वतंत्र सूचना दिलेली आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय उपस्थित आहेत. आपण कृपया निवेदन क्रमांक 1 पुकारावे अशी मी विनंती करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज मी सभागृहात उपस्थित राहू शकणार नाही असे पत्र दिलेले आहे.

श्री. कपिल पाटील : आमची स्वतंत्र सूचना आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पत्र दिलेले आहे. त्यानी दिलेली ही सूचना आहे.

श्री. कपिल पाटील : आम्ही स्वतंत्र सूचना दिलेली आहे.

उपसभापती : त्याबाबतचे निवेदन जेव्हा येईल तेव्हा बघू.

श्री. कपिल पाटील : या निवेदनामध्ये आमची नावे आहेत.

उपसभापती : माझ्याकडे जे निवेदन आलेले आहे त्यामध्ये फक्त सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचे नाव आहे.

श्री. कपिल पाटील : त्याखाली सर्वश्री जयंत पाटील आणि कपिल पाटील अशी नावे दिलेली आहेत. आमची स्वतंत्र सूचना आहे.

उपसभापती : मघाशी आपण बोलावयास पाहिजे होते.

श्री. कपिल पाटील : मघाशी आम्ही बोलत होतो परंतु आपण दुसरे निवेदन पुकारले.

उपसभापती : आता परत मागे जाता येणार नाही. एकच निवेदन दोन वेळा पुकारता येणार नाही. यानंतर निवेदन क्रमांक 3 घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गोरेगाव पूर्व येथील रॉयल पामच्या रो हाऊसचे बांधकाम कोसळून कामगारांचा झालेला मृत्यू

मु. शी. : गोरेगाव पूर्व येथील रॉयल पामच्या रो हाऊसचे बांधकाम कोसळून कामगारांचा झालेला मृत्यू याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील यांनी "गोरेगाव पूर्व येथील रॉयल पामच्या रो हाऊसचे बांधकाम कोसळून कामगारांचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, संबंधित कंत्राटदाराविरुध्द गुन्हा केव्हा दाखल केला ? यामध्ये मे. अल मेहंदी हे ठेकेदार आहेत. यातील इतर पाच आरोपी कोण आहेत ? जे निकृष्ट साहित्य होते ते ज्या दुकानदाराकडून घेतले त्या दुकानदारांवर शासन कारवाई करणार काय ? ज्या 7 व्यक्ती मयत झालेल्या आहेत आणि 6 व्यक्ती जखमी झालेल्या आहेत त्यांना ठेकेदाराने नुकसानभरपाई दिलेली आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दिनांक 14.3.2007 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये एकूण 9 आरोपी आहेत. त्यापैकी 6 आरोपींना पकडण्यात आले असून 3 आरोपी फरारी आहेत. जे 7 लोक मयत झालेले आहेत त्यांना ठेकेदाराकडून प्रत्येकी दीड लाख रुपये मदत देण्यात आली आहे तसेच जे 6 लोक जखमी झालेले आहेत त्यातील एकाला दीड लाख रुपये, दुसऱ्याला 2 लाख रुपये आणि इतर 4 लोकांना प्रत्येकी 50 हजार रुपये मदत देण्यात आली आहे. ज्यांच्याकडून निकृष्ट माल घेतला त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्यात आली आहे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बेस्ट कंपनीने मुंबईतील सर्वात जास्त थकबाकी असणाऱ्या "टॉप टेन" ची यादी जाहीर करणे

मु. शी. : बेस्ट कंपनीने मुंबईतील सर्वात जास्त थकबाकी असणाऱ्या "टॉप टेन" ची यादी जाहीर करणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी "बेस्ट कंपनीने मुंबईतील सर्वात जास्त थकबाकी असणाऱ्या "टॉप टेन" ची यादी जाहीर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, योगायोगाने माननीय मुख्यमंत्री आज सभागृहामध्ये उपस्थित आहेत. खरे म्हणजे शासनाचा अवमान करण्यासारखी जाहिरात दिलेली आहे. या यादीमध्ये जे "टॉपटेन" आहेत त्यांच्याकडे काही लाख रुपयांच्या वीज देयकांची थकबाकी आहे. यामध्ये पोलीस कार्यालये आहेत. उत्तरामध्ये विसंगती आहे. शासनाचा अवमान करणारी ही बाब आहे. या गोष्टीची शासनाने गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की "आयोगाने असे निदेश दिले की, बेस्टने त्यांची थकबाकी कमी करण्यासाठी कसूरदार ग्राहकांची यादी वेबसाईट व वर्तमानपत्राद्वारे प्रसिध्द करावी." परिच्छेद क्रमांक 3मध्ये असे नमूद केलेले आहे की, "बेस्ट उपक्रमाच्या वीज ग्राहकापैकी, खाजगी संस्था अथवा उद्योजक यांच्याकडील थकबाकी जास्त झाल्यास त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येतो. त्यामुळे स्वाभाविकच सर्वसाधारणपणे त्यांच्याकडून विद्युत देयकाचा भरणा वेळेवर होतो व त्यांच्याकडे विशेष थकबाकी शिल्लक राहत नाही. परंतु शासकीय कार्यालयांची थकबाकी बुडण्याची शक्यता नसते व ही कार्यालये जनसामान्यांच्या सेवेसाठीच असल्याने व त्यांनी पार पाडावयाच्या जबाबदा-या अतिशय महत्वाच्या असल्याने शासकीय कार्यालयांचा तसेच रुग्णालयांचा विद्युत पुरवठा खंडीत केला जात नाही." हा वीज पुरवठा खंडीत करावा असे माझे म्हणणे नाही. शेवटच्या परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की, "थकबाकी संदर्भातील आवश्यक ती छाननी तसेच ताळमेळ झाल्यानंतर विद्युत देयके अदा करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही संबंधित विभागाकडून तातडीने करण्यात येईल." म्हणजे छाननी न करताच ही नावे जाहीर करण्यात आली आहेत काय ? "पोलीस खात्याने 4 कोटी रुपये भरले नाहीत" अशी आठ कॉलमची हेडलाईन वृत्तपत्रामध्ये होती. सामान्य माणसांची वीज लगेच कापली जाते, शासनाने पैसे भरले नाहीत तरी वीज कापली जात नाही, असा जनसामान्यांमध्ये समज झालेला आहे. म्हणून छाननी झालेली नसताना टॉप 10मध्ये शासनाचे गुन्हेगार म्हणून नाव जाहीर का केले ? नाव जाहीर केल्यानंतर थकबाकी देणे आवश्यक आहे असेही निवेदनामध्ये म्हटलेले आहे. शासनाच्या सर्व विभागांसाठी दरवर्षी बजेटमध्ये तरतूद केली जाते. असे असताना कोट्यवधी रुपयांची थकबाकी राहाण्याची कारणे काय आहेत ? तेव्हा या प्रकरणी ज्या अधिका-यांनी चूक केलेली आहे त्याच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : शासकीय कार्यालयांची जी वीज बिलांची थकबाकी राहिलेली आहे त्यांची यादी बेस्टने वीज नियामक आयोगाची परवानगी घेऊन प्रसिध्द केलेली आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. निवेदनामध्ये असेही म्हटलेले आहे की, शासकीय कार्यालयांची वीज खंडीत केली जात नाही कारण ती जनसामान्यांच्या सेवेसाठी असतात. सन्माननीय सदस्यांनी यामध्ये विसंगती असल्याचा मुद्दा मांडलेला आहे. हा मुद्दा योग्य आहे असे मला वाटते. या सर्व प्रकरणाची नीट चौकशी करण्यात येईल. सरकारी कार्यालयांनी वेळेवर बजेटमध्ये तरतूद असताना देखील वीज बिले भरली नसतील तर त्याबाबतीत चौकशी करण्यात येईल. प्रत्येक वर्षी बजेटमध्ये तरतूद केलेली असते. तसेच बेस्टने घाईगर्दीने, तपासणी न करता नावे वेबसाईटवर आणली असतील तर त्याही बाबतीत चौकशी करण्यात येईल. एकंदरीतच बेस्टने केलेली ॲक्शन आणि सरकारी कार्यालयांनी वीज बिले भरण्यामध्ये केलेली दिरंगाई या दोन्हीची तपासणी करण्यात येईल. मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी या निवासस्थानावरील वीज देखील खंडीत करण्यात आली होती. वीज मंडळ हया बाबतीत तसे तत्पर आहे. शासनाची एका बाजूने बदनामी होत आहे असे मला वाटते. दुस-या बाजूला थकबाकी आणि उपस्थित केलेले इतर मुद्दे यामधील विसंगती थांबायला पाहिजे. या प्रकरणी चौकशी करुन निश्चितपणे कोण दोषी आहे हे शोधून काढण्यात येईल.

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

पृ.शी. : कु.सागर वाघमारे, राहणार जांभूळपाडा, ता.सुधागड जिल्हा रायगड, याचा झालेला खून

मु.शी : कु. सागर वाघमारे, राहणार जांभूळपाडा, ता. सुधागड जिल्हा रायगड, याचा झालेला खून यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील व प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. जयंत प्र.पाटील व प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी "कु. सागर वाघमारे राहणार, जांभूळपाडा, ता.सुधागड जिल्हा रायगड, याचा झालेला खून" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सदर मयत मुलाच्या आईने, त्याचा खून झाला असल्याचे सांगितलेले आहे. सदर मयत सागर वाघमारे याच्या प्रेताचे पोस्टमार्टेम करण्यात आले होते काय ? असल्यास, त्याच्या मृत्यूचे कारण काय आहे ? आरोपी चंदर यास पकडण्यासाठी पोलिसांनी कोणता उपक्रम हाती घेतला आहे ?

...नंतर कु. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कु. सागर याचा खून झालेला आहे त्याचा पोस्टमार्टेम रिपोर्ट आलेला आहे. त्याच्या डोक्यावर जबरदस्त मारहाण झाल्याने तो मृत पावला असा डॉक्टरांचा पोस्ट मॉर्टेमचा रिपोर्ट आहे. चंदर जाधव या मारेकऱ्याला शोधून काढण्यासाठी त्या गावामध्ये एक पोलीस पथक पाठविण्यात आलेलें आहे. तेथे तीन पोलीस आणि एक हवालदार कायम डयूटीवर ठेवण्यात आलेले आहेत.

.....

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अभ्युदय नगर वसाहतीच्या पुनर्विकासासंदर्भात विजयग्रुपचे रश्मीकांत शहा यांची झालेली हत्या .

मु. शी. : अभ्युदय नगर वसाहतीच्या पुनर्विकासासंदर्भात विजयग्रुपचे रश्मीकांत शहा यांची झालेली हत्या . याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, संजय केळकर, यांनी "अभ्यूदय नगर वसाहतीच्या पुनर्विकासासंदर्भात विजयग्रुपचे रश्मीकांत शहा यांची झालेली हत्या " .या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या ठिकाणी उत्तरात असे म्हटले आहे की, "पोलिसांनी आरोपीला पकडण्यासाठी सापळा रचला व त्याला पकडत असताना एका आरोपीने पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला" . तरीदेखील पोलिसांनी कमीत कमी बळाचा वापर करुन चारही आरोपींना घातक शस्त्रासह अटक केली. येथे माझ्या मनात एक शंका निर्माण झालेली आहे. या प्रकरणात अटक झालेल्या आरोपीच्या पत्नीने माननीय राज्यपाल महोदयांना एक पत्र लिहिले आहे . याची आपणास माहिती आहे का? त्या आरोपीच्या पत्नीचे असे म्हणणे होते की, कासीम आणि वाडकर यांना पोलीस घेऊन गेले होते आणि प्रत्यक्ष अटक मात्र जी दाखविली आहे ती त्या नंतर म्हणजे 25 तारखेला दाखविली आहे. अभ्युदय नगर मधील 2 इमारतीच्या एक हजार कोटीच्या बांधकामाबाबत हा वाद होता. याबाबत असा प्रश्न उपस्थित केला जातो की, पोलीस यंत्रणेचा वापर केला जात आहे. अशा प्रकारची तक्रार या विषयाच्या अनुषंगाने कासीमच्या पत्नीने माननीय राज्यपाल महोदयांकडे केलेली आहे. ही गोष्ट खरी आहे का ? या बाबतीत आपणाकडे काही पुरावा आहे का ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एका बिल्डरची सुपारी घेऊन हत्या करण्यासाठी काही माणसे तेथे जाणार असल्याची गुप्त बातमी पोलिसांना त्यांच्या खबऱ्याकडून मिळाली होती. त्यानुसार पोलीसांनी सापळा रचला व आरोपींना पकडत असताना त्यांच्यावर गावठी रिव्हॉल्व्हरने फायरींग केले. तरी देखील पोलिसांनी प्रतिउत्तर न करता कासीमला ताब्यात घेण्यात यश मिळविले. कासीमच्या पत्नीने माननीय राज्यपाल महोदयांच्याकडे केलेल्या तक्रारीबाबत आमच्याकडे काहीही माहिती नाही व अशा प्रकरणामध्ये पोलीस दलाचा कोणीही वापर करीत नाही.

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मौजे पिंपळखुटा, ता. पातूर, जि. अकोला येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत.

मु. शी. : मौजे पिंपळखुटा, ता. पातूर, जि. अकोला येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदिश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, यांनी "मौजे पिंपळखुटा , ता. पातूर, जि. अकोला येथे अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी येथे ता. पातुर, जि.अकोला येथील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या निवेदनाबाबत बोलणार आहे. एकूण 42 शेतकऱ्यांनी या बाबतीतील आपले निवेदन कलेक्टरांकडे दिलेले आहे. त्यांनी आत्मदहनाची नोटीस दिलेली आहे . या 42 लोकांना पटवारीने

तहसिलदाराने पंचनामे करीत असताना वगळले, म्हणून त्यांनी आत्मदहनाची नोटीस दिलेली आहे. पूरग्रस्तांना वाटप करताना अशा प्रकारचा गोंधळ ठिकठिकाणी झालेला आहे.

पिंपळखुटा तालुक्यामध्ये काही प्रकल्पग्रस्तांकडून आणि पूरग्रस्तांकडून एक हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्या शेतकऱ्यांनी एक हजार रुपये दिले नाही म्हणून त्यांचे नाव त्या यादीत घेण्यात आले नाही. ही तक्रार केल्यानंतर कलेक्टरांनी सदर प्रकरणाबाबत चौकशीचे आदेश दिले . आणि या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदात असे म्हंटले आहे की, संबंधित तलाठी यांची बदली करण्यात आली असून घरांच्या नुकसानीच्या वाटपामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत कर्मचारी किवा अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच तक्रारदारांना आत्मदहनापासून परावृत्त करण्याबाबत उप विभागीय अधिकारी, बाळापूर यांना कळविले आहे.

यानंतर श्री. भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, नुकसानभरपाईच्या वाटपामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत तलाठ्याची बदली करुन हे प्रकरण संपविण्यात आले आहे का? इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची जी कारवाई करण्यात आली त्या कारवाईचे स्वरुप काय आहे? ही कारवाई कोणत्या स्तरावर आहे? या कारवाईमध्ये कोणकोणते कर्मचारी दोषी आढळून आले आणि ही कारवाई कधी पूर्ण होणार आहे?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पिंपळखुटा येथील पूरग्रस्तांच्या नुकसानभरपाईच्या वाटपामध्ये जी अनियमितता झाली त्याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहाय्यक, सरपंच आणि पोलीस पाटील यांनी संयुक्त पथकाद्वारे घरांचे सर्वेक्षण केले होते. त्या सर्वेक्षणामध्ये 253 घरांचे अंशत: नुकसान झाल्याचे आढळून आले. या 253 पैकी 249 कुटुंबांना नुकसानभरपाईचे वाटप केले. दिनांक 26 ऑक्टोबर, 2006 रोजी तक्रार आल्यानंतर त्या तक्रारीची चौकशी केली गेली. अनियमतता झाली ही बाब त्याठिकाणी आढळून आली. जी घरे अतिक्रमणात होती अशा मदत अनुज्ञेय नसलेल्या काही घरांना मदत दिली गेली. अशा लोकांकडून रिकव्हरी सुध्दा सुरु केली आहे. या संदर्भात जे अधिकारी दोषी असतील, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तलाठ्याच्या बदलीबद्दल सांगितले, त्यांची बदली केली आहे. तलाठ्याची सुध्दा विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे ग्रामसेवक आणि सेक्शनल इंजिनिअर, ज्यांनी व्हॅल्यूएशन केले त्यांची सुध्दा ताबडतोबीने चौकशी करुन एक महिन्याच्या आत अहवाल मागविला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या 42 पूरग्रस्तांनी तक्रार केली होती त्यापैकी किती पूरग्रस्तांना नुकसानभरपाईचे वाटप केले गेले? उर्वरित पूरग्रस्तांना वाटप केले नाही ते केव्हा करण्यात येणार आहे?

डॉ.राजेंद्र शिंगणे : 42 पैकी 17 लोकांना अनियमितपणे नुकसानभरपाईचे वाटप केले गेले, त्यांच्याकडून रिकव्हरी सुरु करीत आहोत. मदतीचे वाटप राहिले असेल तर त्या संदर्भात येत्या 8 दिवसात मदतीचे वाटप पूर्ण केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.:अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेबाबत

मु.शी.:अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, संजय केळकर व मधु चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, संजय केळकर व मधु चव्हाण, वि.प.स यांनी "अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3..

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, डी.एड्. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नोव्हेंबर, 2006 मध्ये प्रवेश दिला, त्यावेळी ए.टी.के.टी.होती. त्याप्रमाणे हे विद्यार्थी दुसऱ्या वर्षास पात्र ठरले. परीक्षा झाल्यानंतर 4 महिन्यापासून दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. दिनांक 6 मार्च, 2007 रोजी त्यांच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. आता शासनाने नवीन पध्दत अंमलात आणली. अभ्यासक्रमात एकूण 9 विषय असताना केवळ दोनच विषयांना ए.टी.के.टी.लागू केली. या वर्षी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून विचार झाला पाहिजे. द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात त्यांना सरळ प्रवेश द्यावा ही पहिली मागणी आहे. प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमात जे नापास झाले, त्या विद्यार्थ्यांना मे महिन्याच्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झाल्यास दुसऱ्या वर्षात प्रवेश द्यावा. त्यांचे वर्ष वाया जाऊ नये एवढाच उद्देश आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, खरे म्हणजे बारावी नंतर गुणवत्तेनुसार डी.एड्.साठी निवड केली जाते. यापूर्वी ए.टी.के.टी.होती. जागतिकीकरणाच्या आणि गुणवत्तेच्या जगतामध्ये जाणीवपूर्वक नवीन अभ्यासक्रम लागू केला. 2004 चा जो अभ्यासक्रम होता, त्यामधील लेखी आणि प्रात्यक्षिक या दोन्ही परीक्षांमध्ये आमुलाग्र बदल केला. या प्रक्रियेनुसार 90 टक्के मुले उत्तीर्ण होतात. जेव्हा विद्यार्थी पहिल्या वर्षात प्रविष्ठ होतो तेव्हा किमान दोन विषयांपर्यंत ए.टी.के.टी.देऊ शकतो. 3-3 विषयात नापास होत असतील आणि प्रमोशन द्यावे लागत असेल तर क्वालिटी मेंटेन होणार नाही. जेव्हा पहिल्या वर्षाच्या परीक्षा होतात तेव्हा कॉल दिले जातात. निकाल उशिरा लागला तरी प्रोव्हीजनली ॲडमिशन होते आणि निकाल जाहीर होतो तेव्हा प्रवेश द्यावा किंवा देऊ नये हे स्पष्ट होते.

श्री.नितीन गडकरी : पूर्वीच्या धोरणानुसार दुसऱ्या वर्षात प्रवेश दिला जावा. या विद्यार्थ्यांनी पैसे भरले आहेत. चार महिने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शासनाचे धोरण बदलले आहे. केवळ या वर्षापुरता विचार करावा. ही गरीब आणि सामान्य घरातील मुले आहेत. पुढच्या वर्षी शासनाने निकालाची तारीख जाहीर करुन त्याच तारखेला निकाल घोषित करावा. केवळ सरकारच्या तांत्रिक चुकांमुळे चार महिने जे विद्यार्थी शिकले त्यांचे नुकसान होऊ नये.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, ही पॉलीसी पुढील वर्षापासून बदलून टाकली जाणार आहे काय?

प्रा. वसंत पुरके :सभापती महोदय, निकाल उशिरा लागला ही वस्तुस्थिती आहे. तसेच यापुढे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, तसेच तांत्रिक बाब लक्षात घेऊन निकाल लवकरात लवकर, वेळेवर लागावेत यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. गुणवत्ता टिकवण्यासाठी सन्माननीय सदस्य मागणी करीत असल्या प्रमाणे आपल्याला तसा निर्णय करता येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : पॉलिसी काढण्यास 4 महिने गेलेले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. निकाल उशिरा लागल्यामुळे विद्यार्थ्यांनी वरच्या वर्गाच्या ॲडमिशनसाठी फी भरुन प्रवेश घेतलेला आहे. परंतु आपल्या निर्णयामुळे विद्यार्थ्याचे नुकसान झालेले आहे. हे सर्व गरीब विद्यार्थी आहेत. गुणवत्ता टिकवली पाहिजे हे म्हणणे बरोबर आहे. परंतु आपण निकाल वेळेवर लावला असता तर विद्यार्थ्यांवर ही वेळ आली नसती. यामध्ये सर्व दोष प्रशासनाचा आहे. निकाल उशिरा लावले जात असल्यामुळे असे प्रकार घडत असतात. प्रशासनाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांचे दुसरे वर्ष सुध्दा वाया गेलेले आहे. त्यामुळे केलेली पॉलीसी पुढील वर्षापासून बदलून टाकली जाईल काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, निकाल उशिरा लागला ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, विद्यार्थी जर दोन विषयात नापास असेल तर त्यांना एटीकेटी दिली जाते परंतु विद्यार्थी जर 3 विषयात नापास झाला तर त्यांना एटीकेटी दिली जात नाही, त्यांना दुस-या वर्गात प्रवेश दिला जात नाही. गुणवत्ता टिकवण्यासाठी विद्यार्थी जर 3 विषयात नापास असेल तर त्याला दुस-या वर्गात प्रवेश देता येत नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन 93 च्या निवेदन क्रमांक 9 बाबत

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. श्रीकांत जोशी यांच्या नियम 93 अन्वयेचे निवेदन सभागृहासमोर चर्चेसाठी आहे. सन्माननीय सदस्य आता सभागृहात उपस्थित नाहीत, परंतु हे निवेदन नंतर घेण्यात यावे अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केली असल्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ. श्रीकांत जोशी यांचे नियम 93 अन्वयेचे निवेदन नंतर घेण्यात येईल. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 1 घेण्यात येईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नाशिक जिल्हयातील गारपीटग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई न मिळणे.

मु. शी. : नाशिक जिल्हयातील गारपीटग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई न मिळणे यासंबंधी डॉ. वसंत पवार, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" महाराष्ट्रात माहे, सप्टेंबर, 2006 नंतर झालेल्या गारपीटीनंतर नाशिक जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतक-यांना भरपाई देण्याबाबत शासनामार्फत अद्यापि सर्व्हे न होणे, ब-याच शेतक-यांना अजूनही पुरेशी भरपाई न मिळणे, शेतक-यांना अपेक्षित असलेल्या रक्कमेचे प्रत्यक्षात वाटप न करता तुटपुंज्या रकमेचे वाटप करण्यात येणे, परिणामी नुकसानग्रस्त शेतक-यांमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे वातावरण, त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेली उपासमारीची पाळी, शेतक-यांच्या नुकसानासंबंधी पंचनामा करण्याची प्रचलित पध्दती तातडीने सुरु करण्याची नितांत गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

डॉ. राजेंद्र शिंगणे (पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पवार : सभापती महोदय, 5 नोव्हेंबर आणि 6 नोव्हेंबर, 2006 रोजी बे-मोसमी पाऊस आणि गारपीट यामुळे नाशिक जिल्हयातील निफाड आणि नाशिक तालुक्यात फार मोठया प्रमाणात पिकांचे नुकसान झालेले आहे. या गारपिटीमुळे जवळपास 32 हजार हेक्टरचे नुकसान झालेले आहे. या गारपिटीत ज्या शेतक-यांचे नुकसान झाले त्यासाठी शासनाकडून पंचनामे करण्यात आले. या गारपिटीमध्ये निफाड तालुक्यातील जी अनेक मोठ-मोठी गावे आहेत त्यामध्ये रामपूर,कोळगाव, धरणगाव,वनसगाव अशा किती गावांचा यामध्ये समावेश होतो. निफाड तालुक्यातील किती तरी गावामध्ये खूप मोठया प्रमाणात, 80 ते 85 टक्के पिकांचे नुकसान झालेले आहे. या गारपिटीमुळे टोमॅटो, ऊस, कांदा तसेच द्राक्षांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. आता द्राक्षासाठी नाशिक जिल्हयातील वातावरण खराब झालेले आहे. गारपीट होऊन पंचनामे करुन एक वर्ष उलटून गेले असले तरी यासंदर्भातील नुकसान भरपाई किंवा मदत शासनाच्या वतीने शेतक-यांना मिळालेली नाही. दुसरा भाग असा आहे की, द्राक्ष बागांवर गारपीट झाल्यामुळे द्राक्षांची पाने आणि द्राक्षे सुध्दा गळून पडलेली आहेत. शास्त्रज्ञांनी म्हटले आहे की, या गारपिटीचा परिणाम द्राक्षाच्या पिकावर दुस-या वर्षी होऊन, द्राक्षाचे पीक निघणार नाही. गारपिटीमुळे द्राक्षाचे कंटीन्यूअस नुकसान होणार आहे. या गारपिटीमुळे नाशिक जिल्हयातील 118 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शासनाला माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, गारपीटग्रस्त शेतक-यांना आपण मदत केव्हा देणार आहात? गारपिटीच्या संदर्भातील विषय कॅबिनेटमध्ये सुध्दा उपस्थित झाला होता तरी सुध्दा नाशिक जिल्हयातील गारपीटग्रस्त शेतक-यांना शासनाने मदत किंवा नुकसान भरपाई दिलेली नाही.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ.वसंत पवार.....

गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना दर एकरी 500 रुपये मदत दिली जाते. ही अतिशय तुटपुंजी रक्कम आहे. ही रक्कम घेण्यास कोणताही शेतकरी पुढे येणार नाही अशी परिस्थिती आहे. केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी देखील पाहणी करण्यासाठी एक पथक पाठविले होते. त्या पथकाने अहवाल देखील दिलेला आहे. गारपीटग्रस्त शेतकऱ्यांनी त्यांना न्याय मिळण्यासाठी अनेकवेळा उपोषण केले, आंदोलन केले, तरी देखील त्यांना न्याय मिळालेला नाही. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहेत की, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचा मोबदला केव्हा देणार आहात ? तसेच शेतकऱ्यांनी जे कर्ज काढलेले आहे त्या कर्जाचे शासन पुनर्गठन करणार आहे काय ? व्याजामध्ये सवलत देणार आहे काय ? शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना घेण्यात येणार आहे काय ? तसेच नॅशनल फलोत्पादन मिशनच्या माध्यमातून गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना शासन मदत करणार का ? द्राक्षबाग शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रतिहेक्टर मदत करणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सप्टेंबर 2006 नंतर नाशिक आणि राज्यातील इतर 13 जिल्ह्यात गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सन्माननीय सदस्यांनी नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. नाशिक जिल्ह्यात जवळपास 6 हजार 818 आर क्षेत्रांचे नुकसान झालेले आहे. म्हणजे जवळपास 50 टक्के क्षेत्राचे पिकांचे नुकसान झालेले आहे. राज्यातील 13 जिल्ह्यात एकूण 31 हजार 960 हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. म्हणजे जवळपास 118 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, गीरपीटग्रस्त शेतीचे सर्व्हे, पंचनामे झालेले आहेत. या शेतकऱ्यांना मदत मिळावी म्हणून केंद्र सरकारकडे देखील विनंती केली होती. त्याची दखल घेऊन माननीय केंद्रीय कृषी मंत्री यांनी पाहणी करण्यासाठी एक पथक देखील पाठविले होते. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न आहे की, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत केव्हा देणार ? मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो की, दिनांक 7 जुलै 2005 रोजीच्या शासन निर्णयानुसार शेत पिकासाठी हेक्टरी दोन हजार रुपये आणि द्राक्ष पिकासाठी हेक्टरी पाच हजार रुपये मदत गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतलेला आहे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी या विषयावर लक्षवेधी सूचना मांडण्याची हिम्मत दाखविली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु ज्या तडफेने त्यांनी जिल्हापरिषदेच्या निवडणुकांमध्ये भाषणे केली त्या तडफेने त्यांनी येथे शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या नाहीत. या लक्षवेधीवरील निवेदनात म्हटले आहे की, "राज्यातील गारपीटग्रस्त भागात झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक दिनांक 8.11.2006 घेण्यात आली होती. त्या समितीने कोणती शिफारस केली, तर "कृषि विभागाने विमा उतरवून अशाप्रकारच्या संभाव्य नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करावे.

सभापती महोदय, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले त्यासंबंधीचा अहवाल केंद्र सरकारकडे एक वर्षानंतर सादर करण्यात आला.असे असताना शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार कधी आणि त्याचा लाभ ते घेणार कधी ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आपण शेतकऱ्यांची फसवणूक न करता त्यांच्या बाजूने प्रामाणिकपणे उभे राहा. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, शेतक-यांना नेमके किती दिवसात पैसे मिळणार ? व किती मिळणार ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्णपणे ऐकलेले दिसत नाही. शेवटच्या दोन ओळीमध्ये मी सांगितले आहे की, दिनांक 7 जुलै,2005 रोजीच्या निर्णयाप्रमाणे शेती पिकासाठी 2 हजार रुपये प्रति हेक्टरी व द्राक्ष फळ पिकांसाठी प्रति हेक्टरी 5 हजार रुपये 2 हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील अनेक वैद्यकीय महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांना अखिल भारतीय आयुर्विज्ञान मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता नसणे

मु. शी. : राज्यातील अनेक वैद्यकीय महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांना अखिल भारतीय आयुर्विज्ञान मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता नसणे यासंबंधी सर्वश्री डॉ.दीपक सावंत, श्रीमती नीलम गोऱ्हे, सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, अरविंद सावंत, सुरेश जेथलिया, अनिल परब, परशुराम उपरकर, गोपीकिसन बाजोरिया,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे येथील शासकीय बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथील जे.जे. वैद्यकीय महाविद्यालयात नेत्रविभागात अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रम व अंबेजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयात अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविण्यात येणे तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे कान, नाक, घसा हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविण्यात येणे, वरील चारही शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांमध्ये उपनिर्दिष्ट अभ्यासक्रमांना अखिल भारतीय आयुर्विज्ञान मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता नसणे, राज्यातील अनेक शासकीय वैद्यकिय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना अखिल भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता नसताना अत्यंत महत्वाचे व जनतेच्या आरोग्यांशी संबंधित अभ्यासक्रम शासनाच्या मालकीच्या वैद्यकिय महाविद्यालयांमध्ये शिकविण्यात येणे, असे मान्यता नसलेले अभ्यासक्रम शिकवून शासन विद्यार्थ्यांची करीत असलेली घोर फसवणूक, परिणामी वैद्यकिय क्षेत्रात व जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष, या प्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही ."

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. (..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यातील जेवढी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आहेत व त्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर, पदवी आणि पदविका यांच्यासाठी जे कोर्सेस आहेत, ते रजिस्टरर्ड आहेत की नाहीत यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. आज त्याठिकाणी अनेक कोर्सेस उपलब्ध असून एकंदरित 29 विषयांमध्ये आपण पोस्ट ग्रॅज्युएशन करतो. माझा याठिकाणी असा प्रश्न आहे की, आपण ज्या विषयात पदवी किंवा पदविका घेतो, त्यापैकी किती कोर्सेस अन-रजिस्टर्ड आहेत की ज्याला एम.सी.आय.ची मान्यता नाही ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पी.जी.साठी एकूण 201 कोर्सेस आहेत.

डॉ.दीपक सावंत : 29 विषयांतील एकूण किती कोर्सेस अन-रजिस्टर्ड आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एकूण पी.जी. कोर्सेस 201 आहेत. त्यात 66 कोर्सेस रेकग्नाईज असून ते एम.सी.आय.कडे आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, 66 कोर्सेस नसून 68 कोर्सेस अन-रजिस्टर्ड आहेत. आपल्या मते, ते कोर्सेस किती वर्षांपासून अन-रजिस्टर्ड आहेत ? आणि ते करण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पी.जी.,डीग्री.,डिप्लोमासाठी जे रेकग्नाईज कोर्सेस आहेत, त्यासंबंधीचा प्रश्न प्रायर टू 1992 चे आहेत. त्यावेळी कोर्सेसची डायरेक्ट परवानगी घेऊन वैद्यकीय महाविद्यालयात कोर्सेस स्टार्ट केले जायचे. त्यानंतर एम.सी.आय.चे इन्स्पेक्शन होऊन कोर्सेस रेकग्नाईज व्हायचे. त्यानंतर म्हणजे 1992 नंतर ही सिस्टीम चेंज करण्यात आली. आता नवीन जी.आर.नुसार एम.सी.आय.च्या मान्यतेशिवाय विषय स्टार्ट करता येत नाहीत. जेवढे कोर्सेस पेडींग आहेत, ते सर्व 1992 च्या पूर्वीचे आहेत. याचे पहिले कारण, असिस्टंट प्रोफेसर आणि लेक्चरर्सची पदे न भरल्याचे असून दुसरे कारण, लॅक ऑफ इक्यूपमेंट आणि इन्फ्रास्ट्रक्चरचे असून या दोन कारणांमुळे रिकगनेशन थांबले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एम.सी.आय.चे कोर्सेस घेऊन एखादा विद्यार्थी डॉक्टर झाल्यानंतर तो मुंबईच्या आणि महाराष्ट्राच्या बाहेर प्रॅक्टीस करु शकत नाही, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. आज लाखो रुपये खर्च करुन मुले डॉक्टर होतात. परंतु त्यांना प्रॅक्टीस करता येत नाही.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

अशाप्रकारे शासनाने विद्यार्थ्यांची केविलवाणी परिस्थिती केली आहे. त्याचप्रमाणे शासनाचे असे म्हणणे आहे की, या विद्यार्थ्यांकडे एम.बी.बी.एस. ही मूलभूत अर्हता असल्यामुळे ते प्रॅक्टिस करु शकतात. मग प्रश्न असा निर्माण होतो की, या विद्यार्थ्यांनी शस्त्रक्रिया करायच्या की नाहीत ? समजा एखादा नेत्र शल्यचिकित्सक असेल आणि त्यांने कोर्सला एम.सी.आय.ची परवानगी नसलेल्या महाविद्यालयांमधील डिग्री, डिप्लोमा घेतला असेल तर त्या विद्यार्थ्यांना राज्याबाहेरील इतर राज्यात प्रॅक्टिस करता येणार नाही, ही बाब माननीय मंत्रीमहोदयांना माहित आहे काय ? याबाबतीत शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ? ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये 4 कोर्सेस अनरजिस्टर्ड आहेत. नागपूर येथील इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमध्ये 13 कोर्सेस अनरजिस्टर्ड आहेत. अशाप्रकारे शासन विद्यार्थ्यांची दिशाभूल करीत आहे. त्यामुळे या महाविद्यालयांमध्ये आवश्यक तो स्टाफ भरणार काय ? त्याचप्रमाणे अनरजिस्टर्ड कोर्स केलेल्या डॉक्टरांना प्रॅक्टिस करण्याची परवानगी देण्याबाबत शासन एम.सी.आय. कडे प्रयत्न करणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासनाने विद्यार्थ्यांची दिशाभूल केलेली नाही. महाविद्यालयांकडून कोर्सेसचे जे माहितीपत्रक विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यापूर्वी देण्यात येत असते त्यामध्ये एम.सी.आय.ची परवानगी नसल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले असते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एम.सी.आय.ची परवानगी नाही, असे म्हणणे हे शासनाला शोभादायक वाटते काय ? गुजराथमध्ये किंवा इतर राज्यात प्रॅक्टिस करता येणार नाही, असे आपण आपल्या मुलाला सांगू शकाल काय ? It is Humiliation. सन 1992 पासून हे कोर्सेस महाविद्यालयांमध्ये सुरु आहेत परंतु आजपर्यन्त शासनाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे आता विशेष प्रयत्न करुन या कोर्सेसना एम.सी.आय.ची परवानगी मिळविणार काय आणि महाविद्यालयांमध्ये जी रिक्त पदे आहेत, ती भरण्यात येतील काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरच हे सांगितले आहे की, कोर्सेससंबंधी जे माहितीपत्रक विद्यार्थ्यांना देण्यात येते त्यामध्ये कोर्स अनरजिस्टर्ड असल्याबाबत स्पष्टपणे नमूद केलेले असते. तरी देखील विद्यार्थी अशा कोर्सला प्रवेश घेतात. परंतु, महत्वाचा मुद्दा आता असा आहे की, ही सर्व कोर्सेस रेग्युलराईज करणे. इक्युपमेंटबाबत सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली आहे. औरंगाबाद येथील महाविद्यालयात एम.आर.आय. सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री महोदय असत्य माहिती सभागृहाच्या पटलावर आणीत आहेत. एका बाजूला हे जाहीरपणे म्हटले जाते की, कोर्स रजिस्टर्ड नाहीत. तरी देखील विद्यार्थी प्रवेश घेतात कारण त्यांची ती गरज आहे. परंतु, अशा बेकायदेशीर गोष्टी शासन कशा चालविते ? हे सर्व थांबविले पाहिजे. हे न करता विद्यार्थ्यांचे हयुमिलेशन करण्यात येत आहे, लुटारुंसारखे चालले आहे. विद्यार्थ्यांना इतर राज्यात प्रॅक्टिस करता येईल की नाही, याच्याशी शासनाचा संबंध नाही, असे म्हणणे बेकायदेशीर आहे. त्याऐवजी या सर्व कोर्सेसना एम.सी.आय.ची मान्यता घ्या आणि मग सुरु ठेवा. मान्यता नसलेले कोर्स शासन कसे चालवू शकते ?

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. शासन म्हणून ही बाब शासनाला अतिशय लाजिरवाणी आहे. घाबरु नका, एमबीबीएस असल्यामुळे तुम्हाला प्रॅक्टिस करता येईल, असे विद्यार्थ्यांना सांगणे, योग्य नाही. अशाप्रकारे पळवाट काढली जात आहे. अशाप्रकारे अनरजिस्टर्ड कोर्स केवळ शासनातर्फेच चालविले जातात असे नाही तर खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमार्फतदेखील चालविले जात आहेत. परदेशातील डिग्री कोर्सेस अशा खाजगी महाविद्यालयांमार्फत चालविले जातात, परंतु सदर कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या राज्यात देखील प्रॅक्टिस करण्याची मुभा नाही. असा सर्व प्रकार सुरु आहे. ही एक प्रकारे विद्यार्थ्यांची फसवणूक आहे आणि महत्वाचे म्हणजे या सर्व गोष्टींना शासनाचे आशीर्वाद आहेत. तेव्हा, हे सर्व प्रकार शासन थांबवेल काय ? अनरजिस्टर्ड कोर्स रजिस्टर्ड करण्यासाठी एम.सी.आय.कडे प्रयत्न केले जातील का ? आणि याव्दारे विद्यार्थ्यांची जी फसवणूक होत आहे ती थांबविली जाईल का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंदर्भात एम.सी.आय.कडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे यासंदर्भात बैठका देखील घेण्यात येत आहेत. उदाहरण म्हणून एक पत्र मी आपल्याला वाचून दाखवितो. "Subject: Admissions in the Postgraduate Medical Courses-Information in respect of recognition status regarding." In this letter it is mentioned, "The Council in the light of this,

..3.....

अशोधित प्रत / अशोधित नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

has considered the matter and it was decided that Competent Authorities be requested to ensure that the recognition status in respect of each of P.G. qualifications be indicated in the notification/prospectus of P.G. admissions so as to enable the students to remain informed about the same...."

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

आता याप्रमाणे एम.सी.आय.ने स्वत: हे पत्र देऊन असे सांगितलेले आहे की, सदर कोर्सेस हे अनरेकग्नाईज्ड असल्याचे जाहीर करुन महाविद्यालयांमध्ये शिकविण्यास सुरु करा. सन 1992 पासून सदर केस प्रलंबित आहे, त्याच्यावर लवकरात लवकर निर्णय घेऊन कोर्सेसना मान्यता मिळविण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : आता 2007 साल उजाडले.

श्री.एम.ए.अजीज : यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांचे असे म्हणणे आहे की, जे नॉन रेकग्नाईज्ड कोर्सेस आहेत ते रेकग्नाईज्ड करण्याची प्रोसेस अद्याप चालू आहे, ती लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल परंतु मेडिकल कॉलेजेस व जे जे हॉस्पीटलमध्ये तुमच्या कार्डियालॉजीमध्ये डॉ.बन्सल यांना प्रलंबित करण्यात आले होते कारण त्यांनी नॉन रेकग्नाईज्ड कार्डियॉलॉजी कोर्स केला होता आणि हाच कोर्स जसलोक आणि लिलावतीसारख्या हॉस्पीटलमध्ये रेकग्नाईज्ड केला आहे. तुमची ब-याच वेळा तक्रार अशी असते की, तुम्हाला सदर कोर्सेस शिकविण्याकरिता प्रायव्हेट टिचर्स मिळत नाहीत. प्रायव्हेट टिचर्स हे प्रायव्हेट कॉलेजेसमध्ये जातात कारण त्यांना तेथे चांगला पगार दिला जातो. मग तुम्ही याकरिता ऑनररी टिचर्स का अपॉईंट करीत नाहीत ?

डॉ.दीपक सावंत : पूर्वी अशा प्रकारे ऑनररी लेक्चरर्स अपॉईंट केले जात होते.

श्री.सुरेश शेट्टी : ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये कोणकोणते कोर्सेस अन रेकग्नाईज्ड आहेत ते मी आता वाचून दाखवितो.एम.डी.(सायकॉलॉजी),एम.डी.पी.एच.एम.,डी.पी.एच,याकरिता प्रत्येकी एक - एक लेक्चरर भरती करावयाचे आहेत, तसेच व्हिजिटकरिता एक चांगली बसदेखील विकत घ्यावयाची आहे. एम.डी.(सायकॅट्रीस्ट),डी.पी.एम.,एम.डी.(स्किन),डी.व्ही.डी. (डिप्लोमा), एम.डी. (रेडियॉलॉजी), अे.पी.आर. तीन असोसिएट प्रोफेसरची व्हेकॅन्सी भरावयाची बाकी आहे. येथे काही टिचींग तसेच नॉन टिचींग स्टाफ " खास बाब " म्हणून भरण्याकरिता एम.पी.एस.सी.कडे रिक्वीजिशन देण्यात आलेली आहे,त्याचीही प्रोसेस चालू आहे. मला असे वाटते की, तीन - सहा महिन्यात ती सुध्दा प्रोसेस पूर्ण होईल. संपूर्ण मेडिकल कॉलेजचे मिळून अशा 90 प्राध्यापकांच्या पदांचे रिक्विजिशन आम्ही एम.पी.एस.सी.कडे पाठविलेले आहे.

GG -2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

असोसिएट प्रोफेसरच्या 141 व्हॅकॅन्सीज आहेत, लेक्चररच्या 643 व्हेकॅन्सीज आहेत, लेक्चररचे तर इंटरव्हयू सुध्दा सुरु झालेले आहेत. ही प्रोसेस लवकरात लवकर पूर्ण होईल, असे मला वाटते.

श्री.अरविंद सावंत : सदर प्रोसेस कधी पूर्ण होईल ?

श्री.सुरेश शेट्टी : आम्ही आता एम.पी.एस.सी.ला लवकरात लवकर सदर पदांच्या भरतीची प्रोसेस सुरु करण्याची विनंती करु शकतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अंबरनाथ (जि.ठाणे) येथे केमिकल झोनमुळे टी.बी.रुग्णांच्या संख्येत झालेली वाढ

मु.शी.: अंबरनाथ (जि.ठाणे) येथे केमिकल झोनमुळे टी.बी.रुग्णांच्या संख्येत झालेली वाढ याबाबत सर्वश्री.मुझफ्फर हुसेन,सुधीर सावंत,संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मुझफ्फर हुसेन (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निवडलेले) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शहराच्या पश्चिम विभागातील केमिकल्स झोनमुळे तेथील परिसरात टी.बी.च्या रुग्णांमध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याची धक्कादायक घटना माहे नोव्हेंबर, 2006 च्या शेवटच्या आठवड्यात आढळून येणे, सदर परिसरात बहुतांश इ ोपडपट्टीचा भाग असल्याने ही साथ उग्ररुप धारण करीत असणे, अंबरनाथ हे औद्योगिक शहर असल्याने पश्चिम भागात रासायनिक कंपन्यांचे प्रमाण जास्त असून तेथील रहिवाशांच्या आरोग्यावर याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊन रहिवाशांना टी.बी. ची लागण होणे, त्यामुळे पालिकेच्या रुग्णालयात कितीतरी पटीने क्षयरोगाचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत असणे, यामुळे रुग्णांमध्ये तसेच नागरीकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे(ग्रामविकास,सार्वजनिक आरोग्य,कुटुंब कल्याण,पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) :अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन : अंबरनाथ या परिसरामध्ये टी.बी.च्या रुग्णांच्या संख्येमध्ये झालेली वाढ यासंबंधीच्या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये आपण या गोष्टी कबूल केलेल्या आहेत की, सर्व ठिकाणी झोपडपट्टयांची वाढ झालेल्या असल्यामुळे त्या परिसरामध्ये छोटे छोटे उद्योग, लघुउद्योग यांच्या संख्येमध्ये भरमसाठ वाढ होत आहे. प्रत्येकी एक लाख लोकसंख्येमागे 151 क्षयरोगाचे रोगी आढळत आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन .....

अंबरनाथ येथे प्रति एक लाख लोकसंख्ये मागे सन 2004-05 मध्ये 131, सन 2005-06 मध्ये 137 तर सन 2006-07 मध्ये फेब्रुवारी 2007 अखेर 145 क्षयरुग्ण आढळून आले आहेत. सदर प्रमाण अपेक्षित प्रमाणापेक्षा कमी आहे. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी निवेदनातील शेवटच्या परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की, "अंबरनाथ परिक्षेत्रातील उपचार पथक, सुक्ष्मदर्शी केंद्र, डॉटस सेंटर व्यवस्थितरित्या कार्यरत असून या यंत्रणेमार्फत क्षयरुग्णांना चांगल्या प्रकारे प्रत्यक्ष देखरेखीखाली औषधोपचार मिळत आहे." माझा प्रश्न असा आहे की, अंबरनाथ परिक्षेत्रातील क्षयरुग्ण प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये औषधोपचारासाठी जातात त्याबाबतची माहिती शासनाकडे उपलब्ध आहे काय ? ती माहिती शासनाकडे उपलब्ध नसेल तर का नाही ? लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये पुढे असे नमूद केलेले आहे की, "....तसेच या यंत्रणेमार्फत जे रुग्ण औषधोपचार अर्धवट सोडतात त्यांच्या घरी भेट देवून रुग्णांना पुन्हा औषधोपचार घेण्यास प्रवृत्त केले जाते." माझा प्रश्न असा आहे की, मागच्या एक वर्षामध्ये अशा किती रुग्णांना औषधोपचारासाठी प्रवृत्त केले गेले ? लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये पुढे असे नमूद केलेले आहे की,"...प्रदूषण मंडळाच्या फिरत्या प्रयोग शाळेद्वारे अंबरनाथ परिसरामध्ये दोन ठिकाणी दिनांक 13, 14, 15 व 16 मार्च, 2007 रोजी हवेची गुणवत्ता तपासण्यात आली." ही लक्षवेधी सूचना लागल्यामुळे प्रदूषण मंडळाच्या फिरत्या प्रयोग शाळेला जाग आलेली आहे, असे वाटते. माझा प्रश्न असा आहे की, मागच्या एका वर्षामध्ये किती वेळा हवामान तपासण्यात आले आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसैन यांनी एकूण चार प्रश्न विचारलेले आहेत. चौथा प्रश्न प्रदूषण मंडळाच्या संदर्भातील आहे. ही लक्षवेधी सूचना प्रदूषण मंडळ आणि आरोग्य विभागाशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी अंबरनाथ परिक्षेत्रातील क्षयरुग्ण प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये आणि सरकारी हॉस्पिटलमध्ये औषधोपचारासाठी जातात त्यासंदर्भातील माहिती शासनाकडे उपलब्ध आहे काय, आणि असल्यास ती किती आहे ? असे दोन प्रश्न विचारले. या दोन्ही प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. खाजगी आणि सरकारी हॉस्पिटलमधील क्षयरुग्णांची माहिती माझ्याकडे आहे. अंबरनाथ नगरपरिषदेच्या

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे .....

हद्दीतील 12 हॉस्पिटलची यादी माझ्याकडे आहे. आदित्य नर्सिंग होम, संजिवनी हॉस्पिटल, उषा नर्सिंग होम, आश्वीनी हॉस्पिटल, सिद्धार्थ हॉस्पिटल अशी एकूण 12 हॉस्पिटलची यादी आहे. मी ती यादी सभागृहाच्या पटलावर ठेऊ शकतो. सन 2005-06 मध्ये खाजगी हॉस्पिटलमध्ये 72 आणि फेब्रुवारी, 2007 पर्यंत 71 क्षयरुग्ण आढळून आलेले आहेत. निकृष्ठ वायुविजन व्यवस्थेमुळे अंबरनाथ परिसरामध्ये क्षयरुग्णांचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे. गरीब लोकांमध्ये क्षय रोगाचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे. लोकल हॉस्पिटलमध्ये 70 टक्के आणि प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये 30 टक्के क्षयरुग्ण येतात. एक लाख लोकसंख्येमागे प्रती वर्षी खाजगी आणि सरकारी हॉस्पिटलमध्ये 216 क्षयरुग्ण आढळून आले आहेत. माझ्याकडे अंबरनाथ परिसरातील क्षयरुग्णांची सन 2005, 2006 आणि 2007 मधील आकडेवारी आहे. सन 2005-06 मध्ये अंबरनाथ म्युनिसिपल हॉस्पिटलमध्ये 442 आणि खाजगी रुग्णालयामध्ये 72 असे एकूण 514 क्षयरुग्ण आढळून आले होते. एक लाख लोकसंख्येमागे प्रतीवर्षी हे प्रमाण 1.71 एवढे आहे.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे .....

2006-2007 पर्यत 428 रुग्ण टी.बी. हॉस्पीटलमध्ये व 71 खाजगी रुग्णालयात भरती झाले होते. याची सरासरी 179 आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांचा तिसरा प्रश्न पुन्हा विचारावा.

श्री.मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, प्रश्न विचारण्याचा उद्देश एवढाच नसतो की आम्हाला त्याचे उत्तर मिळावे तर, प्रशासनाने त्याची जबाबदारी जाणून घेणे हे महत्वाचे असते. स्थानिक स्वराज्य संस्थांची जी रुग्णालये आहेत, त्यांच्या बाबतीत त्यांची स्वत:चीच जबाबदारी असते, तेथे शासनाची जबाबदारी नसते असा शासनाचा जो दृष्टीकोन आहे, त्यात कोठेतरी बदल होण्याची गरज आहे. कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ इत्यादी ठिकाणी प्रदुषणाचा प्रश्न आहे व त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे प्रश्न वेगवेगळे नसून एकमेकाशी संबंधित आहेत, म्हणून आरोग्य विभागाने तशा प्रकारच्या सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या पाहिजेत. टी.बी. चे रुग्ण आढळण्याचा अपेक्षित दर प्रती एक लाख लोकसंख्येमागे एक वर्षासाठी 151 रुग्ण असा आहे. तर तुम्ही तीन लाख, साडेचार लाख लोकसंख्या गृहीत धरुन रुग्णांचे आकडे सांगत असाल तर रुग्णांच्या संख्येचा आकडा कमी कसा होणार ? यासाठी आपण काय करणार आहात ? याचे उत्तर आपण द्यावे. रुग्णांची संख्या 440, 450 किंवा 460 असू शकते, हे प्रमाण अपेक्षित प्रमाणापेक्षा कमी आहे, असा विचार न करता हया केसेस कमी करण्यासाठी आपण काय पुढाकार घेत आहात ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, टी.बी. चा पेशंट आमच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांचा एक्स- रे काढतो आणि टी.बी. असल्याचे निदान झाल्यानंतर त्यावर उपचार सुरु केले जातात. निदान झाल्यानंतर सात दिवसाच्या आत रुग्णास उपचारासाठी डॉट सेंटर वर आणले जाते. हेल्थ वर्करच्या देखरेखीखाली ट्रिटमेंट चालू केल्यानंतर त्याची थुंकी तपासून दोन महिन्यापर्यंत मॉनीटर केले जाते. त्यानंतर कॅट 1 व 3 मध्ये सहा महिन्यापर्यत ठेवले जाते. टी.बी. चे निदान झाल्यानंतर कॅट 2 मध्ये सहा महिन्यासाठी ठेवले जाते. तपासणी केल्यानंतर 90 टक्के रुग्ण बरा होऊ शकतो असे आढळून आल्यास त्याला आणखी 8 महिने कॅट 2 मध्ये ठेऊन उपचार करण्यात येतात. यानंतरही पेशंटने उपचारास प्रतिसाद दिला नाही तर सध्याच्या नवीन

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे .....

पध्दतीनुसार डॉटप्लसमध्ये त्या पेशंटला रिफर केले जाणार आहे. या व्यतिरिक्त हेल्थ वर्कर घरोघरी जाऊन ट्रिटमेंट करतात त्याची नोंद आमच्याकडे असते. घरोघरी जाऊन रुग्णांशी चर्चा करुन त्यांची मानसिक तयारी करुन रुग्णालयातील औषधोपचारासाठी त्यांना प्रवृत्त केले जाते व त्यांना रुग्णालयात दाखल केले जाते.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे क्षेत्रात 12 रासायनिक कारखाने आहेत, हे निवेदनात मान्य केलेले आहे. प्रदुषणाचा विपरीत परिणाम होऊन टी.बी. चा प्रादुर्भाव होतो हे सुध्दा निवेदनामध्ये मान्य केलेले आहे. प्रदुषण ही मूळ समस्या आहे, त्याच्यामुळे टी.बी. चा प्रादुर्भाव होतो, त्याबाबत शासन कोणती ठोस कारवाई करणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या परिसरात जे रासायनिक कारखाने आहेत, त्यांच्यावर मागील सहा महिन्यामध्ये कोणती कारवाई करण्यात आली आहे, याची माहिती आपण देऊ शकाल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न प्रदुषण बोर्डासंबंधी आहे, दुसऱ्या विभागाचा प्रश्न असल्यामुळे त्याचे उत्तर माझ्याकडे नाही. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे की, प्रदुषणामुळे टी.बी. चा प्रादुर्भाव होतो, तर त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की प्रदुषणामुळे टी.बी. होत नाही. ज्या ठिकाणी दाट लोकसंख्या, दमट, कुबट वातावरण व अस्वच्छता असते अशा ठिकाणी टी.बी. चा प्रादुर्भाव होतो. प्रदुषण अनेक ठिकाणी आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ....

टीबी होण्यामागे जी अनेक कारणे असतात त्यापैकी हेही एक कारण आहे, म्हणजेच पोल्यूशन हे त्यातीलच एक कारण आहे. या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे हे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे काम असून मंडळ त्यादृष्टीने काम करीत आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असाही एक प्रश्न विचारला आहे की, किती कंपन्यांवर आपण या संबंधात कारवाई केली ? तर त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, आतापर्यंत तेथील एमआयडीसीमधील पाच उद्योगांवर आपण कारवाई केलेली आहे.

*****

..... जेजे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्य परिवहन महामंडळाच्या मोक्याच्या जागा रिलायन्स कं. सारख्या खाजगी विकासकाला विकसित करण्यासाठी देणे.

मु.शी. : राज्य परिवहन महामंडळाच्या मोक्याच्या जागा रिलायन्स कं. सारख्या खाजगी विकासकाला विकसित करण्यासाठी देणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी नियम 101 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी त्यांना विनंती करतो...

" तोट्यात असणारे राज्य परिवहन महामंडळ फायद्यात येण्याकरिता बी.ओ.टी. तत्त्वावर राज्य परिवहन महामंडळाच्या मोक्यावरील जागा विकसित करण्याकरिता बिल्डरांना देण्याचा निर्णय अलिकडेच राज्य परिवहन महामंडळाने घेणे., या जागेवर राज्य परिवहन महामंडळाने बिल्डरकडून स्वत:करिता अत्याधुनिक बस स्थानक बांधून घेणे व उर्वरित जागेवर मोठमोठे शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे, अशापैकी मुंबईतील बोरिवली येथील बस स्थानकाची जागा बांधा-वापरा-हस्तांतरित करा तत्त्वावर विकसित करण्याकरिता रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीने 23 कोटी रूपयांचा प्रिमियम देऊन घेणे, बोरिवली पाठोपाठ सोलापूर, नागपूर, नाशिक या तिन्ही जागांकरिता अन्य विकासकांच्या तुलनेत दुप्पट ते तिप्पट रक्कम मोजण्याची तयारी रिलायन्सने दाखविणे, या जागा विकासकाला पूर्वी ठरविल्याप्रमाणे 30 वर्षांकरिता न देता आता 60 वर्षांच्या कालावधीकरिता देण्याचा निर्णय प्रशासनाने घेणे, यामुळे राज्य परिवहन महामंडळाबद्दल नागरिकांच्या मनात निर्माण झालेला संशय व असंतोष यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.धर्मराबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) .... जेजे 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा.परिवहन राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सारा महाराष्ट्र जणू काही रिलायन्सला विकायला काढला आहे अशा प्रकारे गेल्या वर्षभरामध्ये या शासनाने निर्णय घेतले असल्याचे दिसत आहे. या ठिकाणी उत्तरामध्ये आपण म्हटले आहे की, मुंबईतील बोरीवली येथील एसटी डेपोची जागा 23.01 कोटी रूपयांना 30 वर्षांच्या लीजवर रिलायन्स इंडस्ट्रीज लि. यांना विकसित करण्यासाठी दिलली आहे. सभापती महोदय, अगोदरच महाराष्ट्रात सर्वात जास्त म्हणजे जवळपास 42 ट क्के शहरीकरण झालेले आहे असे आपलाच अहवाल सांगतो आहे. असे असताना शासनाच्या किंवा निमशासकीय संस्थांच्या ताब्यात अधिक जमिनी असणे आवश्यक आहे. परंतु आपण आपल्या ताब्यात असलेल्या जमिनी अशा प्रकारे खाजगी लोकांना देत आहात. बोरीवली येथील डेपोची जागा 23.01 कोटीला रिलायन्स कंपनीला दिलेली आहे. पण त्यासाठी आपण टेंडरही काढले नाही. त्याचे कारण काय ? तसेच सोलापूर, नागपूर येथील जमिनींच्या बाबतीतही आपण केले आहे. तेथील जमिनी देण्यासाठी आपण टेंडर काढलेले नाही. केवळ यामध्ये रिलायन्स उद्योगचा देकार हा अन्य देकारांच्या तुलनेत सर्वोच्च असल्याचे आपण यामध्ये म्हटलेले आहे. तर हे अन्य देकारदार कोण होते आणि त्यांनी किती देकार यासाठी दिलेला होता ? दुसरे म्हणजे यांच्याकडून आपण ओपन ऑफर्स का मागविल्या ? यासाठी टेंडर का मागविली नाहीत ? डेपो बांधून देण्यासाठी अशा प्रकारे जागा देताना आपल्या अटी व शर्ती काय आहेत ? 30 वर्षांचे लीज दिलले आहे असे आपण म्हणता आहात पण 100 वर्षे झाल्यानंतरही आजपर्यंत बीएमसीला अशा प्रकारे लीजवर दिलेली जमीन परत आलेली नाही. त्यामुळे याही जमिनी पुन्हा शासनाकडे वा महामंडळाकडे परत येणार नाहीत हे निश्चित. तेव्हा यामध्ये अन्य देकार कोणाचे होते आणि किती होते ? तसेच रिलायन्सलाच आपण हे का दिले आणि यासाठी निविदा का काढण्यात आलेल्या नव्हत्या ?

श्री. धर्मराबबाबा आत्राम : सभापती महोदय, बोरीवली येथे जवळजवळ 7.66 कोटीचा प्रस्ताव तयार केलेला होता. त्यामध्ये आपण ज्या निविदा मागविल्या त्यामध्ये 13 निविदा आपण विक्री केलेल्या आहेत. त्यापैकी 6 लोकांनी प्रत्यक्षात निविदा भरलेल्या आहेत. त्यापैकी रिलायन्स उद्योगाने 23.01 कोटी हा दर कोट केलेला आहे. त्यामध्ये ताडडिया कंपनी,औरंगाबाद यांनी 12.58 इतका दर कोट केला होता. तसेच मंत्री रिअल इस्टेट यांनी 10.25 कोटी इतका दर दिला होता, पारेख कंपनीने 6.11 कोटीची निविदा दिलेली होती तसेच शगुन कंपनी,मुंबई यांनी 5.72

..... जेजे 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोटीचा दर दिला होता, त्यात ठक्कर कंपनीनेदेखील असाच दर कोट केलेला होता. पण या सर्वांपेक्षा दुपटीने जास्त दर रिलायन्स उद्योगाने कोट केलेला असल्याने त्यांच्याशी ॲग्रीमेंट केलेले आहे व त्यांनी त्यासाठीची 40 टक्के रक्कम देखील दिलेली आहे. 31 ऑक्टोबर 2006 ला शासनाने त्यांना हे काम दिलेले आहे.

श्री. मधुकर चव्हाण : आणि नागपूर, सोलापूरच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, गांधीबाग,नागपूर येथील डेपोच्या जागेसाठी जवळ जवळ 13..5 कोटीचे एस्टिमेट होते. त्यासाठी 13 जणांनी निविदा घेतल्या त्यापैकी 8 जणांनी प्रत्यक्षात निविदा भरल्या. त्यामध्ये चांडक कंपनी,अकोट यांनी 81.10 कोटीचे टेंडर भरले असून त्यांचे टेंडर विचाराधीन आहे. तसेच नागपूर येथील मोरभवन प्रकल्पाची किंमत 5.33 कोटीची आहे. त्यासाठी 9 जणांनी टेंडर फॉर्म्स घेतले होते पैकी 6 जणांनी प्रत्यक्ष टेंडर भरले होते त्यामध्ये 15.17 कोटी इतर दर रिलायन्सचा होता आणि तो सर्वोच्च आहे.

(यानंतर श्री. सरफरे ....केके 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम..

दुसरे सोलापूर-पुणे नाका येथील 1.88 कोटीकरिता 11 अर्ज देण्यात आले होते त्यापैकी 3 जणांनी निविदा भरल्या. त्यामध्ये 60 लाख 68 हजार रुपयांची निविदा भरुन रिलायन्स कंपनीने भूखंडाची मागणी केली असून ती विचाराधीन आहे. शहागंज,औरंगाबाद येथील भूखंडाकरिता 1 कोटी 50 लाखाच्या 6 निविदा काढल्या होत्या, त्यापैकी 6 लोकांनी अर्ज भरले. त्यामध्ये 2.70 लाख इतकी सर्वात मोठी निविदा कुमार बिल्डर, पुणे यांनी भरली असून ती विचाराधीन आहे. नाशिक महामार्ग येथील भूखंडाकरिता रिलायन्स इंडस्ट्रिजने 5 कोटी 98 लाख रुपयांची निविदा भरली आहे. सर्वात जास्त रकमेची ही निविदा असल्यामुळे ती विचाराधीन आहे. फक्त रिलायन्स या एकाच कंपनीने बोरीवलीच्या जागेकरिता 23 कोटीची निविदा भरली आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एस.टी. महामंडळाच्या भल्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला, अशाप्रकारचे निवेदन मंत्रिमहोदयांनी केले. प्रश्न असा आहे की, हे भूखंड विकण्याकरिता शासनाने कोणते धोरण अवलंबिले आहे? उदा. शहागंज, औरंगाबाद येथील एस.टी. महामंडळाचा स्वत:चा भूखंड आहे. तो संपूर्ण भूखंड कमर्शिअल पर्पजकरिता विक्रीसाठी काढला आहे की, त्यामधील काही ठराविक भाग विक्रीसाठी काढला आहे? दुसरे असे की, महामंडळाचे जे भूखंड आहेत त्यामधील रस्त्यालगत असलेले भूखंड फक्त उद्योजक विकत घेतात. परिणामी महामंडळाची जी इतरत्र पडिक जमीन आहे ती मातीमोल भावाने विकण्याची वेळ महामंडळावर आली तर कुणीही ती विकत घेणार नाही. याकरिता हे भूखंड विक्रीच्या बाबतीत कोणते धोरण अवलंबिले आहे? महामंडळाचे असलेले सर्व 100 टक्के भूखंड विकसित करण्यासाठी घेतले जात आहेत की, त्यातील ठराविक भाग विकसित करण्यासाठी घेतला जात आहे? एस.टी. महामंडळाचे होणारे नुकसान टाळण्याकरिता हे भूखंड विकण्यासंबंधी आपण कोणते निकष लावले आहेत?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, शहागंज, औरंगाबाद येथील जागेकरिता 6 लोकांनी अर्ज भरले. संपूर्ण जागेचे डेव्हलपमेंट करण्याकरिता ती देण्यात आली आहे. त्यामध्ये एस.टी. महामंडळाच्या आगाराचा समावेश केला आहे. त्याशिवाय शॉपिंग कॉम्प्लेक्स म्हणून त्या जागेचा विकास करण्यात येणार आहे.

श्री. अरविंद सावंत : शहागंज, औरंगाबाद याठिकाणी एकूण किती जमीन आहे, आणि प्रत्यक्षात किती जमीन खाजगी उद्योजकांना विकसित करण्यासाठी दिली आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, बोरीवली येथील जागा रिलायन्स कंपनीला दिली असे मंत्रिमहोदय ठामपणे सांगत आहेत. त्याचवेळी सोलापूर, नाशिक व नागपूर येथील जागेसाठी रिलायन्स कंपनीने दिलेले प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सांगितले जात आहे. यामध्ये काहीतरी काळेबेरे असण्याची शक्यता आहे. तेव्हा या जमीन विक्रीच्या संदर्भात रिलायन्स कंपनीचा विचार सोडून सेकंड हायेस्ट बीड आले असेल त्याचा विचार करणार काय? कारण या व्यवहारामध्ये मॅन्युपुलेट झाल्याची शंका आहे. म्हणून हे भूखंड एकाच कंपनीला न देता सर्वच निविदांबाबत आपण फेरविचार करणार काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, राज्यात जवळ जवळ 41 ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर कामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी 12 ठिकाणी कामे पूर्ण झाली आहेत 9 ठिकाणी कामे सुरु आहेत, 20 ठिकाणी कामे मंजूर आहेत. त्याचप्रमाणे नवीन कंस्ट्रक्शन 6 ठिकाणी सुरु आहे. सभापती महोदय, रिलायन्स कंपनीतर्फे फक्त चार अर्ज प्राप्त झाले. त्यामध्ये त्यांनी दुपटीहून अधिक किंमत दर्शविली असल्यामुळे आणि त्यांचे दर जास्त असल्यामुळे त्यांना आपल्याला काम द्यावे लागेल.

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, बी.ओ.टी. तत्वावर महामंडळाचे भूखंड विकसित करण्यासाठी दिले जात आहेत. त्याठिकाणी आपल्याला कमर्शिअल कॉम्प्लेक्स तयार करावयाचे असेल तर ते करीत असतांना महानगरपालिकेच्या आराखडयामध्ये बदल करण्याकरिता आपण महानगरपालिकेची परवानगी घेतली काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, फक्त नागपूर महानगरपालिकेच्या बाबतीत एकाच ठिकाणी अशाप्रकारची अडचण आली होती. त्या संदर्भात नागपूर महानगरपालिकेकडे परवानगी मागितली आहे. त्यांची मान्यता मिळाल्यानंतर त्याठिकाणी बांधकाम सुरु करणार आहोत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, 30 वर्षाच्या लीजने जागा दिलेल्या आहेत. आता 60 वर्षाच्या लीजने जागा देण्याचे कारण काय आहे ? केवळ बीड जास्त आले म्हणून लीजचा कालावधी वाढवतो आहोत काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : 30 वर्षापेक्षा जास्त वर्षांनी लीजने जमीन देण्याचा कोणत्याही प्रकारचा विचार नाही.

उपसभापती : रिलायन्स कंपनीच्या संदर्भाने अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. मी नुकताच तीन-चार दिवसापूर्वी माझ्या गावी गेलो होतो. त्या ठिकाणी शेतकऱ्यांचे फार मोठे शिष्टमंडळ मला येऊन भेटले. त्यांनी सरसकट तक्रार केली. साधारणत: चाकणपासून शिखरापूर मार्ग जो पुढे नगरपर्यन्त जातो त्या ठिकाणी रिलायन्स कंपनीने गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू केलेले आहे. रिलायन्सचे अधिकारी शेतकऱ्यांना सांगत आहेत की, आमचा प्रकल्प हा शासनाच प्रकल्प आहे, त्यामुळे या कामामध्ये तुम्ही व्यत्यय आणू शकत नाही. आम्ही तुम्हाला 900 रुपये गुंठा या दराने नुकसानभरपाई देऊ. तुम्ही आम्हाला अडचणीत आणले तर आम्हाला शासनामार्फत जमिनीचा कब्जा घ्यावा लागेल. शेतकऱ्यांची अशाप्रकारची सरसकट तक्रार होती. या संदर्भाने मी माझे मत शेतकऱ्यांसमोर आणि पत्रकारांसमोर व्यक्त केलेले आहे. रिलायन्स कंपनी अशा पध्दतीने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन भरपाई देत आहे. वास्तविक पहाता, या रोड टच जमिनी आहेत. शेतकऱ्यांनी उद्या त्या जागेवर विहीर खोदायची म्हटली किंवा शेतीच्या विकासासाठी आणखी काही योजना राबवायची म्हटली तर त्यांना तसे काही करता येणार नाही. अशाप्रकारे रिलायन्स शेतकऱ्यांच्या जमिनी लाटत आहे. उद्या हे शासन गव्हर्नमेंट ऑफ रिलायन्स अंडर टेकिंग आहे, असे म्हणण्याची वेळ राज्य शासनावर येऊ नये. एस.ई.झेड.च्या नावाखाली रिलायन्स कंपनी जमिनी घेत आहे. शेतकऱ्यांच्या साक्षी घेऊन यासंबंधीची चौकशी करावी. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात असतील तर, त्यांची फसवणूक होत असेल तर गुन्हा दाखल करावा. जर ते योग्य मोबदला देणार नसतील तर शेतकऱ्यांच्या जमिनी परत कराव्यात एवढीच या निमित्ताने शासनाला सूचना करत आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : ठीक आहे.

श्री.मधुकर चव्हाण : बोरिवली येथील एस.टी.च्या मालकीचा प्लॉट एकालाच कसा दिला ? त्या ठिकाणी मॅनिप्युलेशन झालेले आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.शेवाळे यांना सांगू इच्छितो की, आपण चाकण ते शिखरापूर या मार्गावर शेतकऱ्यांच्या जमिनी कोणत्या पध्दतीने त्यांनी ताब्यात घेतलेल्या आहेत हे शेतकऱ्यांना विचारले तर ते सांगू शकतील. रिलायन्सचे कर्मचारी असे सांगतात की, हा राज्य शासनाचा उपक्रम आहे, त्यांच्या वतीने आम्ही काम करत आहोत. आम्ही नुकसान भरपाई म्हणून प्रती गुंठा 900 रुपये देऊ. तुम्ही काही करू शकत नाही. आम्ही आमचे काम करू. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, त्यांचा हा व्यवहार तपासावयाचा असेल तर संबंधित खात्याचे मंत्री आणि सन्मानीय सदस्य श्री.शेवाळे आपण स्वत: आणि शासकीय यंत्रणेचे अधिकारी यांनी पुढच्या आठवड्यामध्ये त्या ठिकाणी व्हीजिट करून सत्यासत्यता पडताळून पहावी. हे मी जबाबदारीने बोलतो आहे.

श्री.जगन्नाथ शेवाळे : मला चाकणच्या संबंधाने काही म्हणावयाचे नाही. मला एस.टी.महामंडळाच्या जागेच्या संबंधाने सांगावयाचे आहे...

डॉ.दीपक सावंत : एकाच व्यक्तीला ती जागा कशी दिली ?

उपसभापती : मी हे विधान परवा केले. काल मी वर्तमानपत्रामध्ये वाचले की, केंद्रीय कृषीमंत्री यांनी देखील अशाच प्रकारचे विधान केलेले आहे. कोणत्याही खाजगी कंपनीने जमीन संपादित करत असताना त्यामध्ये शासन असू नये, असे माननीय श्री.शरद पवार साहेबांनी म्हटलेले आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, आपण जे म्हणत आहात त्या विषयावर माझे काही म्हणणे नाही. परंतु ज्या विषयावरील लक्षवेधी सूचनेवर चर्चा चालू आहे त्याबाबतीत माझे असे मत आहे की, राज्यामध्ये असे प्रकल्प...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या निवेदनाच्या माध्यमातून शासनामध्ये जे काही चाललेले आहे ते आपण मांडले.

श्री. जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, आपण बी.ओ.टी. तत्व का स्वीकारले हे आपल्याला माहीत आहे. यामध्ये ज्या काही त्रुटी असतील त्या जरुर दुरुस्त झाल्या पाहिजेत या मताचे आम्ही आहोत. परंतु त्याला स्टे देणे वगैरे काही करु नका. त्यातील त्रुटी दूर कराव्यात. त्रुटी दूर करण्याबाबत आमचे काही म्हणणे नाही.

उपसभापती : याबाबतीत राज्य शासन योग्य तो निर्णय घेईल. त्याला स्थगिती द्यावी असे मी म्हणणार नाही. परंतु एक वस्तुस्थिती आपल्याला मान्य करावी लागेल की, अशा प्रकारे एकच कंपनी सगळीकडे शिरकाव करावयास लागली तर एक दिवस हा महाराष्ट्र पांगळा करील, दुबळा करील. ही वृत्ती निश्चितपणे आहे.

श्री. मधुकर चव्हाण : रिलायन्स कंपनी धान्यही विकावयास लागली आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेचा जो विषय आहे तो बोरीवली येथील एस.टी. महामंडळाच्या प्लॉटच्या संदर्भात आहे. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने आपण या ठिकाणी जे निवेदन केले त्या निवेदनाचा आणि संबंधित राज्यमंत्री यांचा तसा सूतराम संबंध नाही किंवा त्यांच्याकडे हे खाते नाही. रिलायन्सने पाईप लाईन टाकतांना सिंधुदुर्ग, दोडामार्ग या भागामध्ये असे काम केलेले आहे. यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे हे स्पष्ट करण्यासाठी जर आपण बैठक बोलावली तर त्या बैठकीमध्ये माननीय उद्योग मंत्री उपस्थित असले पाहिजेत. ते या प्रश्नाशी निगडित आहेत. त्या ठिकाणी माननीय महसूल मंत्री उपस्थित असले पाहिजेत व संबंधित शासकीय अधिकारी उपस्थित असले पाहिजेत तसेच सभापती महोदय, आपण स्वत: तसेच सभागृहाचे सन्माननीय सदस्य उपस्थित राहतील अशी एक बैठक घेतली तर त्यातून या प्रश्नाला काही तरी चालना मिळू शकेल. लक्षवेधी सूचनेचा जो प्रश्न आहे तो एका जागेपुरता सीमित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. दिवाकर रावते : हायेस्ट टेंडरला दिले असे सारखे सांगण्यात येते. मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेच्या कामासाठी 35 हजार कोटी रुपयांचे टेंडर दिले होते. शासनाकडून ते काम 17 हजार कोटी रुपयांमध्ये झाले. एवढी लूट रिलायन्स कंपनी करीत आहे. या कंपनीने कॉर्पोरेट फार्मिन्ना काढले.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या ठिकाणी आपले मत मांडले ते एकाअर्थी बरोबर आहे परंतु लक्षवेधी सूचना फक्त या एकाच प्रश्नापुरती सीमित आहे असे आपण म्हणत असाल तर ही भूमिका चुकीची आहे. लक्षवेधी सूचना एका विषयाकरिता उपस्थित केली असली तरी त्यावेळी जर असे प्रश्न उपस्थित झाले तर ते गैर नाही. त्या प्रश्नांची तड लावण्यासाठी आपण जी भावना व्यक्त केली त्यासंदर्भात आपण माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहाच्यावतीने विनंती करु की, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जी भूमिका मांडली त्याची तड लावण्याकरिता, त्या ठिकाणी रिलायन्स कंपनीने गोरगरीब शेतकऱ्यांची दिशाभूल करुन अशा जमिनी लुबाडलेल्या आहेत, त्याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सोयीने ताबडतोब हे अधिवेशन संपण्यापूर्वी सर्व संबंधितांची एक बैठक बोलवावी आणि त्या ठिकाणी याचा सर्व ऊहापोह व्हावा.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला तो या लक्षवेधी सूचनेला लागू आहे काय ?

उपसभापती : होय.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून वीज निर्मिती करण्याची कार्यवाही न होणे

मु. शी : राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून वीज निर्मिती करण्याची कार्यवाही न होणे यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, भास्कर जाधव, सदाशिवराव पोळ, जगन्नाथ शेवाळे, वसंतराव चव्हाण, सर्वश्रीमती फौजीया खान व मंदा म्हात्रे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे संबंधित अपारंपरिक ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून वीज निर्मिती करण्यास प्रशासनाकडून कार्यवाही केली जात नसणे, याद्वारे वीज निर्मिती करण्यासाठी जीओ डायनामिक्स व इतर खाजगी कंपन्यांनी अलिकडेच शासनाकडे सादर केलेले प्रस्ताव, या प्रस्तावांवर वेळीच निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांमध्ये सुमारे 15 हजार मेगावॅट वीज अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमधून केली जात असताना व राज्यात सद्यस्थितीत असलेला सुमारे 5 हजार मेगावॅट विजेचा तुटवडा, याचा विचार करता सदर प्रकरणी कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, खाजगी कंपन्यांनी सादर केलेल्या प्रस्तावांवर त्वरीत सकारात्मक निर्णय घेऊन वीज निर्मिती होण्यासाठी कार्यवाही करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कारे (अपारंपरिक ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेद्वारे राज्यातील धगधगणारा विजेचा प्रश्न सुटला जावा अशी इच्छा आहे. आता ऊर्जेच्या बाबतीत जिओ-थर्मल टेक्नॉलॉजी पुढे येत आहे. डब्यू.एच.ओ.ने देखील याबाबतीत सहकार्याची भूमिका घेतलेली आहे. जगामध्ये या जिओ-थर्मल एनर्जीचा वापर केला जात आहे. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये 8 ते 10 मेगावॅट वीज निर्मिती या जिओ-थर्मल टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून केली जात आहे. इंग्लडमध्ये देखील विविध कंपन्या याच टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून वीज निर्मिती करीत आहेत. ज्या शास्त्रज्ञाने ही टेक्नॉलॉजी आणली त्याच शास्त्रज्ञाने महाराष्ट्र शासनाकडे दोन-अडीच वर्षापूर्वी प्रस्ताव दिलेला आहे. महाराष्ट्रामध्ये ऊर्जेची परिस्थिती गंभीर असल्यामुळे नवीन ऊर्जास्त्रोताची निर्मिती करुन ही ऊर्जेची कमतरता दूर करण्याच्या बाबतीत शासन निर्णय घेणार आहे काय ? असल्यास, हा निर्णय किती दिवसात घेण्यात येईल ?

श्री. विनय कोरे : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी अतिशय महत्वाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण महाराष्ट्रामध्ये अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून नवनवीन उपक्रम राबवित आहोत. भूगर्भातील उष्णतेपासून वीज निर्मिती करण्यासाठी आपल्याकडे जागा सापडतील काय ? याचाही विचार मंत्रालय करीत आहे. जिओ-सेंट्रिक कंपनीने अशा प्रकारे फायनान्शियल असेसमेंट करण्याचा प्रस्ताव 21.8.2006 साली विभागाकडे दिला होता. त्यानंतर डिसेंबरमध्ये अशा प्रकारच्या प्रस्तावाच्या संदर्भात तीन कंपन्यांनी एकत्रित मिटींग घेतली. तंत्रज्ञान, फायनान्शियल कमिटमेंट आणि या क्षेत्रातील अनुभव यावर तिन्ही प्रस्तावांची छाननी करुन येत्या एक ते दीड महिन्याच्या आत महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचा उपक्रम विभागामार्फत राबविण्यात येणार आहे.

श्री. भास्कर जाधव : पवन ऊर्जा, ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती इत्यादी स्त्रोत्रामार्फत वीज निर्मिती करण्यात येत असल्याचे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. लघुजल विद्युत प्रकल्पाबाबत बोलायचे झाले तर कोकणामध्ये 4 महिने 4 हजार मिली लिटर पाऊस पडतो. डोंगरावरुन पाण्याचे धबधबे कोसळत असतात. नागालँड आणि आसाममध्ये धबधब्यांचा उपयोग करुन वीज निर्मिती केलेली आहे. तेव्हा कोकणामध्ये 4 महिने अशाप्रकारे वीज निर्मिती करुन राज्याला भेडसावणारा विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी ठोस कार्यक्रम शासन राबविणार आहे काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : लघुजल विद्युत प्रकल्पाच्या बाबतीत या विभागाने बरीचशी कामे केलेली आहेत. आतापर्यन्त ही कामे महाराष्ट्रामध्ये पाटबंधारे विभागामार्फत केली जायची. तीन ते चार महिने जनरेशन असणारे प्रकल्प हे फिझिबल होत नाहीत.

...नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4..... श्री.विनय कोरे .....

सभापती महोदय, पूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर सी.डी.एम.बेनिफिट नावाचा नवीन उपक्रम सुरु झाल्यामुळे यापुढच्या काळात ज्या कोकणात तीन महिन्यापेक्षा जास्त सतत पाणी वाहते तेथे अशा प्रकारचे छोटे प्रकल्प यशस्वी करणे शक्य होईल. त्याकरीता जी जादा आर्थिक गुंतवणूक होते त्यासाठी मदत म्हणून महाराष्ट्र सरकारच्या वतीने सुध्दा काही अनुदान देण्याची नवी योजना, नवे धोरण आणण्याचा विचार हे मंत्रालय करीत आहे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, या राज्यामध्ये आज जवळजवळ 5.5 हजार मे.वॅट विजेची कमतरता आहे. अपारंपरिक ऊर्जा क्षेत्र हे महत्वाचे आहे. हे खाते आज केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये सुध्दा कार्यरत आहे. शासन आज जे प्रयत्न करीत आहे त्या प्रयत्नातून आजमितीपर्यंत अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून किती वीजनिर्मिती करण्यात आली आहे?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, आतापर्यंत अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात जे काम झाले ते पवन ऊर्जेच्या क्षेत्रात झाले आहे. मागील तीन वर्षात जवळजवळ 750 मे.वॅट पवन ऊर्जेची क्षमता महाराष्ट्रात स्थापित झाली आहे. ऊसाच्या चिपाडापासून आणि इतर मार्गाने अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यासाठी पहिल्यांदाच जवळजवळ 411 कोटी रुपयांचा व्हेंचर कॅपिटल फंड महाराष्ट्र सरकारने ऊर्जांकूर या नावाने निर्माण केला आहे आणि पुढील दोन वर्षात या फंडातून जवळजवळ 1 हजार मे.वॅटचे प्रकल्प महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रात यामार्फत कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, महाराष्ट्रात अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे महत्व आज लोकांना पटले आहे आणि ते महत्वपूर्ण आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीला प्राधान्य दिल्याचे मंत्रीमहोदयांनी सांगितले. या क्षेत्रात मोठी गुंतवणूक करुन 750 मे.वॅट ऊर्जा निर्मिती केली आहे. या संदर्भात मध्यंतरी सर्वेक्षण करण्यात आले त्या सर्वेक्षणाच्या आधारे अशी माहिती पुढे आली की, सौर ऊर्जेचा वापर जर आपण मोठया प्रमाणात केला तर त्यातून सुध्दा विजेच्या कमतरतेचा प्रश्न सुटायला मदत होईल. परंतु अपारंपरिक ऊर्जेचे प्रकल्प फिजिबल होत नाहीत. त्यासाठी खर्च मोठया प्रमाणात येतो, तो सर्वसामान्य कंपन्यांना न परवडणारा आहे. त्याकरीता यापूर्वी शासनाची अनुदान देण्याची योजना होती. ते अनुदान शासनाने आता कमी केले आहे. ते अनुदान वाढविले तर हा प्रश्न सुटायला मदत होईल. सर्व प्रकारचे जे अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत आहेत ते उपयोगात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणण्याकरीता शासन अनुदान वाढवून देईल का? ऊसाच्या चिपाडापासून ऊर्जा निर्मिती करणे हा प्रयोग साखर कारखान्यांना परवडत नाही. त्यामुळे कोणत्याही साखर कारखान्याकडून ऊर्जा निर्मिती प्रकल्प हाती घेतला जात नाही. या सर्व गोष्टींचा राज्याच्या पातळीवर विचार केला जाणे गरजेचे आहे. जेणेकरुन फिजिबिलिटी येण्याच्या दृष्टीने शासनाचे अनुदान मिळेल आणि ऊर्जेचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. असे अनुदान देण्याचा शासनाचा विचार आहे का?

श्री.विनय कोरे : सोलर एनर्जीच्या संदर्भात जी चर्चा झाली त्याचा खर्च 22 ते 24 कोटी रुपये प्रती मे.वॅट इतका येत असल्यामुळे आजही तो उपयोगात आणला जाणारा, व्हायबल होणारा प्रकल्प मानला जात नाही. ज्या ठिकाणी ऊर्जा पोहोचत नाही अशा ठिकाणी सौर ऊर्जेचा वापर करण्याची योजना आखली आहे. महाराष्ट्रातील ज्या वाड्या आणि पाड्यांवर वीज पोहोचू शकत नव्हती तेथे केंद्र सरकारच्या मंत्रालयामार्फत आणि राज्य शासनामार्फत ही सौर ऊर्जा पोहोचविण्याचे काम करीत आहोत. खरे तर या क्षेत्रात सोलर लॅन्टर्न आणि पथ दिवे यासाठी अनुदानाची योजना होती. आजही ती सुरु आहे. ऊर्जा निर्मितीसाठी आणखी वेगवेगळे उपक्रम आहेत. लघु जलविद्युत निर्मितीसाठी केंद्राचे 1.5 कोटी रुपयांचे अनुदान आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. विनय कोरे.....

यासाठी महाराष्ट्र शासन नवे अनुदान देण्याचा विचार करीत आहे. जर कोणी उद्योजक ऊर्जा निर्मीतीसाठी पुढे आला तर इरडाच्या माध्यमातून यासाठी 2 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्याच्या काही सूचना असतील तर माझा विभाग त्यावर विचार करण्यास तयार आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याला विजेचे संकट भेडसावित असतांना साखर कारखान्यांनी जर ऊसाच्या चिपाडापासून वीज निर्माण केली तर शासनाकडून अशा कारखान्याला अनुदान दिले जाते, विशेष पॅकेज दिले जाते. प्रत्येक साखर कारखान्याने चिपाडापासून वीज निर्माण करण्याच्या संदर्भात भविष्यात शासनाची काय भूमिका आहे?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, ऊर्जांकुर माध्यमातून महाराष्ट्रात हजारो मे.वॅ. वीज निर्मितीची योजना केलेली आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात 16 साखर कारखांन्यानी वीज निर्मिती करण्याची तयारी दर्शवलेली आहे. या योजनेअंतर्गत सर्व खर्च "ऊर्जा अंकूर" या निधीच्या माध्यमातून केला जाणार आहे. अशा पध्दतीने जे साखर कारखाने ऊसाच्या चिपाडापासून वीज निर्माण करतील त्यांना पहिल्या वर्षी प्रती टन 100 रुपये रॉयल्टी दिली जाईल.15 वर्षानंतर संपूर्ण प्रकल्प कारखान्याला हस्तांतरीत केला जाईल अशा प्रकारची अभिनव योजना संपूर्ण देशात पहिल्यांदाच महाराष्ट्रात घेतलेली आहे. अशा प्रकारे ऊसाच्या चिपाडा पासून वीज निर्मीतीमुळे ग्रामीण भागात वीज निर्मितीचा एक अभिनव कार्यक्रम महाराष्ट्र शासन सुरु करीत आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, विजेच्या संदर्भात तपशीलवार माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेली आहे तसेच याबाबत विस्तृत निवेदनही दिलेले आहे. परंतु निवेदनातील पृ.क्र.4 वर म्हटले आहे की, "मे.जीओ सिंडिकेट एनर्जी प्रा. लि. मुंबई, यांनी सर्वेक्षणाकरिता लागणारा संपूर्ण खर्च स्वत: करण्याची तयारी दर्शविली असून भूगर्भातील उष्णतेपासून वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करण्यासाठी 3 ठिकाणांची संपूर्ण हक्काची मागणी केलेली आहे आहे. त्यामुळे सदर कंपनीने 3 ठिकाणी वीज निर्मितीच्या संपूर्ण हक्काची मागणी केली आहे ती ठिक्राणे कोणती आहेत? तसेच अशाच प्रकारचे काम हिंदुस्थानातील इतर कोणत्या राज्यात सुरु आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, महाराष्ट्र सोडून हिंदूस्थानामध्ये अशा प्रकारच्या कामाला सुरुवात झालेली नाही. सर्वेक्षणाच्या कामामध्ये सुरुवातीला ड्रिलींग करावे लागते. यासाठी जम्मू-काश्मिर येथील लेह या ठिकाणी हे काम सुरु आहे. महाराष्ट्र राज्यात मे. जीओ सिंडिकेट एनर्जी प्रा. लि. यांनी जळगाव जिल्हयातील कृष्णा नदीच्या परिसरात वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करण्याची मागणी केलेली आहे. यासंदर्भातील बाकीची नावे माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही. जळगाव जिल्हयातील "चोपडा" तालुक्याचा सुध्दा यामध्ये काही भाग येतो. या प्रकल्पामुळे 2000 मे.वॅ. वीज निर्माण करता येऊ शकते असे या कंपनीने मत व्यक्त केलेले आहे. प्रत्यक्षात या ठिकाणी ड्रिलींग झाल्यानंतर सगळी आकडेवारी समोर येऊ शकेल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हे प्रकल्प कोणकोणत्या ठिकाणी राबवले जाणार आहेत?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, वेट आणि ड्राय टेक्नॉलॉजी असे दोन प्रकार यामध्ये आहेत. जळगाव जिल्हयामध्ये ड्राय रॉक असल्यामुळे ड्राय टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून वीज स्त्रोत निर्माण केले जाणार आहे. वेट टेक्नॉलॉजीचा उपयोग कोकणामध्ये केला जाणार आहे प्रत्येक ठिकाणी ड्रीलिंग करुन याची शक्यता तपासली जाणार आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, देवगड तालुक्यात शासनाने 8 ते 10 कोटी रुपये खर्च करुन पवन उर्जेचे प्रकल्प सुरु केलेले आहेत. परंतु ही पवन ऊर्जेची यंत्रे बंद पडलेली आहेत त्यामुळे ही पवन यंत्रे सुरु करुन त्या द्वारे वीज निर्मिती सुरु करण्याच्या संदर्भात शासनाकडे काही उपाययोजना आहे काय?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सुरुवातीच्या काळात विंड सोलर हे वीज निर्मितीचे नवीन क्षेत्र म्हणून महाराष्ट्रासमोर यावे यासाठी एमएसईबीने गुंतवणूक केली होती. आता हे क्षेत्र फार मोठ्या प्रमाणावर विकसित झालेले आहे. तरी सुध्दा देवगड येथील बंद पडलेली यंत्रे सुरु करण्यासाठी अपांरपारिक ऊर्जा आणि ऊर्जा विभाग यांच्यात समन्वय साधून ठोस निर्णय घेण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, कोकणामध्ये पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्याठिकाणी डोंगरावरुन धबधब्यासारखे पाणी पडते आणि वाहून जाते. त्या पाण्याचा उपयोग वीज निर्मितीसाठी करुन घेण्यात येणार आहे काय ? कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरु श्री.कद्रेकर आणि श्री.इंदूलकर यांनी कोकणातील चिपळूण तालुक्यातील कोळकेवाडी येथे अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून वीज निर्मिती करण्याचा यशस्वी प्रयोग केला. त्यांच्याकडून शासन माहिती घेणार आहे काय ? दुसरे म्हणजे विंड सोलरसाठी चॅरिटेबल ट्रस्टला 70 टक्के अनुदान आणि 2 टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. खाजगी व्यावसायिकांना 30 टक्के अनुदान आणि 2 टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. परंतु जे व्यक्तिगत विंड सोलर उभारु इच्छितात त्यांना 2 टक्के कर्ज उपलब्ध होते, परंतु त्यांना अनुदान देण्यात येत नाही. तेव्हा या संदर्भात शासन विचार करणार आहे काय ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे श्री.कर्देकर आणि श्री.इंदूलकर यांच्यासोबत बैठक आयोजित करुन कोकणामध्ये लघुजल विद्युत क्षेत्रामध्ये आणखी काय करता येईल याबाबत निश्चित चर्चा करण्यात येईल. तसेच भरती-ओहोटीच्या वेळी वीज निर्मिती करता येईल काय याबाबत देखील विचार करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, विंड सोलर प्रकल्प ही फार खर्चिक बाब आहे. जे टॅक्सपेअर आहेत त्यांना आपण पहिल्या वर्षासाठी 80 टक्के डेप्रिसिएशन क्लेम करण्याची परवानगी देतो. ही श्रीमंताना परवडणारी वीज असल्यामुळे त्यांच्यासाठी ही योजना करावी असे मंत्रालयाला वाटत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, देवगड तालुक्याचा विषय निघाला म्हणून सांगू इच्छितो की, देवगड येथे नॉर्वेकडून विंड मिल्स बांधण्यात आल्या. परंतु आता तेथील विंड मिल्स बंद झालेल्या आहेत. तेथील जागेचा वापर अनैतिक कामासाठी होत आहे. तेथील विंड मिल्स बंद तरी कराव्यात किंवा पुन्हा सुरु तरी कराव्यात. तेव्हा याबाबतीत ऊर्जा विभागाशी समन्वय साधून या संदर्भात ताबडतोब निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, विंड मिल्स या एमएसईबीच्या आहेत. त्या पुन्हा सुरु करण्याबाबत ऊर्जा विभाग आणि आमच्या विभागामध्ये समन्वय साधून ठोस निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, याठिकाणी जम्मू आणि काश्मिरमधील लेह-लडाखचा उल्लेख झाला. त्याठिकाणचा प्रोजेक्ट कोण राबवीत आहे याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांना असेलच. क्युबा येथे अशाप्रकारचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. आपण त्यांची टेक्नॉलॉजी वापरीत आहोत. तेव्हा क्युबामधील तज्ज्ञांना आंमत्रित करणार काय ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, जम्मू काश्मिर सरकारच्या वतीने लेहलडाखमध्ये हे काम आयआयटी, पवईने स्वीकारलेले आहे. आपल्याकडे जो प्रस्ताव आलेला आहे तो आयआयटीतील प्राध्यापकाने परवानगी घेऊन व जी.ओ. सिंडीकेट कंपनी स्थापून तिच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकारकडे पाठवला आहे. त्यांच्या कंपनीचा असलेला अनुभव व फायनान्सची कॅपॅसिटी आणि टायपचा विचार करुन एक महिन्यांच्या आत महाराष्ट्र सरकार याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मला हेच निदर्शनास आणावयाचे आहे. काश्मिरमध्ये फंड देण्याचा केंद्र सरकारला घटनेचे कलम 370 अंतर्गत अधिकार आहे. आयआयटी ही केंद्र सरकारची एक बॉडी असून त्याचे एचओडी श्री.चंद्रशेखर आहेत. त्यांना हे काम दिले होते व त्यांची टीम त्याठिकाणी जाऊन त्यांनी याबाबतीतील सर्व्हे करुन डेव्हलपमेंट केलेली आहे. जी.ओ. सिंडीकेट कंपनीकडून आपल्याकडे प्रस्ताव आलेला आहे. लॉजिकली प्रुव्ह होते की, चंद्रशेखर यांचा टेक्निकल अनुभव लक्षात घेता, त्यांना हे काम देण्यास काहीच हरकत नसावी. या कामास उशीर लागता कामा नये. कारण, अगोदरच या कामास उशीर झाला असून आणखी उशीर झाला तर परत ड्रिलिंग करणे अवघड होणार असून त्यासाठी आणखी 90 दिवस लागतील. त्यामुळे आपण हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. आपण हे काम किती दिवसांत पूर्ण करणार ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, एकंदरित कंपनीचा पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊनच आपण हे काम देणार आहोत. निर्णय घेताना सर्व गोष्टी तपासूनच निर्णय घेणे आवश्यक असते. शेवटी, आपण पब्लीक मनीचा निर्णय करीत आहोत. त्यामुळेच याबाबतीतील निर्णय योग्य होणे आवश्यक आहे व तो कायम महाराष्ट्र सरकारच्या उपयोगाला येणारा असला पाहिजे, अशी आमच्या विभागाची इच्छा आहे. त्यामुळे याबाबतीतील निर्णय एक महिन्यांच्या आत अपारंपारिक ऊर्जा मंत्रालय घेईल, हे मी याठिकाणी सांगू इच्छितो.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 6 बाबत.</u>

उपसभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 6 नंतर घेण्यात येईल.

....3..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर येथील वेकोलि कंपनीच्या खुल्या कोळशाच्या खाणीत लागलेली भीषण आग

मु. शी. : चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर येथील वेकोलि कंपनीच्या खुल्या कोळशाच्या खाणीत लागलेली भीषण आग यासंबंधी सर्वश्री डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री दीपक सावंत, अरविंद सावंत,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" "चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथील वेकोलि कंपनीच्या खुल्या कोळशाच्या खाणीत गोडावून मध्ये 10 दिवसापासून धुमसत असलेल्या आगीचा दिनांक 26 फेब्रुवारी, 2007 रोजी वा त्या सुमारास भडका उडून लागलेल्या भीषण आगीत सदर कंपनीचे कोट्यावधीचे नुकसान झाल्याची उघडकीस आलेली घटना, सदर आग तातडीने विझविण्यास अग्निशमन दलाला आलेले अपयश, सदर आग कंपनीच्या 15 व्या गेटपर्यंत पोहचून पूर्ण बल्लारपूर शहर उध्वस्त होण्याचा निर्माण झालेला धोका, तसेच सदर आगीच्या धुरामुळे तेथील वातावरण दूषित होऊन लोकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यास कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दाखविलेला निष्काळजीपणा, परिणामी सदर अधिकाऱ्यांच्या कर्तव्याबद्दल व्यक्त करण्यात येत असलेला संशय, याप्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.धर्मरावबाबा अत्राम (परिवहन, सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) (..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, खुल्या कोळशाच्या खाणीत गोडावूनमध्ये लागलेली आग 10 दिवस धुमसत होती. परंतु याची जबाबदारी महाराष्ट्र सरकार घेण्यास तयार नाही. उत्तरामध्ये सरकारने स्पष्ट म्हटले आहे की, "खाण सुरक्षा ही केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब असल्याने विषयांकित घटनेसंदर्भात केंद्र शासनाच्या खाण सुरक्षा महानिदेशालयाद्वारे निरीक्षण करण्यात आले असून त्यांचा अहवाल अद्याप आहे." माझा असा प्रश्न आहे की, अशाप्रकारची आग पुन्हा लागू नये व त्यामध्ये जीवित होनी होऊ नये याबाबतीत आपण केंद्र शासनाला कोणत्या सूचना देणार आहात ? व याबाबतीत केंद्र शासनाकडून जो अहवाल येणार आहे तो किती दिवसांपर्यंत येईल अशी आपली धारणा आहे ?

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, 26 तारखेला ही लाग लागली व 3 तारखेला ती विझवण्यात आली. आग कोणत्या कारणांमुळे लागली, याबाबतीत आम्ही केंद्र सरकारच्या सुरक्षा महानिदेशकांना सूचना ताबडतोबीने दिल्या होत्या. त्याची माहिती 3-4 दिवसांमध्ये आम्हाला प्राप्त होईल. त्याठिकाणी ओपन गार्ड असल्यामुळे आग माती टाकून विझवण्यात आली. तसेच, असे प्रकार पुन्हा घडू नयेत अशा सूचना केंद्र सरकारच्या वेस्टर्न डी.ए.ना देण्यात आल्या आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही कोळसा खाण महाराष्ट्र राज्यामध्ये असून आग महाराष्ट्र राज्यामध्येच लागलेली आहे. याची जबाबदारी जरी केंद्र सरकारची असली तरी याठिकाणी स्थानिक महाराष्ट्र सरकार नावाची यंत्रणा उभी आहे. आग लागल्यानंतर केंद्र सरकारचे लोक याठिकाणी येतील व ते आग विझवतील, अशी माहिती आपण उत्तरात देणे योग्य नाही, असे मला वाटते.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / परिपक्वतेसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

ज्या ठिकाणी अशा प्रकारचे कारखाने आहेत, खाणी आहेत त्या ठिकाणी आग लागण्याची शक्यता असते, हे विचारात घेऊन स्थानिक यंत्रणा सतर्क ठेवणे आवश्यक आहे. अशा ठिकाणी वित्त व जीवित हानी होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची काळजी घेणे ही महाराष्ट्र शासनाची जबाबदारी नाही काय ? जबाबदारी असेल तर केंद्र शासनाकडून जे काय वसूल करावयाचे असेल ते नंतर करा पण आज होणारे नुकसान टाळण्याची जबाबदारी ही राज्य शासनाची आहे. कारण, हा कारखाना महाराष्ट्रामध्ये आहे. त्यामुळे त्याची जबाबदारी आपली नाही काय ? असे जर असेल तर मग माननीय मंत्री असे उत्तर कसे देऊ शकतात ? हा माझा प्रश्न आहे.

श्री.धर्मराव बाबा आत्राम : सभापती महोदय, या खाणीमध्ये लागलेली आग विझवण्याचे काम वेस्टर्न कोल्ड फिल्ड या संस्थेने सात दिवस केले आहे. तसेच, या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नसल्याचे त्यांनी कळविले आहे. तथापि, आवश्यक ती सर्व काळजी घ्यावी, अशा प्रकारच्या सूचना राज्य शासनाकडून त्यांना देण्यात आल्या आहेत.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी.: ठाणे जिल्हयातील वसई शहराच्या व परिसराच्या नियोजनबद्ध विकासासाठी नेमण्यात आलेल्या सिडको या संस्थेचे होत असलेले दुर्लक्ष

मु.शी.: ठाणे जिल्हयातील वसई शहराच्या व परिसराच्या नियोजनबद्ध विकासासाठी नेमण्यात आलेल्या सिडको या संस्थेचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत माननीय सदस्य श्री.संजय केळकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, प्रचंड नागरीकरण होत असलेल्या वसई, जिल्हा ठाणे शहराचा व परिसराचा नियोजनबध्द विकास करण्यासाठी शासनाने 16 वर्षापूर्वी शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) ही एजन्सी नेमली. सिडकोने मात्र या शहराकडे संपूर्ण दुर्लक्ष करणे व कोणतेही विकासात्मक कार्य न करणे, परिसरातील चंदनसार-विरारफाटा हा रस्ता कोटयावधी रुपये खर्च करुनही अद्याप नादुरुस्त अवस्थेत असणे, तसेच, नालासोपारा रस्ता सिडकोने तयार करणे, यावर खुद्द एस.टी.महामंडळाचाही विश्वास न बसणे, मात्र सिडकोच्या आशीर्वादाने परिसरात अनधिकृत बांधकामे अतिशय वेगाने होणे, या अनधिकृत बांधकामामुळे सांडपाणी निचरा व्यवस्था पूर्णत: कोलमडणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य बिघडले असून रोगराई पसरण्याची साधार भिती निर्माण होणे, परिणामी सिडकोचे अधिकारी मस्त, नागरिक त्रस्त झालेले आहेत, असे चित्र सर्रास दिसणे, या गंभीर परिस्थितीला आळा घालण्याची आवश्यकता, तसेच वसई परिसराचा विकास होण्याची आवश्यकता. सदर विषय अत्यंत गंभीर व सार्वजनिक हिताचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: त्रिस्तरीय योजनेंतर्गत काम करणा-या हातपंप व विद्युत पंप दुरुस्ती करणा-या कर्मचा-यांना नियमित लेखाशीर्षातून कायमस्वरुपी अनुदान मिळणेबाबत

मु.शी : त्रिस्तरीय योजनेंतर्गत काम करणा-या हातपंप व विद्युत पंप दुरुस्ती करणा-या कर्मचा-यांना नियमित लेखाशीर्षातून कायमस्वरुपी अनुदान मिळणे याबाबत माननीय सदस्या ॲड.उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, महाराष्ट्रात एकूण 1,22,951 हातपंप, 12,923 विद्युत पंप आहेत. पंप दुरुस्तीसाठी लागणारे कर्मचारी जिल्हा परिषदेने नेमून दिलेल्या त्यांच्या वेतन व भत्त्याचा खर्च, पंप दुरुस्तीचे सुटे भाग यावरील खर्च जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातून भागवावा, असे निर्देश आहेत.

शासनाने सदर योजनेसाठी नियमित लेषाशीर्षातून कायमस्वरुपी अनुदान उपलब्ध करुन न दिल्यास जिल्हा परिषदेस ही योजना बंद करावी लागेल.

हातपंप व विद्युत पंप दुरुस्तीपोटी होणा-या वार्षिक वर्गणीची वसुलीची ग्रामपंचायतीकडे कोटयावधी रुपयांची थकबाकी आहे व त्याची पंचायत राज समितीने गंभीर दखल घेतली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा दुरुस्ती व देखभाल निधीची अत्यंत वाईट स्थिती निर्माण झाली आहे.

राज्यात एकूण 82 कनिष्ठ अभियंता, 378 हातपंप यांत्रिकी, 101 विजतंत्री, 356 मदतनीस, 31 वाहनचालक इत्यादि कर्मचारी आहेत. त्यांच्या वेतन भत्त्यापोटी 11 कोटी रुपये लागतात. वेतन व भत्ता वर्गणीतून खर्च केला जाऊ शकत नाही. कारण त्यातूनच ग्रामीण विकास निधीच्या कर्जाची देयके,दूरदर्शन संच इत्यादि रकमा वळत्या करुन घेण्यात येतात.

करीता त्रिस्तरीय योजनेअंतर्गत काम करणा-या हातपंप, विद्युत पंप दुरुस्ती योजनांसाठी त्यामध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या वेतनासाठी राज्यशासनाने नियमित लेखाशीर्षातून कायमस्वरुपी अनुदान जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

सभापती महोदय, हाच विशेष उल्लेख मी हिवाळी अधिवेशनातही उपस्थित केला होता, परंतु आजपर्यन्त परिस्थितीत विशेष फरक पडलेला नाही. ही त्रिस्तरीय योजना आहे. हातपंप दुरुस्ती कामगारांना शासन पगार देत नाही. परंतु, याबाबतीत भूवैज्ञानिक व सुरुंग पथकातील कर्मचा-यांचा विचार शासनाने केला आहे. हातपंप दुरुस्तीचा ग्रामीण भागाशी थेट संबंध असला तरी हातपंप दुरुस्ती कामगारांच्या पगाराचा प्रश्न मात्र अद्याप सुटत नाही. पाणीपट्टी वसूली होत नाही, जिल्हा परिषदा आर्थिकदृष्टया कमकुवत आहेत. त्यामुळे विकास निधीतून या कर्मचा-यांचा पगार करावा लागतो. या सर्व परिस्थितीमुळे या कर्मचा-यांना 3/4 महिने पगार मिळत नाही. यासंदर्भात शासनाला ठाम भूमिका घ्यावी लागणार आहे. राज्य शासनाने नियमित लेखाशीर्षातून कायम स्वरुपी आर्थिक तरतूद जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देणेबाबत ठोस आश्वासन द्यावे व त्याबाबत कृती करावी, अशी माझी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी.: नाशिक येथील अमल किल्ल्यावर सापडलेले अल्पवयीन बालकांचे सांगाडे सापडणे.

मु.शी.: नाशिक येथील अमल किल्ल्यावर सापडलेले अल्पवयीन बालकांचे सांगाडे याबाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"नाशिक येथील अमल किल्ल्यावर अल्पवयीन बालकांचे सांगाडे सापडण्याची घटना दि.19.3.2007 रोजीच्या सुमारास घडणे,तसेच काही प्राण्याची हाडेही सापडणे,देशभरात गाजत असलेल्या निठारी प्रकरणांशी साधर्म्य असलेला हा प्रकार असल्याने नाशिक नव्हे तर महाराष्ट्रात उडालेली घबराट त्यामुळे जनतेत पसरलेले चिंतेचे वातावरण ."

निठारीसारखे संघटित गुन्हयाचे कांड आपल्या महाराष्ट्रातही घडावे हे आपले खरोखरच मोठे दुर्दैव आहे. नाशिक जिल्हयामध्ये अमल किल्ल्यावर बालकांच्या व प्राण्यांच्या हाडांचे सांगाडे सापडले आहेत. वाडीवरा गावानजीक असलेल्या अमल किल्ल्यावर 60 फूट खोलीचे भुयार असून तेथे गेलेल्या गिर्यारोहकांना गोणीत भरुन अल्पवयीन बालकांची हाडे व प्राण्यांचे सांगाडे दिसले होते. माझी या संदर्भात मंत्री महोदयांना विनंती आहे की, ज्यांची बालके बेपत्ता झालेली आहेत, त्यांचा लवकरात लवकर शोध घेण्यात यावा, सभागृहाला निवेदनाद्वारे या कृत्यामागे नेमका कुणाचा हात आहे व त्याचे स्वरुप काय आहे याची माहिती लवकरात लवकर देण्यात यावी.

TT - 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वसईत सत्र दिवाणी न्यायालयांच्या स्थापनेसाठी वसईच्या वकिलांनी केलेले आंदोलन

मु.शी.:. वसईत सत्र दिवाणी न्यायालयांच्या स्थापनेसाठी वसईच्या वकिलांनी केलेले आंदोलन याबाबत श्री.कपिल पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" वसईत सत्र दिवाणी न्यायालयांच्या स्थापनेसाठी वसईच्या वकिलांनी दिनांक 1 फेब्रुवारी,2007 पासून आंदोलने केली होती. परिणामी न्यायालयासाठी दोन मजली इमारत बांधण्यात आली आहे. तेथे जिल्हा सरन्यायाधीशांचे न्यायालय आणि वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीशांचे न्यायालय चालू करण्यात सरकारला अपयश आले आहे. दोन्ही न्यायालयांची स्थापना करण्यासाठी अर्थसंकल्पात रुपये 50 लाखांच्या निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच दोन न्यायाधीशांची पद निर्मिती आणि जवळपास 40 कर्मचारी वर्ग यांच्या नेमणूकीस मंजुरी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने मंजुरी दिली आहे. मात्र मंत्रिमंडळाची मंजुरी न मिळाल्याने पुढील कामकाज ठप्प झाले आहे. कोर्टाचे कामकाज न्यायालय स्थापन करुन आवश्यक न्यायाधीश आणि कर्मचारी यांची तातडीने नियुक्ती करुन जनतेची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कारवाई होणे गरजेचे आहे. या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. "

महोदय, सत्र न्यायाधीशांच्या नियुक्तीकरिता वसईचे वकील गेले काही महिने आंदोलने करीत आहेत. आज इमारत बांधून झाली आहे परंतु त्यामध्ये न्यायालय चालविण्याकरिता न्यायाधीश व उच्चस्तर दिवाणी न्यायाधीश तसेच इतर आवश्यक कर्मचा-यांची नियुक्ती करणे अत्यावश्यक आहे. सदर पदांच्या भरतीला मंत्रिमंडळाची अद्यापही मंजुरी मिळालेली नाही. मी या विशेष उल्लेखाद्वारे या सभागृहात राज्यमंत्री यांना विनंती करीन की त्यांनी सदर पदांच्या भरतीकरिता विशेष निधी उपलब्ध करुन द्यावा म्हणजे जनतेची होत असलेली गैरसोय संपुष्टात येईल.

TT - 4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे महापालिकेद्वारे ठाणे रेल्वे स्टेशनजवळ उभारण्यात येणारा सॅटीक - डेक प्रकल्प

मु.शी.: ठाणे महापालिकेद्वारे ठाणे रेल्वे स्टेशनजवळ उभारण्यात येणारा सॅटीक - डेक प्रकल्प याबाबत श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" ठाणे महापालिकेद्वारे ठाणे रेल्वे स्टेशनजवळ सॅटीक - डेक उभारण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे रेल्वे प्रशासन व महापलिका यांच्यामध्ये रेल्वेचा प्रत्यक्ष कोणताच सहभाग नसल्याने गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या प्रकल्पाच्या रेल्वेच्या अनेक जाचक अटी स्वीकारुन सॅटिक डेकच्या बांधकामाबरोबर अधिक 12 हजार फुटांचे बांधकाम महापालिका करुन देणार आहे. या डेकचा सर्व खर्च पालिका करणार आहे. त्यामध्ये रेल्वेचा सहभाग नाही. मात्र सॅटिक डेक ची संपूर्ण मालकी रेल्वेकडे राहणार असल्याने ठाणेकरांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मुंबईतील सॅटीक - डेक प्रकल्पामध्ये रेल्वेने निम्मा खर्च उचलण्याची जबाबदारी मान्य केल्यानंतर काम सुरु झाले आहे. त्याच धर्तीवर म्हणजे मुंबईप्रमाणेच ठाण्याच्या प्रकल्पात देखील खर्चाचे निकष लावण्यात यावेत. सॅटिक डेकमध्ये समान खर्च आणि समान मालकी असावी अशी मागणी जनतेकडून होत आहे. या सार्वजनिक व अत्यंत महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

महोदय, सदर प्रश्नाच्या संदर्भात आपण स्वत:ही पुढाकार घेतलेला आहे. ठाणे महापालिकेद्वारे ठाणे रेल्वे स्टेशनजवळ सॅटीक - डेक उभारण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे रेल्वे प्रशासन व महापलिका यांच्यामध्ये रेल्वेचा प्रत्यक्ष कोणताच सहभाग नसल्याने गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. या प्रकल्पाबाबत रेल्वेच्या अनेक जाचक अटी स्वीकारुन सॅटिक सॅटिक डेकच्या बांधकामाबरोबर अधिक 12 हजार फुटांचे बांधकाम महापालिका करुन देणार आहे. या डेकचा सर्व खर्च पालिका करणार आहे. त्यामध्ये रेल्वेचा सहभाग नाही. मात्र डेक ची संपूर्ण मालकी रेल्वेकडे राहणार असल्याने ठाणेकरांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

TT - 4...

श्री.संजय दत्त.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील सॅटीक - डेक प्रकल्पामध्ये रेल्वेने निम्मा खर्च उचलण्याची जबाबदारी मान्य केल्यानंतर काम सुरु झाले आहे. त्याच धर्तीवर मुंबईप्रमाणेच ठाण्याच्या प्रकल्पात देखील खर्चाचे निकष लावण्यात यावेत. डेकमध्ये समान खर्च आणि समान मालकी असावी अशी मागणी जनतेकडून होत आहे. या सार्वजनिक व अत्यंत महत्वाच्या विषयावर मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे व मुंबई महापालिकेच्या हद्दीतील रिक्षा एकमेकांच्या हद्दीमध्ये आणण्यास घालण्यात आलेली बंदी

मु.शी.: ठाणे व मुंबई महापालिकेच्या हद्दीतील रिक्षा एकमेकांच्या हद्दीमध्ये आणण्यास घालण्यात आलेली बंदी याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : जनतेच्या अतिशय जिव्हाळयाच्या अशा प्रश्नाकडे मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून लक्ष वेधू इच्छितो.

ठाणे आणि मुंबई महापालिकेची हद्दी मुलुंड येथे अगदी एकमेकांच्या जवळ आलेल्या आहेत, त्यामुळे जनतेच्या सेवेसाठी असलेल्या रिक्षांना दोन्ही महापालिकेने एकमेकांच्या हद्दीत आणण्यास बंदी घातली असल्यामुळे पर्यायाने महिला अपंग ,वयोवृध्द, विद्यार्थी यांना आपल्या रोजच्या दिनक्रम निभवतांना होणारा त्रास व मानसिक यातना याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. सदर महापालिकांनी आपापल्या हद्दीत अर्धा किलोमीटरपर्यंत एकमेकांच्या पालिकेतील रिक्षांना येण्यास परवानगी देण्यात यावी, म्हणजे पर्यायाने नागरिकांना होणारा त्रास वाचेल. असे मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.बोरले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :छत्रपती शिवाजी महाराजांच्या हस्ताक्षरातील मोडी लिपीतील नऊ पत्रे पुराभिलेख विभागाकडून गायब झाल्याबाबत.

मु. शी. : छत्रपती शिवाजी महाराजांच्या हस्ताक्षरातील मोडी लिपीतील नऊ पत्रे पुराभिलेख विभागाकडून गायब झाल्याबाबत श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.अरविंद सावंत यां□ एज विशेष उल्लेजाची सूच□ दिली आहे, त्यां□ ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजाची सूच□ मांडतो.

"छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या हस्ताक्षरात लिहिलेली मोडी लिपीतील एकूण 12 मूळपत्रे राज्य शासनाच्या पुराभिलेख विभागाने जतन केली होती. त्यापैकी 9 पत्रे गायब झाल्याचे 1994 साली शासनाच्या लक्षात आल्याने पुराभिलेख विभागातील सहाय्यक संचालक श्री.भास्कर धाटावकर यांना सेवेतून निलंबित करण्यात आले होते. विशेष म्हणजे भ्रष्ट अधिका-यांची पोलिस चौकशी केली जावी, तसेच अशा अधिका-यांना पदोन्नती देऊ नये, अशा आशयाचे शासनाचे पत्रक असतांना ते डावलून सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभागाने श्री.भास्कर धाटावकर यांना देण्यात आलेली बढती, राज्याच्या इतिहासाचा अमूल्य ठेवा असलेल्या पत्रांबाबत केलेल्या हलगर्जीपणामुळे या खात्याच्या कारभाराबाबत निर्माण झालेले संशयाचे वलय, शारजा येथील शेख यांनी एप्रिल, 1985 मध्ये मुंबईतील पुराभिलेख विभागाला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी मिनोल्टा फोटो कॉपी मशीन, युसिडा लॅमीनेशन मशीन व मायक्रोफिल्स युनिट अशी अद्ययावत यंत्रे सदर विभागाला भेट म्हणून दिली होती. त्यांच्या भेटीनंतर पुराभिलेख विभागातील अनेक महत्वाचे दुर्मिळ लेख कोणतीही परवानगी न घेता पुराभिलेख विभागातून बाहेर गेल्याचे उघड झाले. याप्रकरणी सी.आय.डी. चौकशी झाली या विभागातील अधिका-यांनी केलेला भ्रष्टाचार तसेच विषयाचे गांभीर्य लक्षात घेता या सर्व प्रकरणी जबाबदार अधिका-यांची तातडीने चौकशी करुन त्याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाच्या माध्यमातून दुसरा एक मुद्दा शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. शासनाची छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासंदर्भात उदासिनता दिसते. दोन वर्षापूर्वी विधान भवनाच्या परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याचे ठरले होते. परंतु मागील दोन वर्षाच्या पूरक मागण्याच्या माध्यामातून निधीची तरतूद करुन सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा विधान भवनाच्या परिसरामध्ये बसविण्यात आलेला नाही. शासनाने याबाबतचा विचार करावा," अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

..3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुरुड (जि.रायगड) येथील एकदरा खाडीत मच्छिमारांसाठी दीपगृह बसविणेबाबत.

मु. शी. : मुरुड (जि.रायगड) येथील एकदरा खाडीत मच्छिमारांसाठी दीपगृह बसविणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां□□ एज विशेष उल्लेजाची सूच□□ दिली आहे, त्यां□□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजाची सूच□□ मांडतो.

"मुरुड (जि.रायगड) येथील मच्छिमार मोठया प्रमाणात मच्छिमारी करीत असतात. मच्छिमार मुरुड व एकदरा खाडीतून मच्छिमारी करण्यासाठी समुद्रात जात असतात व समुद्रातून मच्छिमारी करुन परत येत असतांना भरतीच्या पाण्यामुळे समुद्रात असलेल्या खडकांमुळे मार्ग दिसत नाही. त्यामुळे खडकावर बोटी आदळून अपघात होण्याची शक्यता असते.

तरी एकदरा (ता.मुरुड) ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात दिशा दाखविणारा लाल रंगाचा दीपगृह लावल्यास मच्छिमारांना दिशा समजण्यास सोईस्कर होईल व होणारे अपघात टाळले जातील.

तरी दीपगृह बसविण्याबाबत शासनाने त्वरीत उचित कार्यवाही करावी, शासनाचे या महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधावे, म्हणून मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मंत्रालयासमोरील वाहतूक बेटात क्रांतिवीर राजगुरु यांचा नामफलक लावण्याबाबत.

मु. शी. : मंत्रालयासमोरील वाहतूक बेटात क्रांतिवीर राजगुरु यांचा नामफलक लावण्याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ एज विशेष उल्लेजाची सूच□ दिली आहे, त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजाची सूच□ मांडतो.

"देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहिद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव या स्वातंत्र्य योध्दांनी हौताम्य पत्करले. या घटनेला आज दिनांक 23 मार्च, 2007 रोजी 75 वर्षे पूर्ण होत आहेत. हुतात्मा राजगुर यांची स्मृती चिरंतन राहण्यासाठी मुंबईत मंत्रालयासमोरील वाहतूक बेटात क्रांतीवीर राजगुरु यांच्या स्मरणार्थ चौक उभारण्यात आला आहे. या बेटाचे सुशोभिकरण करण्यासाठी हुतात्मा राजगुरुचा नामफलक काढण्यात आला होता. मात्र कामपूर्ण झाल्यानंतर सदर नामफलक पुन्हा तेथे बसविण्यात आला नाही. याबाबतीत महापालिकेच्या संबंधित अधिका-यांकडे अनेक तक्रारी करुन सुध्दा हा नामफलक न लावल्यामुळे पालिकेच्या गोदामात फलक गेली 11 वर्षे धूळ खात पडला आहे. आज त्यांच्या पुण्यतीथी दिनी शासनाने याबाबतची त्वरित दखल घेऊन सन्मानपुर्वक हा नामफलक लावण्याची कार्यवाही करावी," यासाठी मी विषय विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर ..)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

सन 2006-07 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

उपसभापती : पूरक मागण्यांवरील चर्चा आज व उद्या दिनांक 24 मार्च 2007 रोजी घ्यावयाची आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्या खालील बाबी या संबंधी माहिती सदस्यांनापत्रक भाग 2 द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाची आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व उद्याकरिता असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा उद्या पूर्ण करावी लागेल.

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उपसभापती : आता खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील. ...

1) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक ए-1, ए-2, ए-4, बी-3, एफ-3, एफ-4, एफ-5, जे-1, जे-2, एन-3, क्यू-1, क्यू-2, क्यू-3, क्यू-4, क्यू-6.
2) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एल-1, एल-2, एल-4, एल-5, एल-9.
3) सहकार, पुनर्वसन मदत कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - व्ही-2, व्ही-3, व्ही-4, व्ही-5, व्ही-6.
4) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - आय-5, वाय-1, वाय-4.
5) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - जी-1, जी-6, जी-7, ओ-7 ओ-12.

..... डब्ल्यूडब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

6) उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक इ के-3, के-10, एन-2.

7) पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य व महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ओ-3, एक्स-2.

8) राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - बी-2, के-4, यू-1, यू-3.

9) ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - के-1, के-7, एस-1, एस-2, डब्ल्यू-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6.

10) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - टी-1, टी-3, टी-4, टी-5 आणि टी-6.

सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.भास्कर जाधव.

..... **डब्ल्यूडब्ल्यू 3** ...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, 2006-07 या वर्षाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेला सुरूवात करताना मी प्रथमत: सामान्य प्रशासन विभागाच्या पूरक मागण्यांवर बोलू इच्छितो. पृष्ठ क्र.4, बाब क्रमांक 1- सन 2006-07 या वर्षाच्या सुधारित अंदाजावरून रूपये 4,03,64,000 इतक्या मंजूर विनियोजनापेक्षा रूपये 1,27,65,000 इतका अधिक खर्च अपेक्षित आहे. हा अधिक खर्च मुख्यत्वेकरून दौराविषयक खर्च, वैद्यकीय खर्च आणि आस्थापनेवरील कार्यालयीन खर्च यात वाढ झाल्याने तसेच नवीन वाहन खरेदीमुळे झाला आहे असे यामध्ये आपण म्हटलेले आहे. सभापती महोदय, या संदर्भात मला एकच म्हणावयाचे आहे की, हा तर नेहमीचाच खर्च आहे. नियमित अंदाजपत्रक तयार केले जाते त्यावेळी हा खर्च गृहीत धरला जात नाही का ? दौरे, वैद्यकीय खर्च हे नेहमीचेच खर्च आहेत. असे असताना एक तृतियांश पेक्षा जास्त खर्च या पूरक मागण्यांमध्ये कशासाठी दाखविला गेला आहे हा माझ्यादृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याबाबत खुलासा केला जावा इतकेच मी म्हणेन.

सभापती महोदय, पृ.35, नगरविकास विभागाची बाब क्र.37 यावर मी आता बोलणार आहे. या पूरक मागणीसंबंधात माहिती देताना यामध्ये आपण असे म्हटलेले आहे की, यात्रा कर रद्द केल्याने नगरपरिषदेला सहायक अनुदान देण्यासाठी ही पूरक मागणी येथे आणलेली आहे. तेव्हा या संबंधात मी आपल्याला एवढेच विचारू इच्छितो की, हा यात्रा कर आपण रद्द केव्हा केला ? त्याचे परिणाम आपल्याला केव्हा दिसून आले ? तसेच हा यात्रा कर रद्द करताना अशा प्रकारे मोठी तूट येण्याची शक्यता लक्षात घेऊन आपल्या नियमित अंदाजपत्रकामध्ये त्यादृष्टीने तरतूद का केली नाही ? पूरक मागण्यांमध्ये त्यासाठी मागणी आपल्याला का करावी लागते आहे ? याबाबत आपण खुलासा केल्यास बरे होईल.

सभापती महोदय, यानंतर वित्त विभागाच्या पृ.39 वरील बाब 40 संबंधात मी बोलू इच्छितो. 2006-07 या वर्षासाठी रोजगार हमी निधीकडे हस्तांतरण या खाली झालेला अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त तरतूद म्हणून जवळपास 1,92,71,94,000 रूपयांची बाब येथे आपण आणली आहे. हा काही एका दिवसाचा हिशोब वा विषय नाही. इजीएसच्या संपूर्ण कामाचे वर्षाचे अंदाज पत्रक केले जाते आणि ते सर्वसाधारणपणे नियमित अंदाजपत्रकात दाखविले जाते असे असताना एवढा मोठा निधी पूरक मागण्यांद्वारा येथे सादर करण्याचे कारण काय ? रोजगार हमी योजनेमध्ये भ्रष्टाचार चालला आहे त्याकडे शासनाचे, वित्त विभागाचे लक्ष आहे की नाही ?

(यानंतर श्री. सरफरे .... एक्सएक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

लक्ष असेल तर इतक्या मोठया प्रमाणामध्ये या विषयावर सदनामध्ये चर्चा झालेली आहे. त्या प्रकरणी कोणकोणते निर्णय घेतले त्यासंबंधी माननीय अर्थमंत्र्यांनी सदनाला माहिती द्यावी.

सभापती महोदय, बाब क्र. 41, पृष्ठ क्र. 39 वर "निवृत्तीवेतनाचे अंशराशीकृत मूल्य प्रदान करणे" याकरिता सन 2006-07 वर्षाकरिता आठमाही सुधारित अंदाजानुसार अपेक्षित खर्च भागविण्यासाठी रुपये 504 कोटी 31 लक्ष 57 हजार रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. सभापती महोदय, आपल्याकडे कर्मचाऱ्यांकरिता भविष्य निर्वाह निधी योजना आहे. त्यानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याच्या पगाराबरोबर किती आवश्यक निधी लागणार आहे हे आपल्याला समजते. असे असतांना आठमाही पूरक मागणीच्या माध्यमातून ही पूरक मागणी कां करावी लागत आहे? एकीकडे आपल्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत चालली आहे. तर मग भविष्य निर्वाह निधीची तरतूद करण्याकरिता आपल्याला पूरक मागणीचा आधार कां घ्यावा लागला हा महत्वाचा प्रश्न आहे?

त्याचप्रमाणे पृष्ठ क्र. 39 वरील बाब क्र. 42 मध्ये विमाधारकांना व त्रयस्थ पक्षांना मागणीच्या रकमा देण्याकरिता 12 कोटी 52 लक्ष 39 हजार रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. सभापती महोदय, विम्याचे हप्ते ठरलेले असतात. त्यामध्ये जर नवीन विमा उतरविला गेला असेल तर त्याच्या हप्त्याची रक्कम भरण्यासाठी पूरक मागणी करण्यात येत आहे. अशाप्रकारे पूरक मागण्या सादर करुन दुसरा अर्थसंकल्प तयार केला जात आहे ही चिंताजनक बाब आहे. अंदाजपत्रक तयार करीत असतांना विषयवार करावा लागणारा तुमच्या विभागाचा अभ्यास कमी होत चालला आहे. अशाचप्रकारची बाब क्रमांक 43 वरील 7 कोटी 27 लक्ष 50 हजार रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. सभापती महोदय, शेवटी मंत्रिमहोदयांचे खाते काय काम करते? आपणाकडे कर्मचारी वर्ग आहे, ते काय काम करीत आहे? याठिकाणी भारतीय आयुर्विमा महामंडळ, गृहनिर्माण व नगर विकास महामंडळ यांना प्रत्यक्ष किती व्याज द्यावे लागेल याचा अंदाज आपणास यापूर्वी यावयास पाहिजे होता. ही बाब अंदाजपत्रकामध्ये प्रोजेक्ट होणे आवश्यक होती, ती अंदाजपत्रकामध्ये प्रोजेक्ट न होता पूरक मागणीच्या निमित्ताने सादर होत आहे याचे मला आश्चर्य वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 58 व बाब क्र. 58 मध्ये मुंबई शहर-दिवाणी व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्याकरिता मंजूर अनुदानाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी सन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

2006-07 च्या आठमाही सुधारित अंदाजानुसार रुपये 5 कोटी 43 लक्ष 78 हजारची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. यामध्ये गंमतीची बाब अशी की, अर्थशास्त्र आणि अंकगणित यांचा यामध्ये मेळ बसत असेल तर अशाप्रकारे पूरक मागणी सादर करण्याचे प्रसंग शासनावर कां यावेत? याचे उत्तर आपल्याला सापडत नाही. पूरक मागण्या सादर करणे हे एक माध्यम बनले आहे. आणि त्या माध्यमाव्दारे राहिलेला खर्च विधीमंडळासमोर पूरक मागण्याव्दारे मांडून त्याला मंजूरी घ्यावयाची अशाप्रकारचा पायंडा पूर्वी देखील होता. परंतु एवढया मोठया प्रमाणात मोठया रकमा मागण्यात येत नव्हत्या त्या आता दिसू लागल्या आहेत.

सभापती महोदय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 64 वरील बाब क्र. 62 मध्ये शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयांना मंजूर अनुदानाहून अधिक खर्च भागविण्यासाठी सन 2006-07 या वर्षाच्या सुधारित अंदाजानुसार मंजूर अनुदानापेक्षा रु. 7 कोटी 1 लाख 43 हजार इतका अधिक खर्च होणार असल्याचे दिसून येते. हा अधिक खर्च मुख्यत्वेकरुन महागाई भत्ता आणि सामग्री व पुरवठा यामुळे झाला असून त्याकरिता पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे बाब क्रमांक 61 मध्ये "वीजेच्या विक्रीवरील कर अधिनियम 1963 खालील जमा रकमा 2006-07 या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंदाज केल्यापेक्षा अधिक असणे अपेक्षित असल्यामुळे आवश्यक तरतूद करण्यासाठी रु. 42 कोटी 5 लक्ष रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. सभापती महोदय, अंदाजित रकमा दाखविण्यात येतात त्यापेक्षा त्या जास्त निधाल्या तर आपण समजू शकतो. परंतु प्रत्येक वेळी अंदाजित रकमा कमी दाखविल्या जातात व नंतर त्याकरिता पूरक मागणी सादर केली जाते. याचा अर्थ आपला अभ्यास किती आहे? आपल्या कर्मचाऱ्यांवरील खर्चाचा बोजा वाढतो. महागाई भत्त्यामध्ये वाढ झाल्यामुळे त्यांच्या पगारामध्ये बदल होत असतो. परंतु त्याकरिता प्रत्येक वेळी अशाप्रकारे पूरक मागणी सादर करणे कितपत योग्य आहे याचा शासनाने विचार करावा.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू...

पृष्ठ क्रमांक 65, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, बाब क्रमांक 66. "0853 अलोह खनिकर्म व धातुविषयक उद्योग"या जमा शीर्षाखालील 2005-2006 या वर्षाकरिता प्रत्यक्ष जमा रकमेच्या 10 टक्के रक्कम खनिज विकासासाठी देणे आवश्यक असते. सन 2006-2007 या वर्षाकरिता रु. 2,12,91,000 इतकी तरतूद केली असून सुधारित अंदाजानुसार रु. 7,72,47,000 इतकी तरतूद अपेक्षित असल्यामुळे रु.5,59,56,000 ची पूरक मागणी केलेली आहे. या संदर्भातील मला गणित समजत नाही. आश्चर्य वाटते की, प्रत्यक्ष निधी 10 टक्के दिला गेला. एवढ्या मोठया रक्कमेची वसुली खनिकर्म खात्याकडून केलेली आहे काय ? एवढी वसुली झाली असेल तर सरकारने अंदाजपत्रकामध्ये आकडे दाखविलेले आहेत, ते निश्चितच दिशाभूल करणारे आहेत असे वाटते. सुरुवातीला अंदाज नव्हता म्हणून पूरक मागणी केलेली आहे. अशापध्दतीने हजारो कोटी रुपयाची पूरक मागणी सदनासमोर मंजुरीसाठी येते. अंदाजपत्रकाच्यावेळी देखील अशाप्रकारच्या चुका राहून जाणे ही निंदनीय गोष्ट आहे.

त्यानंतर पृष्ठ क्रमांक 73, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बाब क्रमांक 76. दिनांक 17 ते 19 फेब्रुवारी,2007 या काळात तबलिमी इज्तीमा या धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी 7 ते 8 लाख मुस्लिम समुदाय माळदे, ता.मालेगाव, जि.नाशिक येथे भेट देतील असे अपेक्षित असल्यामुळे तेथे प्राथमिक सोयी सुविधाची तरतूद करण्याकरिता रु.2 कोटी इतका खर्च अंतर्भूत आहे. मला शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे की, इज्तीमा हा सण प्रत्येक वर्षी साजरा केला जात असेल तर अशाप्रकारे यात्रेकरू नियमितपणे येत असतील तर त्यांच्या सुविधेसाठी एकदाच खर्च करून त्या समुदायाला सुविधा उपलब्ध करून देण्याचा का प्रयत्न करत नाही ? असा माझा प्रश्न आहे. अशाप्रकारे पूरक मागणीच्या मार्फत मागणी करून काहीच साध्य होणार नाही. एकदाच खर्च करण्याबाबतची तरतूद करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे पंढरपूरच्या यात्रेच्या संबंधाने योजना सादर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे योजना सादर करून तरतूद केली तर अशाप्रकारे पूरक मागण्या सादर करून प्रत्येकवेळी शासनावर बोजा पडतो तो पडणार नाही. ही यात्रा प्रतिवर्षी भरते की काही वर्षांनी भरते याचा खुलासा व्हावा. प्रतिवर्षी भरत असल्यास ज्या सुविधा आहेत त्या एकदाच खर्च करून उपलब्ध करुन का देत नाही ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

गृहनिर्माण विभाग, बाब क्रमांक 88. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नगर नवीकरण अभियानाकरिता सन 2006-07 या वर्षसाठी 324 कोटी, 47 लाख, 50 हजार इतकी तरतूद करण्यात आली होती. परंतु आठमाही सुधारित अंदाजाच्या आधारे रु.87 कोटी, 5 लाख, 10 हजार इतका अधिक खर्च अपेक्षित असल्यामुळे पूरक मागणी सादर केली आहे. जवाहरलाल राष्ट्रीय नगर नवीकरण योजना ही केंद्र सरकारची आहे. आपल्या राज्यालाही काही खर्च करावा लागतो. या ठिकाणी देखील हाच प्रश्न येतो की, सगळ्या योजना बंद करुन जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नगर नवीकरण योजना मार्गी लावायची आहे. त्यासंबंधीचा देखील निश्चित कार्यक्रम आखून केंद्र सरकारकडून मिळणारी तरतूद आणि आपली तरतूद करून नियमितपणे या खात्याने काम केले तर ही योजना राबविण्यासाठी काही अडचण येणार नाही,असे मला आग्रहाने सांगावेसे वाटते.

त्यानंतर पृष्ठ क्रमांक 107, आदिवासी विकास विभाग, बाब क्रमांक 99, कुपोषण कमी करण्यासाठी आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत पुरविणे, याकरिता चालू वित्तीय वर्षामध्ये रु.12 कोटी, 3 लाख, 44 हजार एवढा खर्च अपेक्षित असल्यामुळे ही पूरक मागणी सादर केलेली आहे. माझ्यासमोर प्रश्न असा आहे की,महाराष्ट्र राज्यामध्ये कुपोषण असलेली बालके मृत्यूमुखी पडतात. सकस आहार म्हणून सरबत देणार असाल...

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

आणि ते सरबत जर पौष्टिक असेल तर आमची बालके कुपोषित होऊन का मरतात ? याचे उत्तर शासनाला द्यावे लागेल. कारण यासाठी शासन खर्च करते. याचा अर्थ असा होतो की, जेवढा निधी उपलब्ध करुन दिला जातो तो त्या ठिकाणी वापरला जात नाही. त्या निधीला दुसरीकडे मार्ग मिळतो आणि दुसऱ्या ठिकाणी तो निधी वापरला जातो असे दिसते. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाल्यानंतर सुध्दा आदिवासी मुलांना चांगला आहार मिळू नये यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही. युती शासनाचा साडेचार वर्षाचा कालखंड सोडला तर या ठिकाणी आपणच राज्य करीत आहात. युतीचे सरकार आपल्या डोळ्यामध्ये सलते. प्रत्येक सन्माननीय सदस्य युती सरकारचा रेफरंस देतो. तुम्ही युती सरकारची पाच वर्षे असा उल्लेख करता परंतु तो कालखंड साडेचार वर्षाचा होता. तुम्ही पाच वर्षे राज्य केले आणि संपूर्ण महाराष्ट्राची वाट लावली असा प्रचार किंवा अपप्रचार युती शासनाच्या बाबतीत केला जातो. आपण वस्तुस्थिती स्वीकारली पाहिजे. या ठिकाणी एका बाजूला राष्ट्रवादी काँग्रेस आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेस यांचा पांगुळगाडा चालू आहे. यापेक्षा याला दुसरे नाव देता येत नाही. ज्यावेळी सत्ता येते तेव्हा एक होतात आणि सत्ता नसेल तेव्हा सगळी माणसे वेगळी होतात. ही बालके कुपोषित का होतात ? हे साडेबारा कोटी रुपये कोठे जातात ? याचा खुलासा झ ाला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 111 वरील बाब क्रमांक 103 मध्ये दिनदयाळ आदिवासी सहकारी सूतगिरणी मर्यादित, उदयनगर, ता. साक्री, जि. धुळे यांना 1:9 या प्रमाणात शासनाचे भागभांडवल उपलब्ध करुन देण्याकरिता रु. 8 कोटी 57 लाख 90 हजार इतक्या रकमेची चालू वित्तीय वर्षात अर्थसंकल्पात तरतूद करण्याकरिता पूरक मागणी सादर केली आहे. यासंदर्भात मी एकच म्हणेन की, आपण सहकारी सूतगिरण्या निर्माण करतो आणि त्यासाठी शासन त्यांना भागभांडवल देते. या सूतगिरण्या नंतर बंद पडतात. सूतगिरण्या बंद पडल्यानंतर पुन्हा ते शासनाकडून मदत घेऊन जातात. साखर कारखाने, सूतगिरण्या हे सर्व उपक्रम राबविताना सुरुवातीला कोणाकडे तरी जबाबदारी द्यावयाची आणि नंतर ती जबाबदारी शासनावर टाकावयाची असे चालले आहे. उपक्रम सुरु करावयाचा आणि तो बरोबर कार्यान्वित होत नाही म्हणून परत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

शासनाकडे जावयाचे आणि आमचा उपक्रम आजारी पडला आहे, या उपक्रमाच्या तब्येतीकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मागणी केली जाते. असा प्रयोग महाराष्ट्रामध्ये चालू आहे. अशा प्रयोगाच्या बाबतीत लक्ष देऊन असे प्रकार परत परत होणार नाही याची काळजी घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 120 वरील बाब क्रमांक 109 मध्ये भारत सरकारने शेतकऱ्यांना प्रतिवर्ष 7 टक्के दराने पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याचे ठरविले असून राज्य शासनाने प्रतिवर्ष 6 टक्के दराने पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. 1 टक्का इतके व्याज राज्य शासनाकडून सोसण्यात येणार आहे. याकरिता रु. 79 कोटी 25 लाख इतका खर्च आवश्यक आहे व राज्यातील सहकारी सूत गिरण्यांना 3 टक्के व्याज सहाय्य मंजूर करण्याचे ठरविले आहे, याकरिता रु. 66 कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. याकरिता रु. 141 कोटी 24 लाख 81 हजार रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. यामध्ये महत्वाचा प्रश्न असा आहे की, गेल्या संपूर्ण वर्षामध्ये शासनाने किती शेतकऱ्यांना 6 टक्के व्याजदराने कर्ज दिले ? भविष्य काळात किती शेतकऱ्यांना कर्ज देणार हा पुढचा प्रश्न आहे. आज किती शेतकऱ्यांना 6 टक्के व्याजदराने कर्ज दिले याची माहिती सदनासमोर येणे आवश्यक आहे. 6 टक्के व्याजदराने किती शेतकऱ्यांना कर्ज दिले ? याचे उत्तर माननीय वित्त मंत्र्यांनी द्यावे. त्यामुळे किती शेतकऱ्यांचे प्रश्न मिटले ? शेतकऱ्यांच्या आत्महत्या किती कमी झाल्या ? किती नवीन लोकांनी 6 टक्के दराने कर्ज घेतले याची माहिती सदनाला द्यावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 120 वरील बाब क्रमांक 110 मध्ये नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आर्थिक चणचणीतून बाहेर पडण्यासाठी भागभांडवली अंशदान देण्याकरिता रु. 19 कोटी 60 लाख 35 हजार रुपयांची पूरक मागणी सादर केली आहे. जेव्हा बँकेची स्थिती सुधारेल तेव्हा बँक शासनाला ही रक्कम परत करील या शर्तीवर हे भागभांडवल देण्यात येत आहे. ज्यावेळी बँकांसाठी असे भागभांडवल दिले जाते त्यावेळी हे भागभांडवल परत करावयाचे असते, शासनाचे पैसे परत करावयाचे असतात अशी अट असते. असे असताना महाराष्ट्रामध्ये सहकार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बँकांचे किती घोटाळे झाले ? त्यामध्ये किती हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला ? या बँका आजारी पडल्यानंतर शासनाने त्यांना मदत करावयाची आणि हे घोटाळे करणारे लोक प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करतात त्यामुळे सहकार खाते संपूर्ण देशामध्ये बदनाम झालेले आहे. माननीय वित्त राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख या ठिकाणी उपस्थित आहेत. मला त्यांना मुद्दाम सांगावयाचे आहे की, वित्त खाते हे देशातील, महाराष्ट्रातील सहकार संपवावयास निघाले आहे. या क्षेत्रामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होतो. एक काळ असा होता की, त्यावेळी सहकार खाते महाराष्ट्र शासनाला प्रचंड निधी मिळवून देत होते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

आता केन्द्राकडून पैसा आणून तो सहकार खात्यावर खर्च करावयाचा आणि भ्रष्टाचार करावयाचा असे प्रकार होत आहेत. हे प्रकार मोडून काढण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ? हे प्रयत्न केले असतील तर त्यामध्ये शासनाला कितपत यश आलेले आहे ? यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृ.क्र. 130 वरील बाब क्रमांक 118 मध्ये केंब्रिज विद्यापीठातील डॉ. डी.सी.पावटे स्मारक अधिछात्रवृत्तीसाठी कर्नाटक विद्यापीठास सहाय्य देण्याकरिता रु. 10 लाखाची पूरक मागणी सादर केली आहे. डॉ. डी.सी.पावटे फाऊंडेशनच्या समन्वयाने कर्नाटक विद्यापीठाच्या सहकार्याने केंब्रिज विद्यापीठातील सेंटर ऑफ इंटरनॅशनल स्टडीजद्वारे तीन महिन्याकरिता भारताशी संबंधित प्रकल्पाबाबत दरवर्षी एका गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांला अधिछात्रवृत्ती दिली जाते. या अधिछात्रवृत्तीसाठी तरतूद केल्याबद्दल मला आनंद होत असून याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृ.क्र. 131 वरील बाब क्रमांक 121 मध्ये अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, सोलापूर यांनी दिलेल्या आदेशानुसार मोहोळ, जिल्हा सोलापूर येथे शासकीय तंत्रशाळेसाठी जमीन संपादन केलेल्या जमिनीसाठी मालकाला व्याजासहीत रु. 8,99,519 इतक्या रकमेची नुकसान भरपाई देण्यासाठी ही रक्कम न्यायालयात दिनांक 8 जुलै, 2005 रोजी जमा करण्याचे आदेश दिलेले आहेत. ही रक्कम वेळेत दिली नाही म्हणून दिनांक 13 जानेवारी 2007 पर्यन्तच्या व्याजाची गणना करण्याचा न्यायालयाने आदेश दिला आहे. या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, ही रक्कम वेळेत जमा न करण्याला कोण जबाबदार आहे ? त्याच्यावर काय कारवाई केली आहे ? शेवटी हे लोकांचे पैसे आहेत. हे जे पैसे अशा प्रकारे फुकट घालविले जातात त्याबद्दल शासनाने काळजी घ्यावी. असे प्रकार होणे महाराष्ट्र शासनाला भूषणावह नाही. महाराष्ट्र हे प्रगत राज्य म्हणून आपण शेखी मिरवतो. या प्रगत राज्यात अशा प्रकारच्या घटना होत आहेत त्याबद्दल मला खेद होतो.

सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांना सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2006-2007च्या पूरक मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

नगर विकास विभागाच्या पृ.क्र. 35-36वरील बाब क्रमांक 38-39 च्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, बंद पडलेल्या गिरण्या आणि कारखाने यांच्या जमिनींवर मॉल्स आणि टॉवर्स उभारले जात आहेत आणि कामगार हे देशाधडीला लागत आहेत. मुंबईतील उद्योगधंदे हे मुंबई बाहेर स्थलांतरित होत आहेत. परिणामी मुंबईचा औद्यागिक विकास होण्याऐवजी -हासच होतोय असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. मुंबई जवळ मोठमोठे उद्योगधंदे उभे राहिले पाहिजेत यासाठी औद्योगिक वसाहतीमध्ये योग्य त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे अतिशय आवश्यक आहे. मुंबईतील रस्ते विविध कारणांसाठी खणून ठेवलेले आहेत त्यामुळे वाहतुकीला बराच त्रास होतो. या रस्त्यांची दुरुस्ती चटकन होत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर बोलत असताना मी एस.व्ही.रोडचा उल्लेख केला होता.

...नंतर कु. गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

मला या ठिकाणी विशेष करुन एस.व्ही रोडचा पुन्हा उल्लेख करावयाचा आहे. या रोडवर अनेक ठिकाणी खोदकाम चालू आहे. या रस्त्याला अनेक उपरस्ते काटकोनात येऊन मिळातात. या रोडवरुन जी वाहने येतात त्यांना उजवीकडे वळावयाला मुभा आहे त्यामुळे या रस्त्यावरुन होणाऱ्या वाहतुकीमध्ये अतिशय अडथळा निर्माण होतो. ही वाहने उजवीकडे वळत असल्यामुळे आणि U टर्न घेत असल्यामुळे एस.व्ही रोड वरुन जलदपणे अंधेरी ते वांद्रे हे अंतर कापणे शक्य होत नाही. अध्यक्ष महोदय, जुळया मुंबईच्या संदर्भात जुळी काय पण तिळी शहरे निर्माण होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे एस.व्ही रोड वर फक्त 3 ते 4 U टर्न किंवा राईट टर्न दिले तर हे अंतर जलद गतीने कापणे शक्य होईल असे मला वाटते. महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य आहे. आणि मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. परंतु या मुंबई शहराचा झपाटयाने विकास होण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहेत. या शहराच्या ज्या पायाभूत सुविधा आहेत त्यावर आपण प्रामुख्याने भर देणे आवश्यक आहे. मुंबई शहराचा विकास करताना पाणी पुरवठा, मल:निस्सारण, पूर यंत्रणा ,मेट्रो रेल्वे, नाला सुधारणा, वाहतूक व्यवस्थापन , घन कचरा व्यवस्थापन.....

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी आपण बाब क्रमांक 38-39 यावर बोलावे .

श्रीमती. सुधा जोशी : सभापती महोदय, या सगळया पायाभूत सुविधांसाठी आपण तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या बजेटमध्ये या संदर्भात जी तरतूद केली गेलेली आहे ती अपूरी आहे . मुंबईमध्ये मुळात उद्याने आणि मैदाने कमी आहेत आणि जी आहेत त्यांची अत्यंत दुर्दशा झ ालेली आहे.तेव्हा आपण या मैदाने आणि उद्यानांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. मुंबई मधील किल्यांची डागडुजी करण्यासाठी आपण आर्थिक मदत दिलेली आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. सभापती महोदय, मी बाब क्रमांक 38-39 जुळया शहरांच्या संदर्भात मुबई शहराबाबत बोलत आहे. मुंबईला जुळे आणि तिळे शहर देण्याची आवश्यकता आहे.

उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, बाब क्रमांक 118, पृष्ठ क्रमांक 130 तंत्र शिक्षण विभागा अंतर्गत ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ आहे त्या ठिकाणी विविध प्रकारचे शिक्षण दिले जाते.

यानंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

हस्तकला, कार्यानुभव, कॅटरिंग, ड्राफ्टस्मन, शिवणकला, संगणक यासारखे एक ते दोन वर्षाचे कोर्सेस असतात. हे शिक्षण घेण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शिकत असतात. दिनांक 10 मे, 1988 च्या निर्णयानुसार फक्त 6 महिन्याकरीता एस.टी.बसेसचे पास अशा विद्यार्थ्यांना दिले जातात. मला असे सुचवावयाचे आहे की, 6 महिन्यापेक्षा अधिक कालावधीच्या कोर्सकरीता प्रवेश घेतला असेल तर अशा विद्यार्थ्यांना त्या कालावधीकरीता एस.टी.पास आणि इतर सवलती देण्यात याव्यात अशी मंत्रीमहोदयांना विनंती करते.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग, पृष्ठ क्रमांक-107, बाब क्रमांक-96 संबंधी मी सांगू इच्छिते की, राज्यातील आदिवासी भागात अनेक आश्रमशाळा आहेत. परंतु त्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. बसण्याची जागा, स्वच्छतागृह, निवासाची सोय अशा समस्या त्यांना भेडसावत असतात. शाळांमध्ये दाखविण्यात येणारी पटसंख्या आणि प्रत्यक्ष शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या यात प्रचंड तफावत आढळून येते. आश्रमशाळांचा कारभार हा स्वच्छ असावा, व्यवस्थित चालावा यादृष्टीने आश्रमशाळांमध्ये सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत मंत्रीमहोदयांनी निश्चितपणे सुधारणा करावी अशी विनंती करते आणि या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते. जय हिंद, जय महाराष्ट्र !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सामान्य प्रशासन विभाग, पृष्ठ क्रमांक-1, दिनांक 9 नोव्हेंबर, 2004 रोजी मंत्रिमंडळाचा शपथविधी आझाद मैदानावर झाला. आम्ही सत्तेवर आलो तेव्हा शिवाजी पार्कवर शपथविधीचा कार्यक्रम पार पडला होता. या कार्यक्रमासाठी रु.33, 42, 656 इतका खर्च मंडप उभारण्यासाठी झ ाला. या संदर्भातील पूरक मागणी 2007 च्या अर्थसंकल्पात मागण्याचे कारण काय? शपथविधी 2004 साली झालेला होता. आता तीन वर्षे उलटून गेली आहेत. या संदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा. श्री.भटकळ नावाचा जो कॉन्ट्रॅक्टर आहे तो शासनाची सर्व कॉन्ट्रॅक्ट्स घेतो. जो पक्ष सत्तेवर येतो त्यांनी आवश्यक वाटेल तेथे शपथविधी समारंभ करावा. आता आझाद मैदान सभा घेण्यासाठी बंद झाले असले तरी शिवाजी पार्क मैदानावर कितीही लोकांची व्यवस्था केली तरी 10 ते 12 लाखापेक्षा जास्त खर्च येता कामा नये. हा कॉन्ट्रॅक्टर शासनाला लुटण्याचे काम करीत आहे. 33 लाख रुपये मंडप उभारण्याचा खर्च दाखविला आहे. हा खर्च या वर्षीच्या पुरवणी मागण्यांमध्ये कसा येतो? हा खर्च त्या वर्षात दाखविला पाहिजे होता. महाराष्ट्र राज्यावर 1 लाख 35 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे, त्या कर्जामध्ये या खर्चाचा देखील समावेश आहे का? याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 4 वर पुनर्विनियोजनाद्वारे अधिक खर्च भागविण्यासाठी रु.10.35 कोटीची पूरक मागणी घेण्यात आली आहे. हे नियमित खर्च आहेत. नियोजनामध्ये या खर्चांचा समावेश आहे. 33 टक्क्यापर्यंत खर्चाच्या बाबतीत पुरवणी बजेट असते असा वृत्तपत्रांमध्ये वारंवार उल्लेख करण्यात येतो हे मी सभागृहाच्या लक्षात आणून देत आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 107, बाब क्रमांक 99 मध्ये म्हटले आहे की, अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत पुरवण्यासाठी 12 कोटी रुपयांचा खर्च अंतर्भूत केलेला आहे. त्यामुळे मला यासंदर्भात असे म्हणावयाचे आहे की, नियमित जो खर्च आहे तो नियोजनामध्ये येतो तो खर्च आपण पुरवणी मागण्यामध्ये कसा काय दाखवू शकतो?

सभापती महोदय, मुंबईतील बेस्ट परिवहनाच्या माध्यमातून दररोज 35 लाख प्रवासी प्रवास करीत असतात. बेस्ट परिवहन प्रत्येक प्रवाशाकडून 15 पैसे आदिवासींच्या विकासाठी सेस वसूल करीत असते. बेस्टने यासंदर्भात 357 कोटी रुपये महाराष्ट्र शासनास आदिवासींच्या कल्याणासाठी द्यावयाचे आहेत असा उल्लेख त्यांनी आपल्या बजेट मध्ये केलेला आहे त्यामुळे बेस्टचे पैसे महाराष्ट्र शासनाकडे जमा झालेले आहेत काय? शासनाकडे हे पैसे जमा झाले असल्यास या पैशांचा आपल्या बजेटमध्ये उल्लेख का करण्यात आलेला नाही याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 100, पृष्ठ क्रमांक 108 मध्ये तालुका तिरोडा, जिल्हा गोंदिया येथे नवीन लहान पाटबंधा-यांची कामे हाती घेण्यासाठी 70,43,000 रुपयांची मागणी केलेली आहे. तसेच बाब क्रमांक 101 तालुका धडगाव, जिल्हा नंदुरबार मध्ये नवीन लहान पाटबंधा-याची बांधकामे हाती घेण्यासाठी 1.83 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच बाब क्र. 102 मध्ये तालुका धाडगाव (अक्राणी) जिल्हा नंदुरबार येथील लहान पाटबंधा-याची बांधकामे हाती घेण्यासाठी 61,08,000 रुपयांची मागणी केलेली आहे. परंतु यासंदर्भात मला असे विचारावयाचे आहे की, प्रकल्पाच्या संदर्भात 2-3 वर्षे अगोदर प्लॅनिंग होत असते. सन्माननीय सदस्यांनी पाटबंधा-यांची मागणी केली किंवा नळपाणी पुरवठयाची मागणी केली व त्यासाठी जनतेने मोर्चे काढले तर ही मागणी काही त्वरित मंजूर होत नाही. परंतु लहान पाटबंधा-यासाठी या ठिकाणी कोटयावधी रुपयांची तरतूद कशी केलेली आहे हे समजत नाही. खरे म्हणजे या कामासाठी कोटयावधी रुपयांचे नियोजन अगोदरच करावे लागते त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उल्लेख करावा अशी विनंती आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत "आदिवासी कल्याणासाठी आमचे राज्य आदिवासींचे भान ठेवून योजना करते आणि या योजनांची अंमलबजावणी बेभान होऊन करीत असते" अशी आदिवासी भागात जाऊन आपल्याच मंत्र्यांनी वक्तव्ये केलेली आहेत. त्यामुळे आदिवासींच्या कल्याणासाठी 17-18 कोटी रुपयांची जी मागणी केलेली आहे ती मागणी आपण पुरवणी मागणीमध्ये कशी काय केलेली आहे ते कळत नाही.

सभापती महोदय, मी आता सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. शासनाला मुंबईच्या गिरणी मालकांकडून 1 हजार 91 कोटी 47 लाख रुपये पाणी आणि मलनि:स्सारण रुपाने येणे आहे. या गिरणी मालकांनी त्यांच्याकडील सर्व जमीन विकून त्या जमिनीवर मोठमोठे टॉवर्स उभे केलेले आहेत. गिरणी मालकांकडून हे पैसे वसूल करण्याच्या संदर्भात वस्त्रोद्योग विभागाच्या अधिका-यांनी दुर्लक्ष केलेले दिसते. दत्ता सामंत यांनी गिरण्यांचा संप केल्या पासून म्हणजे 1984 पासून या गिरण्या बंद पडलेल्या आहेत. 23 वर्षे होऊन सुध्दा शासनाने गिरणी मालकांकडून ही थकबाकी वसूल केलेली नाही. त्यामुळे आता आपण गिरणी मालकांकडून हे पैसे कसे काय वसूल करणार आहात याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या भाषणात द्यावी एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 62, पृष्ठ क्रमांक 64. महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात, 18-18 तासाचे विजेचे भारनियमन केले जात आहे. 18-18 तासांचे भारनियमन होत असतांना देखील पुर्वीसारखेच वीज बील येत आहे. खरे म्हणजे 18-18 तासाचे भार नियमन होत असल्यामुळे बीज बील कमी यावयास पाहिजे परंतु तसे होत नाही. नवीन मीटर लावले तरी बील कमी येत नाही उलट ते वाढते. सध्या जे काही नवीन इलेक्ट्रॉनिक्स मीटर लावले जात आहेत ते बरोबर नाही अशी जनतेची तक्रार आहे त्यामुळे शासनाने याकडे प्रामुख्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

बाब क्रमांक 71- पृष्ठ क्रमांक 72- ग्राम विकास विभाग- सभापती महोदय, जिल्हापरिषदेच्या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी मागील पाच वर्षापूर्वी शासनाने एक पिंगुळकर समिती नेमली होती. त्या समितीच्या आजपर्यंत किती बैठका झाल्या ? त्या समितीने अभ्यास करुन कोणत्या शिफारशी केल्या ? यासंबंधीची माहिती आम्हाला आजपर्यंत प्राप्त झालेली नाही. या समितीवर लाखो रुपयांपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. तेव्हा या समितीने कोणत्या शिफारशी केल्या त्याची माहिती आम्हाला समजली पाहिजे.

बाब क्रमांक 76, पृष्ठ क्रमांक 73- ग्राम विकास व जलसंधारण विभाग- सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील चौल येथे दत्त मंदिर आहे. या मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. या मंदिराचा जीर्णोध्दार करण्याची आवश्यकता आहे. तसेच सभोतालचा परिसर सुशोभित करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे रायगड येथे पुरातन कनकेश्वर मंदिर आहे. याही ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. या दोन्ही ठिकाणी भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 84, पृष्ठ क्रमांक 87- नियोजन विभाग- सभापती महोदय, माझा वित्त मंत्र्यांना प्रश्न आहे की, डी.पी.डी.सी.चे फॉर्मेशन राज्य सरकार करणार आहे काय ? डी.पी.डी.सी.चे फॉर्मेशन कसे करावे यासंबंधीचे सूत्र आहे. ते मी आपणास सांगतो.

1) पालकमंत्री- अध्यक्ष,
2) राज्यमंत्री- सहअध्यक्ष,
3) जिल्हापरिषदेचे अध्यक्ष- सदस्य,
4) उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचा प्रतिनिधी- सदस्य,
5) विधानमंडळाचा एक सदस्य- सदस्य.
6) मेंबर सेक्रेटरी जिल्हाधिकारी- सदस्य सचिव,
7) पालकमंत्र्यांनी शिफारस केलेले अशासकीय - दोन सदस्य
8) जिल्हापरिषद सदस्यांमधून निवडणुकीने निवडलेले- 24 सदस्य
9) नगरपरिषदेमधून निवडणुकीने निवडलेले 8 सदस्य इत्यादींचा त्यामध्ये समावेश असतो. अशा एकूण 40 सदस्यांचा त्यामध्ये समावेश असतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, पूर्वी जिल्ह्यात डी.पी.डी.सी.च्या बैठकीस एकप्रकारचे स्टेटस होते. डी.पी.डी.सी.ची बैठक हा चर्चेचा विषय असायचा. परंतु आता डी.पी.डी.सी.ची बैठक हा चेष्टाचा विषय होत आहे. आता डी.पी.डी.सी.ची बैठक चटावरचे श्राध्द उरकतात त्याप्रमाणे चटकून उरकून घेतात. डी.पी.डी.सी.च्या बैठकीत नियोजनासंबंधी सविस्तर चर्चा होत नाही.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, मी वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष होतो. त्यावेळी असे ठरले होते की, डी.पी.डी.सी.च्या बैठकीस वैधानिक विकास महामंडळाच्या अध्यक्षांना बोलवावे. परंतु काही जिल्ह्यांमध्ये राज्यमंत्री हे डी.पी.डी.सी.चे अध्यक्ष असल्यामुळे आणि वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्षांचा दर्जा कॅबॅनेट मंत्र्यांचा असल्यामुळे प्रोटोकॉलचा प्रश्न निर्माण इ ाला. तेव्हा असे ठरले की, डी.पी.सी.च्या बैठकीस वैधानिक विकास महामंडळाच्या सदस्यास ध्यावे.

यानंतर श्री.पुरी.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

घटनात्मक पध्दतीने सदस्य त्या कमिटीवर असावयास पाहिजेत, परंतु ते नसतात. सगळया जिल्हा परिषदांमध्ये असे सदस्य मंडळावर यावयास पाहिजेत, असा सन्माननीय सदस्यांचा मुद्दा आहे. आमची अपेक्षा अशी आहे की, मंत्री महोदयांनी या मुद्दाचा उल्लेख आपल्या उत्तरामध्ये करावा. आम्ही हे करणार आहोत, असे माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरामध्ये सांगावे लागेल. परंतु आपण सांगितल्याप्रमाणे जर नंतर घडले नाही तर तो हक्कभंगाचा विषय होऊ शकतो, याची जाणीव मी आपल्याला करुन देतो.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी अतिशय महत्वाची बाब आपल्या निदर्शनास आणून देत आहे की, जिल्हा परिषदेच्या सदस्यांतून 24 सदस्य आणि नगर परिषदेतून निवडून आलेले 8 सदस्य अशाप्रकारे 32 सदस्य लोकप्रतिनिधी निवडले जाणार आहेत. 73 व्या घटना दुरुस्तीप्रमाणे हे होणे बंधनकारक आहे. त्यामुळे डीपीडीसीत नियोजन करण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना येतील. परंतु प्रत्येक जिल्हयामध्ये आज उलटसुलट प्रकार चालू आहेत. यासाठी शेवटी आम्हाला हायकोर्टात जावे लागणार असून तशी परवानगी आम्ही मागत आहोत. शासन असे करण्यास का टाळाटाळ करीत आहे, याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. खऱ्याअर्थाने नियोजन करण्याच्या दृष्टीनेच डीपीडीसी असते. प्रत्येक जिल्हयातील नियोजन योग्य ठिकाणी झाले पाहिजे, यासाठीच डीपीडीसी आहे. परंतु जाणूनबुजून शासन हे करत नाही, ते करावे अशी मी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून शासनास विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 124 व पान क्रमांक 135 (महिला व बालविकास विभाग) यावर मी बोलणार आहे. सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अंगणवाडी केंद्राकडे पुरविण्यात आलेला आहार महिला बचत गटांकडे दिला पाहिजे, असा माननीय सर्वोच्च न्यायालयाचा एक निकाल आहे. परंतु याबाबतीत शासनाने प्रति लाभार्थी प्रतिदिनी रुपये 1.98 दर निश्चित केला आहे, तो दर फारच कमी असून महिला बचत गटांना परवडणारा नाही. त्यामुळे तो दर आपण प्रति लाभार्थी प्रतिदिनी रुपये 2.75 एवढा करावा, अशी माझी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने विनंती करीत आहे. सभापती महोदय, आपण मला पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यास संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

------- (...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुदीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नगर परिषदेच्या बाब क्रमांक 37 व 38, पान क्रमांक 33 वर मी बोलणार आहे.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मी एवढीच विनंती करणार आहे की, नगर परिषदेच्या ज्या अनेक योजना आहेत, त्यांना आपण पूर्ण अनुदान देत नाही. त्यांना आपण उर्वरित पूर्ण अनुदान द्यावे. विशेषत: मागासलेल्या व नक्षलग्रस्त विदर्भ विभागातील नगर परिषदांना आपण अनुदान द्यावे. चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे आदिवासी व नक्षलग्रस्त आहेत. अनुदानाच्या मागण्यांमध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयांतील प्रकल्पांचा देखील समावेश करावा, अशी मी यानिमित्ताने विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या बाब क्रमांक 94, पृष्ठ क्रमांक 101 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री, श्री.सुरेश शेट्टी आणि माझे काय नाते आहे हे मला कळत नाही. परंतु, मी ज्या ज्या वेळी या बाबीविषयी सभागृहात बोलतो त्या त्या वेळी सन्माननीय श्री.सुरेश शेट्टी हे सभागृहात उपस्थित असतात. मी गेल्या तीन अधिवेशनांमध्ये ही बाब उपस्थित केली आहे. त्याचप्रमाणे या खात्याच्या सचिवांनाही पत्र लिहिले आहे.

सभापती महोदय, राज्यातील आयुर्वेदिक, समचिकित्सा व युनानी महाविद्यालय, रुग्णालये, संस्था यांना चालना देण्यासाठी या पुरवणी मागणीन्वये वित्तीय सहाय्य देण्यात येणार आहे. मला वाटते की, मंत्रीमहोदयांच्या हे लक्षात असेल की, गेल्यावर्षी त्यांनी असे सांगितले होते की, हा जो केंद्राचा 100 टक्के अनुदानाचा निधी येतो तो आपण वैद्यकीय महाविद्यालयांना देतो. त्यातून त्यांनी पायाभूत सुविधा, सामुग्री, पुस्तके खरेदी करावयाची असतात. माझ्या माहितीप्रमाणे यासाठी समिती नेमण्यात यावयाची होती व ही समिती सर्व महाविद्यालयांना भेटी देऊन याबाबतची तपासणी करणार होती. परंतु, अजूनपर्यन्त समिती नेमलेली नाही, नेमली असेल तर या समितीने दौरे केलेले नाहीत. कारण, एक वर्ष झाले तरी या समितीचा अहवाल अद्याप सादर झालेला नाही. याच संदर्भात मी पत्र लिहिले होते. माझी विनंती आहे की, या समितीने आतापर्यन्त किती महाविद्यालयांची चौकशी केली, या महाविद्यालयांनी कोणत्या प्रकारचा शैक्षणिक विकास केला, किती रक्कम आतापर्यन्त खर्च करण्यात आली, किती रक्कम हडप करण्यात आली, याबाबतची माहिती मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 99, पृष्ठ क्रमांक 107 अन्वये अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत पुरविण्यासाठी 12,03,44,000 एवढया रकमेची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाडी बालकांसाठी सरबत खरेदी करण्यात आलेले आहे. एवढी रक्कम खर्च केलेले हे सरबत कोणते आहे, या सरबतामध्ये कोणते शक्तीवर्धक अर्क आहे ? हे सरबत आम्हालाही टेस्ट करण्यासाठी द्यावे. माझी माहिती अशी आहे की, आताच राज्य शासनाने कुपोषित बालकांसाठी 6 कोटी रुपयांचे आऊटडेटेड माल्ट खरेदी केलेले आहे. यासंदर्भात याच अधिवेशनामध्ये मी तारांकित

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

प्रश्न उपस्थित करणार आहे. सार्वजनिक आरोग्य खात्याला आगाऊ सूचना यासाठी देत आहे की, या प्रश्नाची त्या विभागाने तयारी करुन यावी. त्यावेळी आम्हाला असे सांगण्यात येऊ नये की, परिपूर्ण माहिती विभागाकडे उपलब्ध नाही. आता जे सरबत खरेदी केले आहे त्या सरबतामध्ये कशाप्रकारचे कंम्पोझिशन आहे ? सन्माननीय मंत्री स्वत: डॉक्टर आहेत. कुपोषणावर मात करायची असेल तर simyl m.city हे ड्रॉप्स विकत मिळतात. त्यामध्ये ट्रामगिसलाईड असते. या ड्राप्सचा प्रयोग आम्ही मोखाडा, नंदुरबार यासारख्या कुपोषणग्रस्त भागात केला आहे. याऐवजी शासन हे सरबत का खरेदी करीत आहे ? याव्दारे किती कमिशन मिळविण्यात आले आहे ? सत्यता पडताळून पहावयाची असेल तर माननीय मंत्री, श्री.बाबा सिद्धिकी यांच्या विभागाकडून तपासणी करुन घ्यावी व त्यांच्या विभागाचा अहवाल या सभागृहापुढे सादर करावा. कुपोषित बालकांच्या नावाने आदिवासी विकास विभागाने अशा प्रकारे पैसे खाणे हे अमानवीय आहे. याबाबत शासनाने चौकशी करावी व त्याचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा, अशी विनंती करतो आणि थांबतो.

यानंतर कु.जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, या ठिकाणी पान क्रमांक 71 ते 74वर बाब क्रमांक 69 ते 77 मध्ये ग्रामविकास खात्याच्या मागण्या दिलेल्या आहेत. या निमित्ताने ग्रामविकास विभागाशी संबंधित जे प्रश्न आहेत, ते मी आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सभापती महोदय, जिल्हापरिषदेच्या प्रमुख शाळांमध्ये काम करणारे जे शिक्षक आहेत ते शिक्षक स्थानिक स्वराज्य संस्थेचे आहेत व ते ग्रामविकास खात्यामध्ये काम करीत आहेत. दरवर्षी पाच सप्टेंबरला या शिक्षकांपैकी काही शिक्षकांना " आदर्श शिक्षक " म्हणून पुरस्कार देऊन गौरविले जाते, त्यावेळी त्यांचा सत्कार होतो, पुरस्कार मिळतो, वेतन वाढही मिळते परंतु सन 2003 - 2004 व सन 2004 - 2005 या दोन वर्षांमध्ये ज्या शिक्षकांना "आदर्श शिक्षक " पुरस्कार मिळाला, त्यांचा सत्कार झाला परंतु अद्यापही त्या शिक्षकांना जी वेतनवाढ मिळावयाला पाहिजे होती, ती मिळालेली नाही. ग्रामविकास खात्याने या संबंधी विशेष लक्ष द्यावे, अशी मी त्यांना विनंती करतो.

बाब क्रमांक 96 ते 102, पान क्रमांक 107 ते 112 आदिवासी विभागाच्या मागण्या या ठिकाणी मांडलेल्या आहेत. याही मागण्या या ठिकाणी मंजूर होतील. ठाणे,रायगड,सिंधुदूर्ग, पुणे या जिल्हयांमध्येही फार मोठया प्रमाणावर "कातकरी" समाज अस्तित्वात आहे. या विभागाचे व्यवस्थितरित्या सर्वेक्षण व्हावयाला हवे होते ते अद्यापही झालेले दिसून येत नाही. या विभागातील कातकरी समाजाला अजूनही आदिवासी विभागातर्फे ज्या काही सोयी सुविधा व सवलती मिळतात त्या मिळालेल्या नाहीत. सदर विभागातील कातकरी समाज या सोयीसुविधांपासून वंचितच आहे. या कातकरी समाजाचे योग्य त्या पध्दतीने सर्व्हेक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. रायगड,चिपळूण दापोली याही भागांमध्ये काही गावांमध्ये आदिवासी लोकसंख्या जास्त प्रमाणात असल्यामुळे त्या ठिकाणी सुध्दा आदिवासी भागातील योजना पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे आदिवासी विभागामार्फत आदिवासी समाजाच्या मुलांकरिता जे विद्यावेतन दिले जाते, ते तेथील विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नाही. या शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्यावेतन जर शासनाने बँकेत लाभार्थ्यांच्या नावाने अकाऊंट ओपन करुन चेकमार्फत दिले तर फार बरे होईल.

बाब क्रमांक 121 पान क्रमांक 131 वर या ठिकाणी जो शिक्षण विषयक प्रश्न आहे.

3H -2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

त्याबद्दल सांगावयाचे झाले तर अजूनही संबंधित व्यक्तींना पैसे देण्यात आलेले नाही. शासनाच्या संबंधित अधिका-याने न्यायालयाच्या आदेशाचे पालन सुरुवातीलाच केले असते तर फक्त 8 कोटी 99 हजार रुपये संबंधित व्यक्तींना द्यावे लागले असते, परंतु संबंधित अधिका-याच्या अट्टाहासामुळे,हलगर्जीपणामुळे,दुर्लक्षामुळे संबंधितांनी " कंटेम्प्ट ऑफ कोर्ट " ही अवमान याचिका दाखल केल्यामुळे सदर पैसे लवकरात लवकर देण्याचे आदेश न्यायालयाने निर्गमित केल्यानंतर सदर रक्कम जवळजवळ 9 लाख 43 हजारांच्या घरात गेली. कोर्टाने आदेश दिल्यानंतरही त्याचे पालन संबंधित अधिका-याने न केल्यामुळे शासनाचे जवळजवळ 45 हजार रुपये जास्त गेले, हा पैसा जनतेचा आहे, सदर संबंधित अधिका-याचे नाव आम्हाला कळावयाला हवेत आणि संबंधित अधिका-याकडून हे शासनाचे जास्त गेलेले पैसे वसूल करुन घ्यावयास हवे, अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्दयाबाबत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, माननीय शिक्षण मंत्र्यांनी आज सकाळी बीजगणित आणि भूमितीच्या प्रश्नपत्रिकेसंदर्भात निवेदन केलेले आहे. ते निवेदन अजून आम्हाला मिळालेले नाही.

तसेच, शासनाने ऊसाच्या संदर्भात आज निवेदन करण्याचे मान्य केलेले आहे. ते निवेदन केव्हा होणार आहे ?

तालिका सभापती : माननीय सहकार मंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर सभागृहामध्ये उपस्थित आहेत, ते निवेदन करणार आहेत.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार मंत्री) : सभापती महोदय, होय.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2006-07 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु .....

श्रीमती उषाताई दराडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी सन 2006-07 च्या खर्चाच्या पूरक मागण्यांना समर्थन देण्यासाठी उभी आहे. वेळेचे बंधन असल्यामुळे मी फक्त दोनच वाक्यांमध्ये समर्थन देणार आहे. बीड जिल्हयामध्ये स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन 2003-04 मध्ये एकंदरित 16 ते 17 कामे अशी आहेत की, त्या कामांना जिल्हाधिका-यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. वर्क ऑर्डर देऊन कामे केली गेली आहेत. परंतु प्रमाणापेक्षा जास्त कामे केल्यामुळे निधी प्राप्त झालेला नाही. जिल्हापरिषदेने निधी मिळण्यासंदर्भात शासनाकडे निधीची मागणी केलेली आहे. परंतु अद्याप निधी मिळालेला नाही. मी त्या कामांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवते. बीड जिल्हयातील स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन 2003-04 साठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपविते.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. बाब.क्र.94, पृष्ठ क्र.101, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, या मागणी अंतर्गत मला असे विचारावयाचे आहे की, कर्मचारी वर्गाची नेमणूक करतांना युनानी डॉक्टरांची नेमणूक का केली जात नाही ? या पुरवणी मागणीमध्ये युनानी डॉक्टरांच्या नेमणुकीसंदर्भात उल्लेख करण्यात आलेला नाही. रुग्णालयामध्ये ॲलोपॅथी डॉक्टरांची, आयुर्वेदिक डॉक्टरांची नेमणूक केली जाते. परंतु युनानी डॉक्टरांची नेमणूक केली जात नाही. माझी अशी विनंती आहे की, मेडीकल कॉलेजमध्ये आणि पब्लिक हॉस्पिटलमध्ये युनानी डॉक्टरांची नियुक्ती करण्यात यावी, एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मराव बाबा आत्राम (सामाजिक न्याय, ओबीसी व भटके विमुक्त कल्याण, महिला व बालकल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, बाब क्र.80 मध्ये स्कॉलरशिपकरिता एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच, महिला व बालकल्याण विभाग, बाब.क्र. 124 अंतर्गत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी बचत गटांना काम दिले पाहिजे व त्यामध्ये वाढ झाली पाहिजे, अशी विनंती केलेली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, राज्य शासन यासंदर्भात योग्य तो निर्णय घेणार आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 65, 67, 80 व 124 अंतर्गत करण्यात आलेल्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

..5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास, सामान्य प्रशासन, जलसंधारण, संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, सन्माननीय सदस्य श्री.जैनुदीन जव्हेरी यांनी नगर विकास विभागावर आपले विचार व्यक्त करुन काही प्रश्न उपस्थित केले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी यात्रा करासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पंढरपूर यात्रेकरिता शासन 50 लाख रुपये अनुदान देत होते. परंतु आता शासनाने पंढरपूर यात्रेकरिता एक कोटी रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे 50 लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे.

यानंतर श्री.गागरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे .....

ही 50 लाखाची अतिरिक्त तरतूद पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करावी लागली. पंढरपूर यात्रेसंबंधी ही पुरवणी मागणी मांडली आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी मुंबईच्या विकासाच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आहेत. मी अभिमानाने सांगतो की, मुंबईच्या विकासासाठी राज्य व केंद्र सरकार पुरस्कृत अत्यंत चांगल्या प्रकारच्या योजना आखण्यात आलेल्या आहेत. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान, एम.यु.टी.पी., एम.यु.आय.पी. अशा विविध योजनांच्या माध्यमातून विकासाची कामे सुरु आहेत. सन्माननीय सदस्यांनी मुंबई येथील एस.व्ही. रोडच्या कामासंबंधी तसेच वाहतूक, पाणीपुरवठा, रस्ते यासंबंधी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. या सर्व योजनांसाठी पुढील काही वर्षामध्ये मोठा निधी उपलब्ध होणार असून मुंबईचा चेहरामोहरा बदलणार आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान या योजनेअंतर्गत केंद्र सरकारने काही अटी घातल्यामुळे योजना राबविण्यास अडचणी निर्माण होतील. उदा.अर्बन लँड सिलींग ॲक्ट रद्द करण्याची अट घालण्यात आली आहे. जोपर्यंत टॅक्सेशन सिस्टीम व अर्बन लँड सिलींग ॲक्टमध्ये बदल करत नाही, तोपर्यंत अडचणी निर्माण होतील. याबाबत शासनाने काही विचार केला आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत तरतूद केलेल्या रकमेचा पहिला हप्ता मिळाला आहे. दुसरे असे की, अर्बन लँड सिलींगचा कायदा रद्द करण्यासाठी कालावधी दिलेला आहे. येत्या तीन वर्षात शासन टप्प्याटप्प्याने कायदा रद्द करणार आहे. ही बाब केंद्र सरकारलाही मान्य आहे. त्या अनुषंगाने राज्य सरकारच्या वतीने पावले उचलली जात आहेत.

सभापती महोदय, विदर्भातील अविकसित असलेल्या गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयासाठी नगरपरिषदेच्या ज्या योजना आहेत त्यांच्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी श्री.जैनुदीन जवेरी यांनी केली आहे, त्यांची ही मागणी स्वागतार्ह असून तिचा निश्चित विचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.राजेश टोपे.....

श्री.मधुकर सरपोतदार यांनी माननीय राज्यपालांवरील खर्चाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. माननीय राज्यपालांचे दौरे, वैद्यकीय खर्च इत्यादी जास्त झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्यपालांवरील खर्च हा "व्होटेड" नसतो तर "बायडींग" असतो. हा खर्च जास्त प्रमाणात झाल्यामुळे अतिरिक्त रकमेची मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मंत्रिमंडळ सदस्यांच्या शपथविधी समारंभाकरिता आझाद मैदान मुंबई येथे करण्यात आलेल्या मंडप व बैठक व्यवस्थेची देयके आता पुरक मागणीद्वारे अदा करण्यात येत असल्याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. 2005-2006 या वित्तीय वर्षात वित्त विभागाची मान्यता घेण्यात आली परंतु निधी अभावी त्या वित्तीय वर्षात खर्च भागविता आला नाही. याकरिता 2006-07 या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. वैधानिक दृष्टीकोनातून हा खर्च सभागृहासमोर दाखवावा लागतो. वित्त विभागाने नंतर मंजुरी दिलेली आहे. हा प्रश्न शासनाच्या राजशिष्टाचार विभागाशी संबंधित आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 33 लाख रुपये देयकाची मागणी कॉन्ट्रक्टरने तीन वर्षे का केली नाही ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे देयक काढण्यास अधिकाऱ्यांनी उशीर लावला, त्यामुळे आता कॉन्ट्रक्टरची रक्कम वाढली आहे. हे देयक काढण्याची जबाबदारी कोणावर होती ?

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.राणा जगजितसिंह पाटील (राजशिष्टाचार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मंत्रिमंडळ सदस्यांच्या शपथविधी समारंभाकरिता आझाद मैदान मुंबई येथे करण्यात आलेल्या मंडप व बैठक व्यवस्थेचे बील 33 लाख 42 हजार 656 थकीत आहे, ही पुरक मागणी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे. मंत्रिमंडळाचा शपथविधी दिनांक 9.11.2004 रोजी संपन्न झाला आहे. 2005-2006 या वित्तीय वर्षात वित्त विभागाची मान्यता घेण्यात आली तथापि निधीअभावी हा खर्च त्या वित्तीय वर्षात देण्यात आलेला नाही. 2006-07 वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पिय तरतूदीमधून हा खर्च भागविणे आवश्यक होते. व्हाईट बुकमधून प्रोव्हीजनही केलेली आहे, पण रक्कम देता आली नाही. याबाबत वित्त विभागास पुरवणी विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात आली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या निमित्ताने मी एकच प्रश्न माननीय राज्यमंत्र्यांना विचारू इच्छितो की, या मागणीवर वित्त विभागाचे काही शेरे होते काय ? इतका काळ हे देणे प्रलंबित राहिले होते म्हणून मी हे विचारतो आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, केवळ निधीअभावी ही रक्कम तेव्हा देण्यात आलेली नाही. मात्र सन्माननीय सदस्यांना जी माहिती या पूरक मागणी संबंधात पाहिजे आहे ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल एवढेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा राजशिष्टाचार विभागाचा विषय होता त्यामुळे संबंधित राज्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केलेला आहे. हा विभाग सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असल्यामुळेच त्याबाबत सुरूवातीस मी माहिती दिली. मात्र अधिक खुलासा संबंधित राज्यमंत्र्यांनी केलेला असल्याने त्याबाबत मी अधिक काही सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. मात्र यामध्ये चूक ही काही अंशी झालेली आहे हे मी मान्य करतो. त्याचवेळेस खरे म्हणजे हे व्हायला पाहिजे होते परंतु वेळेमध्ये निधी उपलब्ध न झाल्यानेच हे प्रलंबित राहिले होते इतकाच याबाबत खुलासा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, यामागील खरे कारण मी सांगू इच्छितो आणि ते म्हणजे आतापर्यंत मंत्रिमंडळामध्ये वाढ झालेली नाही आणि त्यामुळे नवीन मंत्र्यांचा शपथविधी वगैरे कार्यक्रम होऊ न शकल्याने हे देणे राहू गेले इतकेच.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग तसेच नगरविकास विभागाच्या पूरक मागण्यांसंबंधात मी खुलासा केलेला आहे. तरी सभागृहाने या पूरक मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी येथे मुंबईच्या मलनिस्सारणाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत राज्यमंत्र्यांनी काहीही सांगितलेले नाही. खरे तर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कौतुकाने याबाबत उल्लेख केला गेलेला आहे तसेच अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये देखील याबाबत सांगितले आहे. केंद्र सरकारने या योजनेस मंजुरी दिली आहे तर मग केंद्र सरकारचे, राज्य सरकारचे आणि मुंबई महानगरपालिकेचे यामध्ये किती पैसे खर्च होणार आहेत हे तरी आपण येथे सांगावे. यासाठीचा सर्व खर्च कोण करणार आहे ? मुंबईतील मलनिस्सारण योजनेसाठी राज्य सरकार किती खर्च करणार आहे ?

..... 3के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, निश्चितपणे बजेटवरील भाषणामध्ये मी याबाबतची माहिती सविस्तर देईन इतकेच मी या प्रसंगी सांगतो.

****

..... 3के 3 ...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्रमांक 125, 126 यावर या ठिकाणी कोणीही चर्चा केलेली नाही, तरी या विभागाच्या पूरक मागण्यांना आपण मान्यता द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो. तसेच ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 69, 70, 71, 72, 73, 74, 75, 76 व 77 या पूरक मागण्यांनाही सभागृहाने मान्यता द्यावी अशी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता या ठिकाणी वित्त राज्यमंत्री उपस्थित आहेत आणि ते वित्त विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देणार आहेत. तेव्हा या निमित्ताने मी त्यांना एक विनंती करू इच्छितो. स्थानिक विकास निधी म्हणून आपण आमदारांना जो निधी देता त्यामध्ये वाढ करावी. कमीत कमी 2 कोटी रूपये इतका निधी सगळ्या आमदारांना उपलब्ध करून द्यावा अशी मी सर्वांच्या वतीने एकमुखी मागणी करता आहे, त्या मागणीला वित्त मंत्र्यांनी होकार द्यावा अशी विनंती आहे.

***

..... 3के 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा - कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून, लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता तसेच वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 55, 56 यावर कोणीही सन्माननीय सदस्य बोलले नाहीत. तेव्हा मी आपल्याला विनंती करतो की, जलसंपदा विभागाच्या पूरक मागण्या आपण मान्य कराव्यात.

सभापती महोदय, वित्त विभागाच्या बाब क्रमांक 40, 41, 42 याबाबत सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी काही मुलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. रोजगार हमी योजनेचे वार्षिक नियोजन आपण करीत नाही का ? असा एक प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. या ठिकाणी या योजनेसाठी 192 कोटीचा जो जास्त निधी दिला जात आहे त्यासंबंधात त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, वर्षभरामध्ये किती मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर येणार आहेत याचा अंदाज वर्षाच्या सुरूवातीसच घेऊ शकत नाही. एखाद्या भागामध्ये दुष्काळ पडला तर अपेक्षेपेक्षा जास्त मजूर तेथील रोजगार हमी योजनेच्या कामावर येतात आणि मग तेथे आपण जे नियोजन केलेले आहेत, जो अंदाजित खर्च अपेक्षिलेला असतो त्यापेक्ष जास्त निधी खर्च करावा लागतो. त्यामुळेच 2004-05 मध्ये 1256 कोटी रूपये, 2005-06 मध्ये 995 कोटी रूपये आपण रोजगार हमी योजनेमध्ये खर्च केलला आहे. वर्षाच्या सुरूतीला वर्षभरामध्ये किती मजूर कामावर येतील याचा अंदाज आपण यासाठी घेऊ शकत नाही की, आपण कोणालाही रोजगार नाकारू शकत नाही. त्यामुळे जे जे लोक आपल्याकडे रोजगार मागतात त्या सगळ्यांना रोजगार आपण देतो आणि अशी सर्व परिस्थिती असल्याने या वर्षी 192 कोटी रूपये इतका जास्त खर्च झालेला आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 3एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, रोजगार हमी योजनेकरिता आपण निधी उभा करण्यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांच्या पगारामधून पैसे कापून घेता. अशाप्रकारे महाराष्ट्रामध्ये दरवर्षी किती निधी जमा होतो आणि त्यामधून शासनाला किती खर्च करावा लागतो? याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी संपूर्ण माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सन 2003-04 मध्ये व्यवसाय कराच्या माध्यमातून 1018 कोटी, 2004-05 मध्ये 1084 कोटी, 2005-06 मध्ये 1150 कोटी रुपये जमा झाले आहेत तेवढे पैसे रोजगार हमी योजनेवर खर्च केले आहेत. सभापती महोदय, निवृत्ती वेतनाकरिता 504 कोटी रुपयांची मागणी कां करण्यात आली ? असे विचारण्यात आले आहे. दरवर्षी जवळ जवळ 3390 कोटी रुपये निवृत्ती वेतनाकरिता खर्च करावे लागतात. जसजसे कर्मचारी निवृत्त होत असतात त्याप्रमाणे पोस्ट रिटायरमेंट बेनिफिट म्हणून हा खर्च वाढत असतो. यावर्षी जास्तीत जास्त लोकांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्यामुळे अचानक 504 कोटींचा बोजा शासनावर पडला आहे. त्याचप्रमाणे विमा धारकांकरिता जवळ जवळ 12 कोटी 58 लाख रुपये कसे खर्च झाले? असे विचारण्यात आले आहे. त्या संदर्भात सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे कळंबोली येथे वेअरहाऊस आहेत. दिनांक 19.2.2005 रोजी तेथील दोन बॉंडेड वेअर हाऊसना आग लागली. वेअर हाऊस वापरीत असलेल्या व्यक्तिनी आगीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल 60 ते 65 कोटींचा क्लेम शासनाकडे केला होता. परंतु असोसिएटेड सर्व्हेज यांचेमार्फत त्या आगीमुळे झालेल्या नुकसानीचा सर्व्हे करण्यात आला असता 65 कोटींवरुन 35 कोटींपर्यंत नुकसानीचा अंदाज व्यक्त करण्यात आला. त्या प्रकरणामध्ये विमाधारकामार्फत द्यावयाच्या भरपाईकरिता ही रक्कम प्रस्तावित करण्यात आली. अशाप्रकारची घटना पहिल्यांदा घडली असल्यामुळे त्याकरिता याठिक्राणी तरतूद करण्यात आली आहे. तेव्हा वित्त विभागाच्या पूरक मागणी क्रमांक 40, 41 व 42 या तीन मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

त्याचप्रमाणे ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 61 संदर्भात कुणीही माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त केले नाही. या मागणीला देखील सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो. त्याचप्रमाणे नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 83, 84 व 85 च्या संदर्भात माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी डी.पी.डी.सी. च्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्यांनी अशी सूचना केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख...

की, 71 व्या घटना दुरुस्तीनंतर सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले असल्यामुळे डी.पी.डी.सी. मध्ये महानगरपालिका, जिल्हा परिषदांचे सुध्दा प्रतिनिधीत्व असावे. आपणास माहीत आहे की, नगरपालिका, महानगरपालिका व त्यानंतर जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका लागोपाठ झाल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे 71 व्या घटना दुरुस्तीप्रमाणे शासन यासंबंधी योग्य तो निर्णय घेईल. तेव्हा नियोजन विभागाच्या क्रमांक 83, 84 व 85 या पूरक मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी स्थानिक विकास निधीमध्ये वाढ करण्यासंबंधी सूचना केली. या संदर्भात विधानसभेमध्ये मुद्दा उपस्थित करण्यात आला त्यावेळी माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील साहेबांनी अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देतांना त्या संदर्भात स्पष्टीकरण करण्यात येईल असे सांगितले आहे. कारण कालच आपले बजेट हे 510 कोटीच्या पुढे गेले आहे, त्यामुळे याबाबत निर्णय घेतल्यास शासनावर किती भार पडेल याचा अभ्यास करावा लागेल. त्यापूर्वी हा विषय मंत्रिमंडळासमोर मांडला जाईल. मंत्रिमंडळाची त्याला मान्यता मिळाल्यानंतर माननीय अर्थमंत्री सभागृहामध्ये अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देतांना त्या संदर्भातील शासनाचा निर्णय जाहीर करतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयाचे उत्तर आले नाही. बी.ई.एस.टी. च्या तिकिटावर कुपोषित आदिवासी बालकांच्या विकासाकरिता 15 पैसे अधिभार घेतला जातो. यापूर्वी बांगला देशाचे युध्द झाले म्हणून अधिभार घेतला जात होता, ते युध्द संपून अनेक वर्षे झाली...

श्री. मधुकर चव्हाण : 1970 सालापासून तो अधिभार घेत आहेत...

श्री. दिवाकर रावते : अशाप्रकारे बी.ई.एस.टी. व एस.टी. च्या तिकिटामधून जमा केला जाणारा अधिभार हा कुपोषित बालकांसाठी घेतला जात असेल तर त्याचे उत्तर आले नाही. हा अधिभार किती वर्षापासून घेतला जात आहे, आणि तो किती जमा झाला आहे? याची माहिती आता आपणाकडे उपलब्ध नसेल तर ती सभागृहाच्या पटलावर ठेवली पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशोधित मत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : माननीय सदस्यांच्या सूचनेला अनुसरून मी असा मुद्दा मांडतो की, शासनाच्या आदेशाप्रमाणे प्राथमिक शाळांकरिता दोन टक्के असेसमेंट सेस घेतला जातो. त्याचा बजेटमध्ये कोठेही उल्लेख नसतो. तो सेस करोडो रुपये जमा होता. या संबंधाने खुलासा व्हावा.

डॉ.सुनील देशमुख : या दोन्ही गोष्टींची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या बाब क्रमांक 93,94,95 वरील चर्चेत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, डॉ.अझिज यांनी भाग घेतला. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी राज्यातील आयुर्वेदिक, समचिकित्सा (होमिओपॅथी) व युनानी महाविद्यालये, व संस्थांच्या संबंधात मुद्दा उपस्थित केला. ही भारत सरकारची योजना आहे. भारत सरकारने या योजनेसाठी तरतूद केली त्या प्रमाणात राज्यानेही तरतूद केलेली आहे. एकूण 59 संस्थांना आपण पैसे दिलेले आहेत. त्यापैकी 6 संस्थांचे इंटरर्नल ऑडीट व्हावयाचे आहे, बाकीच्या संस्थांचे ऑडीट झालेले आहे. या संस्थांची माहिती घेण्याच्या सबंधात सभागृहातील सन्माननीय सदस्यांची समिती नेमावयाची असेल ती नेमता येईल.

डॉ.दीपक सावंत : आमदारांची समिती नेमण्याबाबतचा माझा बोलण्याचा उद्देश नाही तर राज्य शासनाची समिती नेमून यासंबंधाने सर्व्हे करावा, असे माझे म्हणणे आहे. केंद्र सरकारकडून करोडो रुपये मिळत असतील तर त्या पैशाचा वापर त्या संस्थांकडून झाला किंवा नाही ? त्या अनुदानातून त्यांनी इन्फ्रास्ट्रक्च्चरल डेव्हलपमेंट केली की नाही ? याची त्यांनी पहाणी करावी.

श्री.सुरेश शेट्टी : आमच्या विभागामार्फत नेमून सहा महिन्याच्या आत सगळया संस्थांना भेटी देऊन त्यासंबंधीचा अहवाल सादर करण्यासंबंधातील कार्यवाही करण्यात येईल.

त्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.अझिज यांनी युनानी डॉक्टरांची नियुक्ती जिल्हापरिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये, मेडिकल कॉलेजेसमध्ये करण्याबाबतची सूचना केली. या संबंधीचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठवू.

त्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 114, 115, 116, 117, 118, 119, 120, 121, 122 आणिस 123 यावर चर्चा करताना सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपले विचार मांडले. सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार साहेबांनी सोलापूरची जमीन तंत्रशिक्षणासाठी ॲक्वायर केल्याबाबतचा उल्लेख केला. या संबंधाने पूर्ण चौकशी करतो आहोत.

श्री.मधुकर सरपोतदार : कोर्टाने आदेश देऊनही पैसेच भरलेले नाहीत.

श्री.सुरेश शेट्टी : याबाबतची चौकशी करावी लागेल. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर यासंबंधीचे निवेदन करण्यात येईल. सभागृहाला विनंती आहे की, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मागण्यांना संमती द्यावी.

-- (3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.बाबा सिध्दीकी (कामगार राज्यमंत्री) सभापती महोदय, कामगार विभागाच्या बाब क्रमांक 64 मध्ये 45 हजार रुपयाची पूरक मागणी केलेली आहे, सभागृहाने त्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

4...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम व आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, राज्य उत्पादन शुल्क विभागाची बाब क्रमांक 13,14, आणि पर्यावरण विभागाची बाब क्रमांक 107, 108 सभागृहाने मान्य करावी, अशी सभागृहाला विनंती करतो. तसेच आदिवासी विभागाची बाब क्रमांक 96 ते 106 या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाची बाब क्रमांक 86,87,88,89,90 सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रीतमकुमार शेगांवकर .....

त्याचबरोबर बाब क्रमांक 15 बाबत सांगू इच्छितो की, जल आलेखण, संरक्षण, परीक्षण व बंदरावरील प्रवासी सुखसोयींसाठी बाब अर्थसंकल्पित करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. वरील सर्व मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही आदिवासी मुलांना दिल्या जाणाऱ्या सरबताबाबत विचारणा केली होती. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी काहीही उत्तर दिलेले नाही.

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : ज्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी आदिवासी विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी विनंती केली त्यावेळी आपण काही विचारले नाही त्यामुळे संबंधित माननीय मंत्रिमहोदय खाली बसले. मी नंतर आपल्याला प्रश्न एक विचारण्याची संधी देतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार, पणन व वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्रमांक 109, 110, 111, 112, 113 या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार राज्यमंत्री) : सभापती महोदय, राजशिष्टाचार विभागाच्या बाब क्रमांक 3 व 4 तसेच उद्योग विभगाच्या बाब क्रमांक 62, 63, 65 आणि 68 तसेच सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 79 या सर्व पूरक मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, कुपोषणासारखा विषय माननीय मंत्रिमहोदयांनी इतक्या लाईटली घेणे चुकीचे आहे. राज्यामध्ये एवढे कुपोषण असताना आणि 12 कोटी रुपयांची तरतूद असताना त्यावर असे मौन बाळगणे चुकीचे आहे. यामध्ये काही तरी घोळ आहे असे वाटते. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर का दिले नाही ? आम्ही प्रश्न विचारण्याची त्यांनी वाट का पहावी ? यासंदर्भात या ठिकाणी दोनपेक्षा जास्त सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला. आदिवासींच्या बाबतीत असे धोरण अवलंबिण्यात येत असेल तर ते चुकीचे आहे. मी या ठिकाणी माननीय मंत्री डॉ. विजयकुमार गावित साहेबांना विचारले की, आपण स्वत: डॉक्टर आहात. 12 कोटी रुपयांची कोणती औषधे घेतली, कोणते सरबत घेतले हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगणे क्रमप्राप्त होते. ते सुसंस्कृत आहेत, शिक्षित आहेत तसेच डॉक्टर आहेत. त्यांच्याकडून मी उत्तराची अपेक्षा केली होती. ते स्वत: त्या भागामध्ये काम करीत आहेत. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत खुलासा करावा.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी आदिवासी विकास विभागाच्या पूरक मागण्या मंजूर कराव्या अशी विनंती आधीच केलेली आहे. मी सुसंस्कृत आहे असे सन्माननीय सदस्य म्हणाले. मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, हे सर्व आम्ही व्यवस्थित नियोजन करुन करीत आहोत. आदिवासी विकास विभाग हे फक्त निधी उपलब्ध करुन देणारे खाते आहे. ज्या ज्या खात्याकडून मागणी येते त्याबाबतीत ती गोष्ट तांत्रिकदृष्ट्या बरोबर आहे हे ठरविणारे ते असतात. मी डॉक्टर आहे म्हणून मला यातील माहिती आहे. परंतु आम्ही त्या त्या खात्याला त्यांच्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देतो. मी डॉक्टर असलो तरी जोपर्यंत त्या त्या खात्याकडून मागणी येत नाही तोपर्यंत आम्ही स्वत:हून काहीच करीत नाही. फक्त आदिवासी विकास विभागाच्या ज्या आश्रमशाळा आहेत त्यांना औषधे किंवा जो काही पुरवठा करावयाचा असेल तो पुरवठा डायरेक्टली आदिवासी विकास विभाग करते. बाकीच्या सर्व विभागांच्या बाबतीत जोपर्यंत तांत्रिकदृष्ट्या त्यांच्याकडून मंजुरी देत नाही तोपर्यंत आम्ही एक नया पैसाही देत नाही.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : हे 12 कोटी रुपये कोणत्या खात्याकडे गेले हे सांगावे म्हणजे आम्ही त्या खात्याला प्रश्न विचारु.

डॉ. विजयकुमार गावित : यामध्ये शुगर, माल्ट एक्स्ट्रॅक्ट आहे. त्याचबरोबर व्हिटॅमिन ए आणि डी आहे. आरोग्य विभागाने महिला व बालकल्याण विभागाला पत्र लिहिले की, अशा अशा पध्दतीचे लिक्विड प्रोटीन्स, माल्ट एक्स्ट्रॅक्ट हे कुपोषणासाठी डायजेस्टीव आणि शक्तीवर्धक आहे. म्हणून आय.सी.डी.एस.ने आमच्याकडे मागणी केली. आरोग्य खात्याने कुपोषणाच्या बाबतीत असे सुचविले म्हणून त्यांनी सर्व कागदपत्रांसह आमच्याकडे प्रस्ताव सादर केला. यामध्ये कुपोषणासारखा प्रश्न आहे. त्यांनी निधी मागितला तर आरोग्य विभागाला तसेच सर्व विभागांना निधी उपलब्ध करुन देतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. विजयकुमार गावित ...)

आदिवासी विकास विभागाकडे निधी मागितला आणि तो आदिवासी विकास विभागाने उपलब्ध करुन दिला नाही असे कधीही घडले नाही...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही असा प्रश्न उपस्थित केला की, हे जे 12 कोटी रुपये सरबतावर खर्च केले आहेत ते सरबत खरोखरच आदिवासी मुलांच्या पोटात गेले की ते दुसरीकडे कोठे वापरले गेले ? अशा प्रकारच्या अनेक गोष्टी आदिवासींच्या नावावर घेतल्या जातात आणि प्रत्यक्षात आदिवासींना त्याचा फायदा होत नाही. आदिवासी कुपोषणाने मरतात. या सरबताची मागणी कोणत्या विभागाने केली ? कशा प्रकारे त्या सरबताचा वापर केला गेला ? याची माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

डॉ. विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते पूर्वी घडत असेल. आता सन्माननीय सदस्यांनी इंटेरिअर भागामध्ये जाऊन पहावे. कुपोषणाचे दरहजारी प्रमाण खाली आलेले आहे. परंतु हे प्रमाण जेवढे खाली यावयास पाहिजे तेवढे ते आलेले नाही. हे प्रमाण खाली आणण्यात शासन प्रयत्नशील असून त्यामध्ये शासनाला यश मिळत आहे. परंतु जो पर्यन्त आदिवासींचे स्थलांतर थांबत नाही तोपर्यन्त हे कुपोषणाचे प्रमाण खाली येणार नाही. स्थलांतर होतांना मुलांना झोळीत टाकल्यानंतर त्यांना सात-आठ तास फिडिंग होत नाही आणि त्यामुळे कुपोषणाचा प्रश्न निर्माण होतो. सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले की, आदिवासी विभागाने पैसे दिले, परंतु ते कोणाला मिळाले नाहीत. असे कधी झालेले नाही. आता आदिवासी विभागाने कोठे कोठे निधी दिला आणि त्या निधीचा कशा प्रकारे वापर करण्यात आला याची माहिती घेण्यास सुरुवात केलेली असून ती माहिती आदिवासी विकास विभागाकडे यावयास लागली आहे. आता आदिवासी विकास विभागाने दिलेल्या निधीबाबत विचारणा होत असल्यामुळे यामधून चांगलेच घडत आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 12 कोटी रुपये दिल्यानंतर त्याचा फिडबॅक आमच्याकडे आलेला आहे. 6 कोटी रुपयांचा माल्ट विकत घेतल्याची माझी माहिती आहे. कुपोषित बालकांना माल्ट हे 1.5 च्या प्रमाणातच दिले गेले पाहिजे. हे माल्ट जरा जरी जास्त प्रमाणात दिले गेले तर जुलाब होतात. माल्ट हे प्रमाणातच द्यावे लागते. तेव्हा माझा प्रश्न

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असा आहे की, 12 कोटीचा नियतव्यय कशा प्रकारे झाला आहे ? कोणत्या विभागाला हा निधी दिलेला आहे ? यासंबंधीची माहिती पटलावर ठेवावी.

डॉ. विजयकुमार गावित : निधी वितरित झाल्यानंतर हा निधी कोणा-कोणाला कशा प्रकारे दिला यासंबंधीची माहिती घ्यावी असे त्या फाईलवर लिहिलेले आहे....(अडथळा)...ही माहिती प्राप्त झाल्यानंतर ती पटलावर ठेवण्यात येईल . ही माहिती पटलावर ठेवण्यामध्ये गैर काही नाही.

डॉ. दीपक सावंत : अधिवेशन संपण्यापूर्वी ही माहिती पटलावर ठेवली गेली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरातून अतिशय गंभीर बाब सभागृहासमोर आलेली आहे. आदिवासी विकास काय करायला लागला आहे हे सांगता सांगता त्यांनी मोठे सत्य सांगितले. मागे दिलेल्या निधीबाबत कोणाला जाब विचारण्यात आला नाही. हा जाब विचारण्यास मी सुरुवात केली. केन्द्र सरकारने कायदा केल्यानंतर आदिवासींसाठी 9 टक्के बजेट प्रोव्हिजन केली जाते. मागील 5 वर्षामध्ये हा 9 टक्क्याचा निधी कशा प्रकारे खर्च करण्यात आला याची माहिती पटलावर ठेवली जाईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. हा अतिशय गंभीर विषय आहे. ऑडिटच्या वेळी ही बाब तपासता येईल. 9 टक्के निधीचा विनियोग कोणत्या पध्दतीने कोणकोणत्या खात्या मार्फत करण्यात आला यासंबंधीची मागील 5 वर्षाची माहिती सन्माननीय मंत्री महोदयांनी पटलावर ठेवावी.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / परिपत्रकासाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आणि 12 कोटी रुपयांच्या पुरवणी मागणीच्या संदर्भातील तपशील देखील पटलावर ठेवला जावा.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : मागील 5 वर्षाचा तपशील देण्याची आवश्यकता नाही. परंतु आजच्या पुरवणी मागण्यांमधील आदिवासी विकास विभागाच्या 12 कोटी रुपयाच्या पुरवणी मागणीच्या संदर्भातील अहवाल पटलावर ठेवण्याचे मंत्रीमहोदयांनी मान्य केले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मागील 5 वर्षाचा तपशील पटलावर ठेवण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे.

तालिका सभापती : त्याचे स्वरुप खूप मोठे होईल.

श्री.दिवाकर रावते : मोठे झाले तरी त्यात काय अडचण आहे? आदिवासी विकास विभागामध्ये तीन आयुक्त कार्यरत आहेत. मोठ्या प्रमाणात कर्मचारीवर्ग उपलब्ध आहे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी दुरुस्ती करु इच्छितो. आदिवासी विकास विभागामध्ये एकच आयुक्त आहेत.

डॉ.दीपक सावंत : श्री.रमणी हे कोणत्या विभागाचे आयुक्त आहेत?

डॉ.विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना माहिती नसावी. श्री.रमणी हे आदिवासी विकास विभागांतर्गत आयुक्त नसून त्यांच्याकडे जिजामाता बाल संगोपन योजनेची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

तालिका सभापती : आजच्या पुरवणी मागण्यांमधील आदिवासी विकास विभागाशी संबंधित रु.12 कोटीच्या पुरवणी मागणीच्या खर्चासंबंधीचा अहवाल मंत्रीमहोदयांनी पटलावर ठेवण्याचे मान्य केले आहे. सन 2006-07 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)3P.2

SGB/ KGS/ KTG/ 18:05

पृ.शी.: राज्यात उत्पादित झालेल्या अतिरिक्त ऊसाच्या गाळपासंबंधी.

मु.शी.: राज्यात उत्पादित झालेल्या अतिरिक्त ऊसाच्या गाळपासंबंधी

माननीय सहकार राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जो ऊस उभा आहे त्याचे गाळप कसे आणि कधी होणार आहे, किती कारखाने किती दिवस ऊसाचे गाळप करणार आहेत याची कोणतीही माहिती माननीय सहकार मंत्र्यांच्या निवेदनावरुन स्पष्ट होत नाही. मराठवाडयातील 35 लाख टन ऊसाचे गाळप कधी होणार आहे, कसे होणार आहे? याची काहीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांच्या निवेदनात नाही. तसेच या ऊसाच्या गाळपाचे नियोजन कसे केले जाणार आहे, ऊस पिकविणा-या शेतक-यांना कसे अनुदान दिले जाणार आहे याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांच्या निवेदनात दिसून येत नाही. माननीय राज्यपाल महोदयांनी जे अभिभाषण केले होते तेच अभिभाषण माननीय मंत्रीमहोदयांनी रेकॉर्डवर आणलेले आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी ऊसाच्या संदर्भात जे मुद्दे उपस्थित केले होते तेच मुद्दे माननीय मंत्रीमहोदयांनी वाचून दाखविलेले आहेत. ऊस पिकविणा-या दोन शेतक-यांनी मध्यंतरी आत्महत्या केल्यामुळे या पुढे अशा आत्महत्या होणार नाहीत असे माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या निवेदनात या ठिकाणी सांगितलेले आहे. ऊस पिकविणा-या शेतक-यांना शासनाने दिलासा द्यावयास पाहिजे होता परंतु कोणत्याही प्रकारचा दिलासा शासनाने शेतक-यांना दिलेला नाही. कापूस पिकविणा-या शेतक-यांचे ज्या प्रमाणे हाल चालू आहेत तसेच हाल ऊस पिकविणा-या शेतक-यांचे होणार आहेत असे दिसते. उभ्या असलेल्या ऊसाचे गाळप झाले नाही तर शेतक-याला किती व कसे अनुदान दिले जाणार आहे, ऊस पिकविणा-या शेतक-यांच्या आत्महत्या होणार नाहीत यासाठी शासनाने ठोस असे निवेदन करावयास पाहिजे होते परंतु शासनाकडून ऊस पिकविणा-या शेतक-यांना कोणत्याही प्रकारचे आश्वासन मिळालेले नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

या गोष्टीचा मी खेद व्यक्त करतो. राज्यात यापुढे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत याबाबत मंत्रिमहोदय छातीठोकपणे सांगतील काय ?

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, निवेदनावर प्रश्नोत्तरे होत नाहीत.

श्री.पाशा पटेल : आज सकाळी सभागृहात औचित्याच्या मुद्याद्वारे अतिरिक्त ऊसा संबंधी प्रश्न उपस्थित झाला होता. त्या संदर्भात निवेदन करण्याबाबतचे निदेश देण्यात आले होते. मंत्रिमहोदयांनी निवेदनात ऊसाला जास्त भाव देऊ वगैरे सांगितले, परंतु त्यांनी मूळ प्रश्नाला बगल दिलेली आहे. मूळ प्रश्न तसाच शिल्लक राहिलेला आहे. कारखान्यांना कोणकोणत्या सोयीसुविधा देणार आहोत हे मंत्रिमहोदयांनी सांगितले. सभापती महोदय, ऊसाचे गाळप मे महिन्याच्या शेवटपर्यंत चालले तरी कारखान्यांच्या क्षेत्रातील सभासदांचे ऊस संपणार नाहीत. तालुक्यातील सभासदांचा ऊस संपणार नाही. निर्यातीवरील बंदी उठविली गेली, परंतु साखरेचा 30 लाख टन बफर स्टॉक केला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत असे सांगण्यात आले. परंतु मी सांगू इच्छितो की, चाटेपिंपळगाव येथील एका शेतकऱ्यांचा निम्मा ऊस घेतला आणि निम्मा ऊस घेतला नाही म्हणून त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. दोन शेतकऱ्यांनी जाळून घेतले. अतिरिक्त ऊसाच्या संदर्भात शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, या संदर्भात सकाळी सभागृहात प्रश्न उपस्थित झाला होता. शिंदेटाकळी येथील एका शेतकऱ्याने त्याचा ऊस घेतला नाही म्हणून त्याने आत्महदन करीत असल्याचे सांगितले. तेव्हा त्या शेतकऱ्याच्या ऊसाच्या फडाला पोलिसांनी वेढा दिलेला आहे. आज महाराष्ट्रातील किती कारखान्यांमध्ये गाळपाचे काम संपलेले आहे ? किती बैलगाड्यांची मोजणी झाली आहे ? किती ट्रक्स रिक्विझीशनने ताब्यात घेतलेले आहेत ? किती साखर कारखान्यांशी चर्चा केलेली आहे ? याची उत्तरे मंत्रिमहोदयांकडून मिळालेली नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला फक्त एका गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे. आज महाराष्ट्रात ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणावर आलेले आहे. त्याचे गाळप होईल की नाही असा शेतकऱ्यांसमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. नेमके या प्रश्नाच्या उत्तराला बगल देण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांमध्ये ऊस गाळप होईल अशाप्रकारचे ठोस आश्वासन मंत्रिमहोदय देतील काय ? नसेल तर या गोष्टीचा निषेध करुन आम्ही बहिर्गमन करणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याच प्रश्नाच्या संदर्भात लातूर जिल्ह्यातील उद्‌गीर येथील आमदार श्री.चंद्रशेखर भोसले हे सकाळी उपोषणास बसले होते. सन्माननीय सदस्य श्री.भोसले हे त्यांच्याच पक्षाचे सदस्य आहेत. मंत्रिमहोदय निवेदनात असत्य माहिती देत आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर हा अन्याय आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे यावर्षी पर्जन्यवृष्टी चांगली झाली त्यामुळे ऊसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले. गेल्या वर्षी 22 साखर कारखाने बंद होते. या कारखान्याकडे करेक्ट नोंदी नाहीत. साखर कारखाने ऊस संपवितो असे सांगत होते. परंतु प्रत्यक्षात 1 लाख टन, 75 हजार टन ऊस शिल्लक राहत होता. गेल्या वर्षी बंद असलेले 22 साखर कारखाने सुरु केले आहेत. 180 दिवस किंवा त्यापुढे 7 जूनपर्यंत कारखाना सुरु ठेवण्याचा प्रयत्न करणार आहोत. शेतात उभे पीक राहिले तरीसुध्दा नुकसान भरपाई देण्यात येईल. या पूर्वी सुध्दा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत केलेली आहे.

यानंतर श्री. पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

<u>अशासकीय कामकाज--ठराव</u>

पृ.शी.: ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्हयांत सागरी किनार-पट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीबाबत

मु.शी.: ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्हयांत सागरी किनार-पट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीबाबत या विषयावरील श्रीमती मंदा म्हात्रे यांचा ठराव.

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते :-

"राज्यातील विशेषत: ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्हयांत सागरी किनारपट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीपासून वाचविण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमून सागरी अतिक्रमण बचावासाठी एक मास्टर प्लॅन तयार करुन त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, आपल्याला माहीतच आहे की, गेल्या वर्षी आलेल्या महापुरामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांचेच नव्हेतर सर्वसामान्य लोकांचेही फार मोठे नुकसान होऊन फार मोठी हानी झालेली आहे, ती कधीही न भरुन येणारी आहे. विशेषत: कोकणातील ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्हयांतील लागवडी खालील जी समुद्रालगतची जमीन आहे, तिचे फार मोठे नुकसान झाल्यामुळे तेथील शेतकरी हवालदिल झाले. कोकणाला 720 किलो मीटरचा सागरी किनारा लाभलेला आहे.

सभापती महोदय, खारजमीन विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन 1949 पासून शासकीय स्तरावर समिती स्थापन करुन विविध खारजमीन योजना

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.....

राबविल्या होत्या. पूर्वी ए.टी.पाटील कमिटी तसेच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, श्री.अ.र.अंतुले यांनी नेमलेल्या बेलोसे कमिटीने त्या त्यावेळी सर्वत्र कोकण खारभूमी किनारपट्टीचा दौरा करुन येथील परिस्थितीचा अभ्यास केला व संपूर्ण किनारपट्टीवरील खारभूमी क्षेत्र शासनाच्या सहकार्याने कसे विकसित करता येईल आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटून या किनारपट्टीवरील महत्वाचा भातशेती व अन्य बागायती, मत्स्यशेती, मिठाच्या शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे जीवन कसे सुखकर होईल या अनुषंगाने वास्तववादी योजना तयार करुन त्याचा अहवाल शासनाकडे सादर केला होता. या योजनेमध्ये कोकण किनारपट्टीवरील खारभूमी क्षेत्र संरक्षित करण्यासाठी अनेक योजना समाविष्ट करण्यात आल्या होत्या. या योजना राबविण्यासाठी प्रथम शासनाने बोर्ड तयार केला. त्यानंतर या योजना अधिक तंत्रशुध्द पध्दतीने विकसित करण्यासाठी ठाणे, रायगडपासून संपूर्ण किनारपट्टीवर सहा विभागीय कार्यालये निर्माण केली व त्यास सहाय्यक म्हणून 30 उप विभागीय कार्यालये निर्माण केली. सर्वत्र तंत्रशुध्द योजना राबविण्यास सुरुवात केली. यावेळी युरोपियन आर्थिक समुदाय निधीतून पहिल्या टप्प्याची कामे चालू करण्यात आली. ईईसीकडून 50 टक्के महाराष्ट्र शासनाने 25 टक्के निधी उपलब्ध करुन दिला. यातून पहिल्या टप्प्यात सर्व्हे केलेल्या तातडीच्या योजना पूर्ण करण्यात आल्या. या योजना कार्यान्वित झाल्यामुळे कोकण किनारपट्टीवरील सर्वत्र शेतकऱ्यांना अधिकाधिक शेती व्यवसायात फायदा मिळू लागला. यामुळे ज्या शेतकऱ्यांचे अविकसित खारभूमी क्षेत्र होते त्यांच्याही आशा पल्लवित झाल्या व त्यांनी आपापल्या किनारपट्टीवर अशा प्रकारच्या योजना राबविण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या माध्यमाने शासनाकडे मागणी अर्ज पोहचविले. यात ठाणे, रायगड येथील शेतकरी अग्रेसर होते. कारण येथे खारभूमी क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच माजी मुख्यमंत्री अंतुले येथील स्थानिक असल्यामुळे त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे खारभूमी विकसित करण्यासाठी स्वतंत्र कमिटी करुन शेतकऱ्यांचा हा ज्वलंत प्रश्न मार्गी लावण्यासाठी खास असे लक्ष घातले होते व अनेक योजनाही कार्यान्वित केल्या होत्या, त्याचा लाभ येथील स्थानिक शेतकऱ्यांनी भरपूर उठविला आहे हे विकसित क्षेत्रावरुन दिसतच आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुद्धलिखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.....

परंतु, आजही अनेक योजना कोकणसह रायगड भागात प्रलंबित असतांना या किनारपट्टीवरील खारभूमी कार्यालयांना कुलपे तर लागत नाही ना ? याचा विचार आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, सन 1948-49 पासून मूलभूत खारभूमी संरक्षणासाठी प्रथम महाराष्ट्र शासनाने निर्माण केलेला कायदा व त्यातील विविध तरतूदी यांच्या आधारावर आजपर्यन्त विविध खारभूमी योजना प्रथम महाराष्ट्र शासनाने हिंदुस्थानच्या नकाशावर राबविल्या व देशाचा आर्थिक आधारस्तंभ असलेल्या शेतक-याला दिलासा दिला. हा आदर्श घेऊन या योजनांचा अभ्यास करुन नंतर कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्याच्या प्रशासकांनी बॉम्बे खारभूमी ॲक्ट व येथील विविध योजनांचा अभ्यास करुन तातडीने या अनुषंगाने आपआपल्या राज्यामध्ये अशा मोठया प्रमाणात योजना राबवून तेथील सर्वसामान्य शेतक-यांना दिलासा दिला आहे. जे लोक आपल्याकडे शिकून गेले त्या लोकांनी त्याचा फायदा घेतला पण महाराष्ट्र शासनाने काय केले ?

सभापती महोदय, कर्नाटक सरकारातील खारभूमी राज्यमंत्री श्री.बंगरप्पा यांनी आपल्या राज्यातील खारभूमी विकासापोटी 70 कोटी रुपये केंद्राकडून मंजूर करुन आणले, तर उर्वरित योजनांसाठी 2000 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक पाठविण्यात आले आहे. ज्यांनी आमच्याकडून विद्या संपादन केली ती राज्ये आपापल्या राज्यात निधी उपलब्ध करुन खारभूमी विकसित करण्याच्या कामी अग्रेसर आहेत व ज्या राज्याची मूळ संकल्पना आहे ते महाराष्ट्र राज्य आपली खारभूमी विकासाची कार्यालये निधी अभावी बंद करत आहेत. शेतीवर पोट भरणा-या शेतक-यांसाठी हे चिंतेचे वातावरण आहे. एवढेच नव्हे तर, शेतीवर पोट भरणा-या जीवितांचा जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कोकणामध्ये पूरप्रतिबंधक बंधा-यांच्या अभावामुळे विहिरी गोडया पाण्याऐवजी खा-या पाण्याने भरु लागल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. समुद्राचे पाणी वाडयावस्त्यांमध्ये गेल्यामुळे तेथील शेतजजमिनीचे खार जमिनींमध्ये रुपांतर झाले आहे. त्यामुळे तेथील सर्व जमिनी नापिकी झाल्या आहेत. आज आपण ठाण्याकडून डोंबिवलीकडे जात असतांना डाव्या बाजूला पाहिले तर सर्व जमिनींचा बिल्डर लॉबीने ताबा घेतला आहे. तेथील खाडया बुजविल्या जात आहेत, जंगल तोडले जात आहे. उद्या खाडीचे पाणी मुंब्रा, दिवा या गावांमध्ये शिरले आणि तेथील लोकांचे जीवन धोक्यात आले तर आश्चर्य वाटावयास नको.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.....

सभापती महोदय, कोकणातील प्रत्येक जिल्हयामध्ये पीकरचनेच्या बाबतीत भिन्नता दिसून येते. उदाहरणार्थ, सिंधुदूर्ग जिल्हयातील तेरेखोल खाडीपासून उत्तरेस रायगड जिल्हयातील कुंडलिका नदीपर्यन्तच्या भागात फळझाडांची लागवड करण्यास हवामान सोयीचे आहे. या भागात नारळ, सुपारी, आंबा, काजू, दालचिनी, लवंग, काळीमिरी तसेच खारजमिनीत भातशेती, मत्स्यशेती, मत्स्योत्पादन त्याचबरोबर या भागात मिठाच्या उत्पादनासही अनुकूल परिस्थिती असल्याचे दिसून येते. निधीअभावी जी कार्यालये बंद पडली आहेत, ती कार्यालये पुन्हा कार्यान्वीत झाली तर तेथील जोडउद्योगांमुळे शेतक-यांना फार मोठा दिलासा मिळेल. ठाणे जिल्हयामध्ये भातशेती आहे. गेल्यावर्षी आलेल्या पुरामुळे ठाणे जिल्हयातील शेतक-यांचे फार मोठे नुकसान झाले आहे, त्याचाही विचार आपण केला पाहिजे. आज समुद्रकिना-यावरील गावातील परिस्थिती पाहिली तर सर्वदूर खार जमिनी निर्माण झाल्या आहेत. ठाण्यापासून अलिबागपर्यन्तच्या सर्व समुद्र किना-यावरील पट्टयामधील शेतकरी हवालदिल झाला आहे. कोकणातील गरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीने खार जमिनीच्या विकासाचा कार्यक्रम जलदगतीने पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे आणि या कार्यक्रमाला योगय ती गती मिळणे अत्यंत आवश्यक आहे. खारभूमि विकासाचा प्रलंबित प्रश्न हाती घेऊन शासनाने कोकणचा जीवनमरणाचा प्रश्न सोडविण्याचे ठरविल्यास वावगे होणार नाही. खारभूमी विकसित करण्यासाठी शासनाचे सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. दिवसेंदिवस सर्वत्र पाण्याची भीषण टंचाई भासत असून भविष्यात पाणीटंचाई ही फार मोठी समस्या जनतेसमोर व शासनासमोर यक्षप्रश्न म्हणून उभी राहण्याची काळाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. अशा परिस्थितीवर खारभूमी संरक्षित करणे व आवश्यक असलेल्या ठिकाणी नवीन खारभूमी योजना उभारुन ती कार्यरत करणे फार आवश्यक झाले आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रकासाठी नाही

JPK/ KGS/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर..... 18:30

श्रीमती मंदा म्हात्रे.....

थोडक्यात सांगावयाचे झाले तर आज कोकणामध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस पडून सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे. गरीब शेतक-यांना कोणतेही पीक मुबलक प्रमाणात होऊन फायदा होत नाही. विदर्भातील किंवा मराठवाडयातील शेतक-यांप्रमाणे कोकणातील शेतकरी आत्महत्या न करता कोणता ना कुठला कोणतातरी फुले व फळे विकण्याचा जोडधंदा करुन आपली उपजीविका चालवित आहे. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, आपण यावर त्वरित आवश्यक ती उपाययोजना अंमलात आणावी व खार जमिनीमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसानीची जास्तीत जास्त भरपाई कशी मिळेल ? या दृष्टीने पावले उचलावीत, अशी मी या निमित्ताने शासनाला मागणी करीत आहे.

ठराव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3U - 2.....

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी हा जो अशासकीय ठराव मांडलेला आहे,त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. राज्यातील विशेषत: ठाणे,सिंधुदूर्ग,रत्नागिरी व रायगड या जिल्हयांत सागरी किनारपट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खा-या पाण्यापासून होणा-या नुकसानीपासून वाचविण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमून सागरी अतिक्रमण बचावासाठी एक मास्टर प्लॅन तयार करुन त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी. कोकण कोकण म्हणजे नेमके काय ? डाव्या बाजूला सहयाद्री पर्वताच्या रांगा आणि उजव्या बाजूला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा आणि मध्ये एक चिंचोळा व वाकडा भाग त्यालाच कोकण असे संबोधतात. या कोकणामध्ये समुद्र हा आपल्या लाटांच्या माध्यमातून शिरकाव करु पाहत आहे, त्यामुळे शेतक-यांची फार मोठी हानी होत आहे. या गोष्टीची वेळीच दखल घेऊन ठोस उपाययोजना करावयाला पाहिजे, अशी मी या निमित्ताने शासनास विनंती करतो. कोकणातील बंदरे ही आता पूर्णपणे दुर्लक्षित झालेली आढळून येतात. पूर्वी चिपळूण देवगड येथील बंदरापासून ते भाऊच्या धक्क्यापर्यंत संपूर्ण जलवाहतूकच असावयाची, जलवाहतूक ही फार स्वस्त होती. आता ही बंदरे संपूर्णपणे गाळाने भरलेली असल्यामुळे समुद्राने आपला प्रवाह बदलावयास सुरुवात केलेली आहे. या समुद्राच्या लाटा किना-यालगतच्या गावांना येऊन थडकू लागल्या आहेत, त्यामुळे या गावांती शेतजमिनींची फार मोठी हानी होत आहे व दिवसागणिक शेतजमिनींची होणारी धूप वाढत आहे. यासंदर्भात "देवबाग" या गावातील जिवंत उदाहरण आपणा सर्वांच्या डोळयासमोर आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने या सदनात हा अशासकीय ठराव मांडण्यात आलेला आहे, हा अशासकीय ठराव असला म्हणून आपण त्याला थातुरमातूर उत्तर द्यावे असे नाही. सदर विषयावर एक तज्ज्ञ समिती नेमून व 720 किलोमीटरच्या समुद्रकिना-याची संपूर्ण पाहणी करुन त्यानुषंगाने राज्यशासनाच्या व केंद्रशासनाच्या मदतीने निधी उपलब्ध करुन या ठिकाणी मोठमोठया संरक्षक भिंती घालण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बोरले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव .....

सभापती महोदय, मी आपल्याला मिऱ्या बंदराचे उदाहरण देतो. 15-20 वर्षापूर्वी 15 ते 20 कोटी रुपये खर्च करुन मिऱ्या बंदर बांधले गेले. हे सर्वात खोल बंदर आहे. आता हे बंदर गाळाने भरलेले आहे. तेथील ग्रामस्थांचे म्हणणे लक्षात न घेता अधिका-यांनी चुकीचे नियोजन करुन आपल्या पुस्तकी ज्ञानाप्रमाणे तेथे संरक्षक भिंत बांधली. पाण्याचा प्रवाह उलटा फिरल्यामुळे तेथील गावे समुद्र गिळतो की काय, अशी परिस्थिती तेथे निर्माण झालेली आहे. तसेच, मिऱ्या बंदरामध्ये बाहेरुन वाळू आत येते. शासन बंदरातील वाळू काढण्याचे काम करीत आहे. बंदरातील हजारो टन वाळू काढली तरी देखील बंदरातील वाळूचे प्रमाण कमी होत नाही. अशीच परिस्थिती विजयदुर्ग बंदराची आहे. कोकणातील एकूण 19 बंदरे गाळाने भरलेली आहेत. त्यामुळे तेथील वाहतूक व्यवस्था संपुष्टात आलेली आहे. मच्छिमारांना मच्छी मिळत नाही. बंदरांमध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचलेला असल्यामुळे तेथील गावांना समुद्राच्या पाण्यापासून धोका निर्माण झालेला आहे. कोकणातील 80 हजार एकर जमीन खार पट्टयाची झालेली आहे. ती जमीन वाया जाते की काय, अशी परिस्थिती आता निर्माण झालेली आहे. कोकणातील खार जमीन, गावे आणि कोकणातील लोकांना वाचविण्यासाठी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी जो अत्यंत महत्वाचा अशासकीय ठराव मांडलेला आहे, त्या ठरावाला मी पाठिंबा देतो आणि माझे विचार संपवितो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर (खार भूमी, बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्यासंदर्भात मी शासनाची भूमिका स्पष्ट करतो. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी उपस्थित केल्या अशासकीय ठरावानुसार धूपप्रवण किनारपट्टीची धूप थांबविण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करुन त्याची युध्द पातळीवर अंमलबजावणी करण्याची मागणी आहे. महाराष्ट्र राज्याला एकूण 720 किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभलेला असून या किनारपट्टीपैकी 313 किलोमीटर किनारपट्टी ही धूपप्रवण आहे. धूपप्रवण क्षेत्र धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी राष्ट्रीय किनारा सुरक्षा प्रकल्प तयार करुन केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य प्राप्त करण्याकरिता बाहय सहाय्यीत प्रकल्प म्हणून सादर करावा असे मुख्य अभियंता, केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक 23.7.1998 च्या पत्रान्वये कळविले होते. महाराष्ट्र राज्याकरिता नॅशनल कोस्टल प्रोटेक्शन प्रोजेक्ट तयार करुन राज्य शासनाच्या मान्यतेने केंद्रीय जल आयोगाकडे दिनांक 1.9.1998 च्या पत्रान्वये मंजुरीसाठी प्रथमत: सादर करण्यात आला होता. केंद्रीय जल आयोगाने वेळोवेळी उपस्थित केलेल्या व बहुतांशी तांत्रिक स्वरुपाच्या असलेल्या आक्षेपांचे निराकरण करुन अंतिमत: 72.36 किलोमीटर लांबीचे धूप प्रतिबंधक बंधारे बांधणेसाठी रुपये 193.801 कोटी रुपयांचा सुधारित प्रस्ताव दिनांक 13.01.2003 च्या पत्रान्वये केंद्रीय जल आयोगाकडे सादर करण्यात आला आहे. सदरहू प्रकल्पाच्या अनुषंगाने निवासी आयुक्त, महाराष्ट्र शासन संसद भवन, नवी दिल्ली यांनी दिनांक 15.11.2006 अन्वये महाराष्ट्र राज्याच्या एकूण रुपये 193.801 कोटी किंमतीचा प्रकल्प राष्ट्रीय किनारा सुरक्षा प्रकल्पात अंतर्भूत करण्यात आल्याचे कळविले आहे.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर .....

अद्यापपर्यंत या प्रकल्पांतर्गत सात किनारी राज्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. अन्य अजून पाच राज्यांकडून प्रस्ताव प्रलंबित आहेत. सर्व बारा किनारी राज्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर एकत्रित प्रस्ताव मिनिस्ट्री ऑफ वॉटर रिसोर्सेस यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता मिळण्याबाबत केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. संसदेचे प्रत्येक अधिवेशन सुरु होण्यापूर्वी नेहमीच्या प्रथेप्रमाणे राज्यातील केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी राज्यातील सर्व खासदारांची बैठक मा.मुख्यमंत्री महोदय आयोजित करतात. त्या बैठकीच्या वेळी पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने सदरचा प्रस्ताव प्रत्येक वेळी त्यामध्ये एक मुद्दा म्हणून पाठविला जातो.

नॅशनल कोस्टल प्रोटेक्शन प्रकल्प बारावा केंद्रीय वित्त आयोग यांच्या माध्यमातून समुद्राच्या पाण्याचे अतिक्रमणापासून किनारपट्टीलगतच्या गावांच्या बचावासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखण्यात आला असून तो अंमलात आणण्यासाठी शासनाचे सर्वातोपरी प्रयत्न सुरु आहेत. यानुसार राज्यातील धुपप्रवण क्षेत्राची धूप थांबविण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु असल्याने नव्याने मास्टर प्लॅन तयार करण्याची आवश्यकता नाही.

केंद्र शासनाकडून प्रकल्प मंजूरी मिळताच त्यानुसार सर्व कामे हाती घेण्यात येणार असल्याने सदर अशासकीय ठराव मागे घेण्याची सन्माननीय सदस्यांना मी विनंती करीत आहे. या बाबतीत माननीय सदस्यांना ज्या अपेक्षा आहेत, त्या सर्व बाबींचा योजनेत समावेश करण्यासंबंधी कार्यवाही सुरु आहे त्यामुळे आता अशासकीय ठरावाची आवश्यकता नाही असे वाटते. म्हणून सभागृहाला विनंती आहे की, हा अशासकीय ठराव मागे घेण्यात यावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की, संसदेचे प्रत्येक अधिवेशन सुरु होण्यापूर्वी नेहमीच्या प्रथेप्रमाणे राज्यातील केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी राज्यातील सर्व खासदारांची बैठक माननीय मुख्यमंत्री महोदय आयोजित करतात. परंतु माझा प्रश्न असा आहे की, शासनाने हा मुद्दा त्या बैठकीत निदर्शनास आणून दिलेला आहे का ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत मेरी टाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांची मी बैठक घेतली होती. बंदरांचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. महाराष्ट्रात 48 बंदरे आहेत. त्यापैकी बी.पी.टी. व जे.एन.पी.टी. ही दोन मोठी बंदरे सोडून इतर बंदराच्या विकासासाठी शासनाने धोरण निश्चित केले आहे. लवकरच या बंदरांचा बी.ओ.टी. तत्वावर विकास करण्यात येणार आहे. मेरीटाईम बोर्डाकडे बंदरे बांधण्याचे काम आहे. निधी प्राप्त करण्यासाठी मी केंद्रीय जलवाहतूक मंत्र्यांना भेटलो आहे. यासाठी कॉन्फरन्स घेतली आहे. या कामासाठी जास्तीत जास्त निधी मिळाल्यास कोकणच्या विकासाला हातभार लागणार आहे. माननीय सदस्यांच्या भावना मी समजून घेतल्या असून शासन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करील. माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, हा अशासकीय ठराव मागे घेण्यात यावा.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी मांडलेल्या ठरावाला सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी अनुमोदन देताना आणखी काही विधायक सूचना केलेल्या आहेत. मंत्री महोदयांनी ठरावाला उत्तर दिलेले आहे त्यामुळे माझे समाधान झालेले आहे. कोकण विभागातील विविध प्रश्न कित्येक वर्षापासून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सन्माननीय सदस्यांनी मांडले आहेत. कोकणातील प्रश्न सोडविण्यासाठी विविध समित्या नेमल्या आहेत, परंतु प्रश्न सुटलेले नाहीत. महाराष्ट्र राज्याकरिता नॅशनल कोस्टल प्रोटेक्शन प्रोजेक्टर तयार करुन राज्य शासनाच्या मान्यतेने केंद्रीय जल आयोगाकडे दिनांक 1.9.1998 च्या पत्रान्वये सादर केलेला असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु इतर राज्यांनी अशा प्रस्तावांद्वारे केंद्र सरकारकडून निधी प्राप्त केलेला आहे. कोकण विभागास निधी मिळण्यासाठी ठोस प्रयत्न केले पाहिजेत. योजनेचा निधी या वर्षी केंद्र सरकारकडून मिळाला तर कोकणातील किनारपट्टीवरील लोकांना निश्चित दिलासा मिळेल.

सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

.....नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी कठोर उपाययोजना अमलात आणणे.

मु.शी. : मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी कठोर उपाययोजना अमलात आणणे याबाबत श्रीमती उषाताई दराडे यांचा ठराव.

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने जालील ठराव मांडतो --

" मराठवाडा क्षेत्रात अवर्षणामुळे व सिंचनाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसल्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, या क्षेत्रातील 75 टक्के उद्योगधंदे बंद असणे, उत्पन्नाची साधने नसल्याने खालावत चाललेले जीवनमान, पुरेशा आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा यांचा अभाव, परिणामी मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत निम्म्यापेक्षाही कमी असल्याचा जाहीर करण्यात आलेला अहवाल विचारात घेता मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी कठोर उपाय योजना अमलात आणण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. "

सभापती महोदय, हा ठराव येथे मांडत असताना काही महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख येथे करणे मला आवश्यक वाटते. महाराष्ट्र शासनाने मानव विकास कमिशन स्थापन केले आणि माजी आयुक्त श्री.भोगे यांच्याकडे त्याचा कारभार दिला आहे. मराठवाड्यातील एकूण जिल्ह्यांपैकी केवळ 5 जिल्हेच या कमिशनच्या अधिकारात आहेत किंवा त्यांना तेथे काम करण्याची संधी आहे. कारण मराठवाडा हा सगळाच विभागलेला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर मराठवाडा विनाअट महाराष्ट्रात सामील झालेला आहे. तसेच मराठवाड्यातील एकूण मागासलेपण लक्षात घेता हे जे कमिशन आहे त्यामध्ये मराठवाड्यातील सगळ्याच जिल्ह्यांचा समावेश असायला पाहिजे होता. परंतु काही तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टी त्याच्या आड आल्या. त्यामुळेच उस्मानाबाद, जालना, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांचा त्यात समावेश झाला. तेथे मानव विकास निर्देशांक हा .43 इतका आहे. म्हणजे .21 ते .43 निर्देशांक ज्या जिल्ह्यांचा आहे त्यांचा विकास घडवून आणण्याच्या योजना

..... 3एक्स 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे 2

आखता येतील अशी तरतूद असल्यामुळे मराठवाड्यातील बाकीच्या जिल्ह्यांमध्ये मागासलेला भाग असतानाही केवळ मानव विकास निर्देशांक वाढलेला नसल्याने मानव विकास आयोगाच्या कक्षेत ते जिल्हे येऊ शकत नाहीत, तेथील लोकांना या आयोगाकडे जाता येत नाही. सभापती महोदय, हा निर्देशांक कसा काढला गेला वा जातो ? तर पर कॅपिटा इनकम, साक्षरता आणि बालमृत्यू दर किती आहे या आधारे हा निर्देशांक काढला जातो. या शिवाय देखील आणखीही काही गोष्टी त्यामध्ये जमेस धरल्या जातात. उदा. मोसमी पाऊस, औद्योगिक उत्पादन, आयात-निर्यात होते काय ? कृषी उत्पादन, पशुधन उत्पादन, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील परिस्थिती, परिवहन दळणवळणाची परिस्थिती, लोकसंख्या प्रमाण किती आहे, रोजगाराचे प्रमाण, तसेच शिक्षण विषयक, आरोग्य विषयक परिस्थिती काय आहे याही गोष्टींचा विचारा करून हा निर्देशांक काढला जातो. मात्र औरंगाबाद शहर आहे आणि तेथे वाळुंज सारखा औद्योगिक वसाहतीचा भाग आहे तसेच जालनाच्या काही भागामध्ये जेथे एमआयडीसी होऊन काही उद्योग आलेले आहेत त्यामुळे तेथे हा निर्देशांक वाढलेला आहे. कन्नड मध्ये मात्र मोठ्या प्रमाणात दुष्काळ आहे. परंतु औरंगाबादला वसाहत असल्याने येथे उत्पन्नाचा निर्देशांक वाढला आणि तो .57 वर गेला. तेव्हा आम्हाला या कमिशनचा फायदा होत नसेल तर महाराष्ट्र शासनाने त्याचा अवश्य विचार केला पाहिजे. बीड, जालना जिल्हे तसे पाहिले तर औरंगाबाद पेक्षा किती तरी मागासलेले आहेत. तसेच जालना, परभणी, नांदेडमध्ये जे गोदावरीचे पाणी जाते त्यामुळे बीड जिल्ह्याचाही थोडा फायदा होतो. तसेच परळीचे थर्मल पॉवर स्टेशन तेथे आहे त्यामुळेही तेथील उत्पन्न कोठे तरी वाढलेले आहे असे दाखविले जाते. ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 3वाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

आणि म्हणून महाराष्ट्र सरकारने या गोष्टीचा कुठेतरी गांभीर्याने विचार केला पाहिजे. फक्त शहरी आणि ग्रामीण भागाकरिता इंडेक्स तयार न करता प्रत्येक तालुक्याचा वेगळा इंडेक्स काढला गेला पाहिजे. हा इंडेक्स तयार करीत असतांना त्या भागातील शैक्षणिक परिस्थिती कशी आहे, साक्षरतेचे प्रमाण किती आहे, बालमृत्यूचे प्रमाण किती आहे, दरडोई उत्पन्न कशामुळे वाढले आहे हे सांगणार आहात काय? सभापती महोदय, महाराष्ट्राची आर्थिक पहाणी या अहवालाची प्रत माझ्याकडे आहे. विदर्भ आणि मराठवाडा हे दोन्ही विभाग विनाअट महाराष्ट्रामध्ये सामील झाले आहेत. या पहाणी अहवालातील एक तक्ता मी आपल्या नजरेस आणून देणार आहे. याठिकाणी इकॉनॉमिक सर्व्हे करण्यात आला आहे त्या अनुषंगाने एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. या अहवालामध्ये मराठवाडयाचा विभागनिहाय डाटा समोर आला असता तर महाराष्ट्राचे चित्र समोर आले असते. या ठिकाणी पर कॅपिटा इन्कम वाढलेले दिसते, सर्व गोष्टी वाढलेल्या दिसतात. परंतु त्यामध्ये मुंबई शहर, ठाणे शहर, पुणे शहर यांच्या तुलनेत बीड जिल्हयातील मागासलेल्या तालुक्यांचा विकास किती झाला आहे? एकीकडे आपण मुंबई शहराचा विकास करीत असतांना त्यांच्याबरोबर दुसऱ्या जिल्हयांची तुलना एकत्रित करता येणार नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, हा सर्व्हे अहवाल आपणासमोर ठेवला जातो त्यावेळी प्रत्येक जिल्हयांचा विभागवार वेगळा डाटा दिला पाहिजे. या ठिकाणी अहवालातील पृष्ठ क्रमांक 66 वर असलेला डाटा आपणास वाचून दाखवासा वाटतो. राज्य सरकारची सर्व पाटबंधारे विकास महामंडळे मी अभ्यासली आहेत. खरे म्हणजे ही सिंचन विकास महामंडळे, भारत कल्याण योजना, एकात्मिक पाणलोट, जलस्वराज्य योजना अशा प्रकारच्या योजना निश्चितपणे क्रांतिकारक आहेत.. परंतु त्या राबवितांना विभागीय असमतोल रहाणार नाही याची आपण दक्षता घेतली पाहिजे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामध्ये समाविष्ट असलेल्या पाटबंधारे प्रकल्पांची संख्या 20 आहे, गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ हे नाशिक जिल्हयापासून असून त्यामध्ये समाविष्ट असलेल्या पाटबंधारे प्रकल्पांची संख्या 12 आहे. शासनाच्या भागभांडवलामध्ये 41 प्रकल्पांचा समावेश असून एकूण 4 कोटी 522 लाखापैकी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला 2 कोटी 601 लाख इतका वाटा दिलेला आहे. मी या ठिकाणी विदर्भाचा डाटा वाचलेला नाही. माझे असे म्हणणे आहे की, आमचा पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला विरोध नाही. त्यांचा विकास झाला पाहिजे याबद्दल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

दुमत नाही. परंतु विकसित भागाचा विकास करीत असतांना व अविकसित भागाचा विकास करीत असतांना जो रेश्यो समोर येतो त्यामध्ये कितीतरी तफावत आहे ती आपण कमी केली पाहिजे. आणि म्हणून मी माझ्या ठरावामध्ये म्हटले आहे की, या संबंधी आपण कठोर उपाय योजना केली पाहिजे. ती अशी की, मराठवाडयाचे चित्र काय आहे?, बीड जिल्हयाचे चित्र काय आहे? त्यांच्याकरिता दळणवळणाची साधने उपलब्ध करुन देण्यासाठी आपण काय विशेष प्रयत्न केले आहेत? नगर-बीड-परळी या रेल्वे मार्गाला मान्यता मिळाली. त्याकरिता केंद्र सरकारने 10 कोटी रुपयांची तरतूद केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला अनेक वेळा सांगितले की, याकरिता महाराष्ट्र शासन केंद्र सरकारकडे पाठपुरावा करील. आणि रेल्वे मार्गाकरिता मातीकाम रोजगार हमी योजनेमधून केले जाईल. अशा प्रकारे अनेक वेळा सांगितले गेले. परंतु महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे त्याबाबत पाठपुरावा करण्याकरिता आतापर्यंत कोणती पावले उचलली ते आम्हाला समजले नाही. ही रेल्वे बीड जिल्हयाच्या विकासाची केंद्रबिंदू ठरणार आहे. 250 कोटींच्या या कामास तांत्रिक मान्यता मिळण्यासंबधीचा प्रस्ताव अनेक महिन्यापासून केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे. तेव्हा या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने काय प्रयत्न केले आहेत?. या रेल्वेच्या कामाकरिता विशेष भूसंपादन करण्यात येणार आहे. त्याकरिता आपण सेक्शन 4 चे नोटिफिकेशन, सेक्शन 6 व सेक्शन 9 ची नोटीस जारी केली पाहिजे, अवॉर्डस् डिक्लेअर केली पाहिजेत. या सर्व गोष्टी प्रोसेसमध्ये आहेत काय? आज नगरपासून बीड-परळीपर्यंत ज्या ज्या गावच्या जमिनी संपादित करावयाच्या आहेत तेथील जास्तीत जास्त गावच्या जमिनी संपादित करण्याची कारवाई सुरु झाली आहे काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत/शीघ्रलेखापी नाही

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सुरु...

सेक्शन 4 चे नोटिफिकेशन झालेले आहे. स्टॅटयुटरी प्रोव्हीजन संपल्याच्या अगोदर अवॉर्ड झाले नाही तर ती फाईल लॅप्स होते. केंद्र सरकारकडून तांत्रिक परवानगी आली नाही तर या वर्षी मिळालेला 10 कोटी रुपयाचा निधी आपल्ला खर्च करू शकणार नाही. महाराष्ट्र शासनामार्फत भूसंपादनाची कारवाई करण्याबाबत टेक्निकल मंजुरीसाठी केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाकडे "विशेष बाब "म्हणून महाराष्ट्र शासन कोणते प्रयत्न करत आहे ? या संबंधात कठोर उपाययोजना का केली जात नाही ? मराठवाड्याच्या विकासाच्या संबंधाने महाराष्ट्र शासन पावले उचलत आहे, आपण सगळ्यांना बरोबर घेऊन काम करणार आहोत, ही महाराष्ट्र शासनाची तडफ दिसली पाहिजे. या संबंधातील आकडेवारी देऊन काही होणार नाही. कधी नव्हे एवढा पैसा मराठवाड्यातील जलसंपदा विभागाला उपलब्ध झालेला आहे. परंतु पाटबंधाऱ्याची कामे ज्या गतीने व्हायला पाहिजेत त्या गतीने होताना दिसत नाही. आज मराठवाड्यातील उद्योग रेल्वेअभावी बंद पडत आहेत. लिडकॉमने लेबर फॅक्टरी सुरु केली होती, परंतु ती अनेक वर्षापासून बंद आहे. नांदेडमध्ये पावरलूम आहे. तसेच बीडमध्ये वडवडीची पावरलूम होती, त्या ठिकाणचे शेड हे पावरलूमच्या मालकाला विकलेले आहेत. जो धंदा होता तो बंद पडल्यामुळे रोजगार कमी झालेला आहे. त्या ठिकाणी काही रोजगार निर्मिती झाली नाही, पण जो रोजगार अनेक वर्षे चालू होता तो रोजगार जगविण्यासाठी शासनाने कोणती पावले उचललेली आहेत ? यासंबधाने खुलासा व्हावा. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार कसा उपलब्ध करून देणार आहात ? ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांकडे उत्पन्नाचे काही साधन नाही म्हणून ते शहराकडे वळत आहेत. आज शहरे वाढत आहेत. पूर्वी 20 टक्के शहरी भाग आणि 80 टक्के ग्रामीण भाग होता. तो वाढून आता 48 टक्के शहरी भाग झालेला आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या हाताला कोणते काम देणार आहात ? त्यांच्यामध्ये काम करण्याची शक्ती आहे. त्याची त्या श्रमशक्तीला देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत करआपण सहभागी करुनर घेऊ शकलो नाही,त्यांच्यासाठी मनुष्यदिन राजगार निर्माण करु शकलो नाही, त्यांच्या श्रमाला मूल्य देऊ शकलो नाही, त्यांची क्रयशक्ती वाढवू शकलेलो नाही तर मग विकासाचा दर कसा वाढणार ?

आज मराठवाड्यातील बालाघाट पर्वताच्या रांगेतील चार-पाच लाख मजूर ऊसतोड कामगार म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखरकारखान्यांमध्ये येतात. दरम्यानच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ SBT/ MAP/ KGS/

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सरु...

जाळामध्ये आपज महिलांचे बचत जट चालू असल्याचे सांगतो. परंतु सहा महि□याच्या जाळामध्ये दारिद्र्य रषेजाली असता□सुध्दा या कुटुंबातील महिलांचे बचत जट बंद पडले. त्यामुळे त्या स्त्रियां□ उद्योजधंद्यासाठी अर्थसहाय्य मिळजार □ही. यासाठी महाराष्ट्र शास□जायद्यामध्ये जोजत्या प्रजारची शिथिलता आजजार आहे ? त्या दृष्टी□जोजती तरतूद जरजार आहे ? याचा जुलासा व्हावा. 5 लाज जुटुंबातील बचत जट बंद पडले असले तरी महाराष्ट्रातील महिलांच्या बचत जटाची योज□ यशस्वी होईल पज जो माजासलेला जिल्हा आहे, त्या जिल्ह्यामधील स्त्रियांचे उद्योज वाढजार □सतील, त्यांच्याकडून अर्थाज□होजार □सेल, त्या जुटुंबाला आर्थिज मदत मिळजार □सेल तर ते जुटुंब दारिद्र्य रेषेच्या बाहेर जसे येजार ? हा जरा प्रश□ आहे. आपज साजर शाळा साजरजारजा□ परिसरामध्ये □माज जेलेल्या आहेत. परंतु त्या मुलां□ सहा महि□जावातील जोली □सलेल्या, पत्र्याची शेड असलेल्या जिंवा झाडाजाली चालविलेल्या शाळेमध्ये शिजायचे आजि सहा महि□जारजा□यातील शाळेमध्ये शिजायचे, हे बरोबर आहे का ? या दो□ही शिजजाचा स्टॅ□डर्ड जाय आहे ? हे जाजू□घेजे महत्वाचे आहे. आईवडिलांच्या बरोबर जाऊ□ ऊसाच्या पाचटाच्या झोपडीत ती मुले रहाजार. त्यां□ त्या शाळेत □ज्या-आजज्याची जाय व्यवस्था आहे ? शिजजाचा जाय दर्जा आहे ? हे पहाजे आवश्यज आहे. असे असेल तर त्या मुलांचा शैजजिज दर्जा जसा वाढजार ? आईवडिलां□ साजर जरु□जोजाचा दर्जा वाढजार आहे, हे मला जळत □ही. आपज मुलां□ शिजजापासू□वंचित ठेवत आहोत. या बालाघाट पर्वतावरु□येजाऱ्या पाच लाज जुटुंबाच्या मुलांच्या शिजजाच्या दृष्टी□वेजळे धोरज शास□जा राबवत □ही ? त्या बालाधाटामध्ये □ही□शाळा □माज जा जरत □ही ? त्या मुलां□ शिजज धेज्याचा अधिजार □ही जाय ? त्यां□ त्यांचे जीव□मा□ उंचवावयाचे □ही जाय ? माझ्या जिल्ह्यामध्ये दो□ऊस शाळा आहेत. त्या शाळांची □हमी चौजशी चालू असते. परीजेच्या जाळामध्ये ही चौजशी चालू आहे. स□मा□□य आदिवासी राज्यमंत्री श्री.आत्राम साहेब आता येथे उपस्थित □हीत. मुलांच्या परीजेच्या जाळामध्ये शाळांची चौजशी चालू आहे. सेवाभावी संस्थामार्फत जिंवा शास□च्या वती□ □वासी शाळा चालवाव्यात. यादृष्टी□ जोजतीही सबब सांजू □ये. आपज वसती शाळा सुरू जरज्याचा □जय घेतला. आपज त्यासाठी जिल्हापरिषदां□ पैसे दिले. माझ्या बीड जिल्हापरिषदेमध्ये या संबधा□राजजारज जेळले जेले. वसतिजृहासाठी सेवाभावी संस्थांजडू□प्रस्ताव माजविले. त्या प्रस्तावासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सुरु...

सेवाभावी संस्थांना पाच हजार रुपये जर्च आलेला आहे. शेवटी निर्णयासाठी समिती निर्माज केली. त्यांनी यांना शाळा द्या, त्यांना देऊ नका,असे निर्णय घेतले. त्याचबरोबर पालकांना मुलांच्या शिकजासाठी 300 रुपये देज्याची योजना पुढे आजली. या 300 रुपयांमध्ये मुले सहा महिने तरी शिकू शकतील काय ? कोजतीही कल्याजकारी योजना राबवत असताना शासनाने सामान्य माजसांच्या कुटुंबाची भावना दुजावली जाजार नाही, याचा विचार केला पाहिजे. हा प्रश्न फार तीव्र आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ...

सिंचनाच्या बाबतीत आपण अनेक तलावांची कामे सुरु केली. बीड जिल्ह्यामध्ये अरणवाडी नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी साठवण तलाव घेतला. त्या कामाचे दोन वर्षापूर्वी टेंडर झाले. गुत्तेदाराने ते काम हाती घेतले परंतु काम पूर्ण झाले नाही. गोदावरी नदीमध्ये पाणी आहे. तेथील किती अमर्याद पाणी वाहून जाते हे माहीत नाही. मी गोदावरी सिंचन महामंडळाचे अभिनंदन करीन. त्यांनी पुनर्वसनासाठी निळ्या रेषेचा फेरसर्व्हे करण्याचा प्रस्ताव केलेला आहे. आंध्र पर्यंतच्या शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. परंतु या कामाची गती वाढवावी. आपण कामाची गती वाढवली नाही तर पुढे हे पाणी वाया जाणार आहे. यामध्ये दुहेरी नुकसान होत आहे. एक तर मराठवाड्याचे पाणी वाहून जात आहे आणि जे पाणी अडविले त्याचा नियोजनबध्द पध्दतीने वापर होत नाही. पिकांचा पॅटर्न नियोजनबध्द पध्दतीने लागू होत नाही. कारखान्यांची कॅपॅसिटी एवढी आहे आणि आपण एवढा ऊस लावावयास पाहिजे याचे ज्ञान शेतकऱ्यांना नाही. फळबाग योजना अंमलात आणावयाची आहे. या सर्व गोष्टी करीत असताना शेतकऱ्यांना मोटिव्हेट करावयास पाहिजे आणि कठोर उपाययोजना केली पाहिजे. माझी नम्र विनंती आहे की, यामध्ये या पध्दतीने विकास दर वाढवावयाचा असेल तर शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत आणि तशा प्रकारची शिफारस या सदनाने केली पाहिजे. याबाबत माझी आग्रहाची विनंती आहे की, हा इंडेक्स 0.43 वरुन कमीतकमी 0.50 वर नेला तर मराठवाड्यातील मागासलेल्या जिल्ह्यांच्या विकासाच्या दृष्टीने काही पावले टाकता येतील. रेल्वेच्या बाबतीत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याच्या बाबतीत ठोस पावले महाराष्ट्र शासनाने उचलली पाहिजेत. महिलांचा विकास, महिलांच्या सक्षमीकरणातील त्यांचा सहभाग तसेच आरोग्य, शिक्षण, कृषी, दळणवळण या सर्व क्षेत्रात मराठवाड्याला महाराष्ट्राच्या बरोबरीत आणावयाचे असेल तर कोणत्याही विभागाची भीडभाड न ठेवता त्यानुसार जास्तीचे पैसे देण्यासाठी योजना अंमलात आणावी अशी मी या सभागृहाला विनंती करते. हा ठराव पास करुन या सदनाने महाराश्ट्र शासनाला शिफारस करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

ठराव प्रस्तुत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी सर्वप्रथम सन्माननीय सदस्य श्रीमती उषाताई दराडे यांचे मनापासून अभिनंदन करतो. या ठिकाणी त्यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाला हात घातलेला आहे. सर्वसाधारणपणे या विषयाच्या बाबतीत सभागृहामध्ये फारशी चर्चा होत नाही. परंतु हा महत्वाचा विषय सभागृहामध्ये उपस्थित करुन सन्माननीय सदस्यांनी आपले मत विस्तृतपणे या ठिकाणी व्यक्त केलेले आहे. जे मूलभूत प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले त्याचे उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. समाजाच्या राहणीमानाचा दर्जा सुधारावा म्हणून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या (युएनडीपी) मानव विकास निर्देशांकानुसार विविध राष्ट्रांची प्रतवारी केली होती. मानव विकास म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेची साधने या जीवनाच्या तीन महत्वाच्या गोष्टीच्या संघर्षात झालेली पूर्तता याचा जो मिलाप असतो त्याला आपण मानव विकास असे म्हणतो. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. 1960 साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. पहिल्यांदा 2002 साली शासनाने याची गंभीर दखल घेतली आणि 2002 सालापासून मानव विकास निर्देशांक अहवाल शासनाने सादर केला. आज महाराष्ट्र राज्यामध्ये 35 जिल्हे आहेत. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्यामध्ये जास्तीत जास्त जिल्हे घेण्याचा प्रयत्न करावा आणि त्यामध्ये मराठवाड्यातील जिल्हे घ्यावेत. याचा विचार केला तर आपण खालून वर गेलो. भाराभर जिल्हे यामध्ये घेतले तर कोणत्याही जिल्ह्याचा व्यवस्थित विकास होणार नाही. त्यापेक्षा आपण खालून वर गेलो. 35 जिल्ह्यापैकी खालून जे 12 जिल्हे आहेत त्यामध्ये मराठवाड्यातील काही जिल्हे असतील.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदय म्हणत आहेत की, आपण खालून वर जातो. या खालून वर जाण्याच्या पध्दतीला मी विरोध केला. इंडेक्स काढताना शहरी भाग आणि ग्रामीण भाग धरुन काढल्यामुळे खालचा आणि वरचा क्रम चुकलेला आहे असा माझा आक्षेप आहे. त्यादृष्टीने तो इंडेक्स कॅल्क्युलेट करण्याची पध्दत महाराष्ट्र शासनाने बदलावी अशी माझी विनंती आहे. ही विनंती माननीय मंत्रिमहोदयांनी गांभीर्याने घ्यावी आणि त्यावर टिप्पणी करावी.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ SBT/ MAP/

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, हा इंडेक्स कसा काढावा याचे एक प्रमाण युएनडीपीने दिलेले आहे. त्याप्रमाणे आपण हा इंडेक्स काढतो. महाराष्ट्र शासन हे केवळ काही जिल्ह्यांसाठी करीत नाही तर संपूर्ण जगामध्ये ज्या पध्दतीने इंडेक्स काढला जातो त्याच पध्दतीने आपण या ठिकाणी इंडेक्स काढलेला आहे. शेवटी युएनडीपीने इंडेक्स काढण्याची जी पध्दत अवलंबिली आहे त्याच्या विपरित आपण प्रयत्न केला तर ते संयुक्तिक होणार नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मला संरक्षण द्यावे. माझे उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आपले मुद्दे मांडावेत. सन्माननीय सदस्यांच्या प्रत्येक मुद्याला मी उत्तर देईन. 1960 साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर 2002 सालामध्ये पहिल्यांदा महाराष्ट्र शासनाने राज्यातील असमतोल दूर करण्यासाठी पावले उचलेली आहेत. ही गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यामध्ये असतोल निर्माण झालेला आहे. काही जिल्हयातील लोकांचे जीवनमान अत्यंत खलावलेले आहे. त्या भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्या भागातील लोकांना प्रगत भागाबरोबर आणण्यासाठी राज्य शसनाने मानव विकासाची निर्मिती केली आहे. मागील बजेटमध्ये मानव विकासासाठी 40 कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. सन 2007-08च्या बजेटमध्ये ही तरतूद 60 कोटी रुपये करण्यात आलेली आहे. परभणी जिल्ह्यामध्ये 2.25 कोटी रु. तर हिंगोली जिल्हयामध्ये 2.75 कोटी रु. खर्च करण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये पर कॅपिट इन्कमचा उल्लेख केला. मुंबई आणि गडचिरोली जिल्हा यांच्या पर कॅपिटा इन्कममध्ये खूप फरक आहे. जेव्हा आपण संपूर्ण राज्याची सरारी काढतो त्यावेळी ती सरासरी एका ठराविक पातळीवर येते. याचा अर्थ असा नाही की, महाराष्ट्रातील सर्व जिल्हे प्रगत आहेत. आज महाराष्ट्रातील काही जिल्हे प्रगत आहेत तर काही मागासलेले आहेत. मागसलेल्या जिल्ह्याना प्रगत जिल्हयांबरोबर आणण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सिंचनाची व्यवस्था करावी असे आपल्या भाषणात सांगितले. आता राज्य शासनाने मराठवाड्याला पॅकेज दिले आहे. मराठवाड्यातील मागासलेल्या जिल्ह्यात सिंचनाची व्यवस्था व्हावी, लोकांचे जीवनमान सुधारावे यासाठी गेल्या दोन वर्षामध्ये राज्य शासनाने मराठवाड्याला जास्तीत जास्त निधी दिलेला आहे. मागासलेल्या भागातील तालुका आणि गाव पातळीवरील उत्पन्नामध्ये वाढ व्हावी यासाठी कार्यक्रम तयार करणे, प्रौढ साक्षरतेसाठी विशेष मोहीम राबविणे, गाव पातळीवर उत्पादित झालेल्या मालाला बाजारपेठ निर्माण करुन देणे इत्यादी गोष्टी आपण करीत आहोत. यासाठी जिल्हा मानव विकास समिती, तालुका मानव विकास समिती आणि गाव पातळीवर गाव मानव विकास समिती अशा समित्या आपण तयार केलेल्या आहेत. केवळ शहरांचाच विकास न होता तालुका आणि गावस्तरापर्यन्त हा विकास होऊन पर कॅपिटा इन्कम वाढावे यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन, राजमाता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. सुनील देशमुख...)

जिजामाता बाल आरोग्य व पोषण मिशन या दोन मिशनच्या सहकार्याने मानव विकासाचे काम करावयाचे आहे. मागासलेल्या भागातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढावे, त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळावी यादृष्टीने मानव विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक पारिणामकारकरीत्या करण्यासाठी ज्या सेवाभावी संस्था गाव पातळीपर्यन्त जाऊन काम करण्यास तयार आहेत अशा सेवाभावी संस्थांचा सहभाग आपण घेत आहोत. सन्माननीय सदस्यांनी श्री. भोगे यांचा याठिकाणी उल्लेख केला. श्री. भोगे हे एक चांगले कार्यक्षम अधिकारी म्हणून महाराष्ट्राला ज्ञात आहेत. त्यांना मानव विकासाचे कार्याध्यक्ष म्हणून नेमलेले आहे.

...नंतर कु. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख.....

त्यांनी या क्षेत्रामध्ये अतिशय चांगले काम केलेले आहे. महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर पहिल्यांदाच महाराष्ट्र शासनाने 2002 साली म्हणजे 40 वर्षानंतर हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. आणि या वर्षी अर्थसंकल्पामध्ये 40 कोटीवरुन 60 कोटी रुपये इतकी भरीव वाढ केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने हा विषय अत्यंत गांभीर्याने घेतलेला आहे. या महाराष्ट्र राज्याचे वित्त मंत्री श्री जयंत पाटील स्वत: वारंवार महिन्या दोन महिन्यामध्ये या कामकाजात लक्ष देतात व वेळोवेळी झालेल्या कामकाजाचा आढावा घेतात. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती ऊषाताई दराडे यांनी दिलेला अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो .

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी माझ्या ठरावाच्या निमित्ताने येथे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. हे महाराष्ट्र शासन रेल्वेच्या प्रश्नासंबंधी, महिलांच्या प्रश्नासंबंधी किंवा त्यांच्या मुलांच्या शिक्षणासंबंधी गांभीर्याने विचार करेल अशी मी अपेक्षा व्यक्त करते. लोकसहभागातून जल संपदा विभागाने काम करण्यास सुरुवात केलेली आहे. त्याचे मी स्वागत करते. माझ्या या ठरावामधील मुद्यांचा म्हणजेच शिक्षण, आरोग्य, दळणवळण व कृषी यासंदर्भात महाराष्ट्र शासन कठोरपणे आणि गांभीर्याने दखल घेऊन योग्य पावले उचलेल अशी मला अपेक्षा आहे. या अर्थसंकल्पामध्ये शासनाने मराठवाडयाला पॅकेज दिलेले आहे परंतु येथे अनेक वर्षाचा अनुशेष असल्यामुळे त्या कामाची जी गती आहे ती आपण जास्त वाढवावी व या योजनेची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी . या ठरावातील प्रश्न हे मराठवाडयातील जनतेच्या संदर्भात असल्यामुळे या प्रश्नावर शासन विचार करेल अशी अपेक्षा व्यक्त करते आणि हा अशासकीय ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त**लिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 24 मार्च , 2007 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 12 मिनिटांनी, शनिवार ,दिनांक 24 मार्च, 2007च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही